
# बनगरवाडी

व्यंकटेश माडगूळकर



MR
891.463
M 264 B

MR
891.463
M264B

# ब न ग र वा डी

Bangarwadi

# बनगरवाडी

व्यंकटेश माडगूळकर

Venkatesh Madgulkar

Mauj Prakashan

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

मौज प्रकाशन : १८

पहिली आवृत्ती : २१ सप्टेंबर, १९५५
दुसरी आवृत्ती : ऑक्टोबर, १९५८
तिसरी आवृत्ती : जुलै, १९६२
चवथी आवृत्ती : जून, १९६५
पाचवी आवृत्ती : फेब्रुवारी, १९६८
सहावी आवृत्ती : जानेवारी, १९७१
सातवी आवृत्ती : जुलै, १९७४

किंमत पाच रुपये

© व्यंकटेश माडगूळकर, १९७४

वेष्टन व रेखाचित्रे
दीनानाथ दलाल

प्रकाशक :
वि० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४०० ००४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४०० ००४

MR
891.463
M 264 B

55415
11.11.76

Library IIAS, Shimla
MR 891.463 M 264 B
00055415

मराठीतील एक समर्थ कथालेखक
**पुरुषोत्तम भास्कर भावे**
यांना—



# १

दशम्यांची पिशवी पाठीला मारून मी बनगरवाडीला निघालो होतो.

अद्याप सर्वत्र काळोख भरून राहिला होता. चांदण्या चमकत होत्या. समोर वळसे मारीत चाललेली गाडीवाट तेवढी फिक्कट अशी दिसत होती. रात्र किती आहे, किती वेळाने उजाडणार आहे, याचा निश्चित अंदाज बांधता येत नव्हता. मी फार लवकर तर निघालो नाही ना, अशी शंका वरचेवर मनात येत होती. माझ्याच पावलांचा आवाज मला मोठा वाटत होता. रातकिडे किरकिरत होते. गार वारा कानाशी आवाज करीत होता. बराच वेळ चालल्यामुळे अंगात एक लय भरली होती.

वाट चुकण्याची भीती वाटत होती, कारण यापूर्वी मी कधी बनगरवाडीला आलो नव्हतो. हे गाव कसे असेल, काय असेल, तिथली माणसे माझ्याशी कशी वागतील, तिथे गेल्यावर राहायचे कुठे, असले प्रश्न मी स्वतःलाच विचारीत होतो. दोन दिवस रागरंग बघून मला परत फिरायचे होते. कायम राहायचे म्हणजे काही सामानसुमान आणायला पाहिजे होते. आज केवळ धोतर-चादर, दोन कपडे, एवढेच घेऊन मी चाललो होतो.

माळावरून गार झोंबरे वारे वाहू लागले. चांदण्यांचे तेज कमी झाले. धड चांदण्याचा उजेड नाही, धड उजाडलेही नाही, अशी मधली अवस्था आली. बाभळी-तरवडासारख्या झुडपांचा ओळखू येणारा वास जाणवू लागला. वाटेवरची धूळ पायाला गार लागू लागली.

बघता बघता काळोख नाहीसा झाला. दिसू लागले. झाडेझुडपे, दगडगोटे यांना आकार आला. चांदण्या दिसेनाशा झाल्या. रातकिड्यांचे गाणे थांबले. झोपेतून जाग्या झालेल्या कावळ्यांची जड कावकाव ऐकू आली.

तांबडापिवळा सूर्य माळाआडून वर आला. हिरवट प्रकाशाला पिवळी झळाळी आली. बोरींच्या झुडपात बसून राहिलेल्या सातबाया जाग्या झाल्या. शेपटी नाचवून कलकलू लागल्या. झुडपात पिसे फुलवून बसलेले होले पायांवर उभे राहून आवाज टाकू लागले. कावळे भराऱ्या घेऊ लागले.

माळावर वाळून पडलेले गवत सूर्याच्या पहिल्या किरणांनी उबदारले. त्याच्या खाली असलेले कीटकांचे जग जागे झाले. मुंग्या तुरतुरल्या. टोळ उड्या हाणू लागले. सरडे सरसरले. माळावर लहान गर्दी करून आत राहिलेले गुंडीकिडे, घसरून आत पडणाऱ्या किड्यांना पकडून खाण्यासाठी अंगावर माती घेऊन तयार राहिले. मुरमुऱ्याच्या झुंड्यावर बसून राहिलेले हिरव्या झगझगीत रंगाचे भुंगे मुरमुटीची

तुरट पाने खाऊ लागले. माळावरच्या बिळांतून घोरपडींनी मुंडकी बाहेर काढली. गळ्याखालचा भाग हलवीत त्या जिभेच्या टप्प्यात येणाऱ्या कीटकांची वाट बघू लागल्या.

झाडे सोडून होले रस्त्यावर आले आणि डौलदार माना हलवीत धुळीत पडलेले गवताचे बी टिपू लागले. सपाट झालेल्या धुळीवर त्यांच्या पायांचे ठसे नक्षीकाम केल्यासारखे उठू लागले.

पाठीशी असलेली पिशवी हातात घेऊन मी भराभर चालू लागलो. अनवाणी पायांनी धूळ उडवू लागलो. लेहंग्याच्या फडकफडक आवाजाने वाटेवरचे होले बावरून उंच उडू लागले. लांब टांगा टाकीत मी चालत राहिलो. चालून चालून पोट खोल गेले. पिशवीतील भाकरींचा, लसणाच्या चटणीचा, सांडग्यांचा वास फार येऊ लागला. पण मी नेटाने पाय उचलीतच राहिलो. बोटांच्या फटींतून धूळ वर येत होती. पावलांवर पुटे चढत होती. लेहंगा मळत होता आणि वाट लांबतच होती.

आजूबाजूला पिवळ्याकरड्या रंगांचे माळ पसरले होते. पाहावे तिकडे उघडे माळ! अगोदर भगभगीत असलेले हे माळ उन्हाळ्यामुळे अधिक भगभगीत दिसत होते. क्वचित कुठे खोलगट भागांत झाडाझुडपांचे हिरवे ठिपके होते. एरवी चोहीकडे दगडगोट्यांनी भरलेले माळ. नेपतीबोराटीची, बाभळमुरमुटीची खुरटलेली झुडपे आणि त्यांमधून जाणारी, धुळीने भरलेली, दगडांनी उंचावलेली, कुठे रुंद तर कुठे अरुंद अशी गाडीवाट.

हळूहळू सूर्य वर चढला. पहाटे सौम्य वाटणारे माळरान रखरख करू लागले. सकाळच्या प्रहरी चाललेला पाखरांचा कलकलाट कमी झाला. क्वचित एखादी मातकट रंगाची माळचिमणी उंच उडून बाणासारखी खाली सूर घेऊ लागली. तिने घातलेल्या उतरत्या शिळेने उगीचच एकाकी वाटू लागले. एक बहिरीससाणा खाली बघत जमिनीबरोबर तरंगत गेला आणि कोकाट्यांनी ओरडून गोंधळ केला.

आता आसपास कुठे काळे कुठे तांबडे असे जमिनीचे तुकडे नांगरून पडलेले दिसत होते. न नांगरलेल्या पडीक जमिनी उन्हाच्या तडाख्याने उलल्या होत्या. पिंढरीएवढा पाय जाईल अशा भेगा जागोजाग पडल्या होत्या. या जमिनी आल्या, त्याअर्थी वस्ती जवळ आली, असे समजून मी वरचेवर क्षितिजाकडे बघत होतो. पण घरे दिसत नव्हती. झाडी दिसत नव्हती.

ऊन्ह टळटळीत झाले. सकाळी गार काल्यासारखी लागणारी धूळ तापली. माझ्या डोक्याभोवती बारीक माशांचा एक थवा घोंघावू लागला. त्या सतत आवाजाने वीट आला. डोक्यावरची टोपी काढून तिने तो पाठलाग करणारा घोळका हाकलण्याचा मी प्रयत्न केला, पण तो गेला नाही. शे-दोनशे माशा माझ्या डोक्याभोवती फिरत, बरोबर येतच राहिल्या. हा माणूस कुठेतरी अनेक माणसे राहाणाऱ्या ठिकाणी चालला आहे, त्याला दिशा बरोबर माहीत आहे, त्याच्या

सोबतीने गेलो तर आपण नेमक्या ठिकाणी पोचणार आहोत—घाण, राड, सांड-पाणी असलेल्या ठिकाणी जाणार आहोत—हा समज असलेल्या माशा डोक्याभोवती घोंगावत माझ्याबरोबर येतच राहिल्या.

## २

आजूबाजूला सपाट मोकळा माळ, बाजरीची तांबडी राने, आणि मध्येच गबाळे पडावे तशी पडलेली तीस-पस्तीस घरे, अशी बनगरवाडी होती. बहुतेक घरांच्या भिंती मातीच्या होत्या आणि छप्परे खपलीच्या काडानें शाकारलेली होती. काही थोडी घरे धाब्याचीही होती. हरेक घरापुढे लहानमोठे अंगण होते. सांडपाण्यावर वाढलेला लिंबारा, शेवगा होता. घराच्या मागच्या बाजूला मेंढरे कोंडण्यासाठी बाभळीच्या काट्यांचे कूड घालून केलेले वाडे होते. कुठे भिंतीला लागून गाडीचे मोडके चाक पडले होते. सगळे नेहमीप्रमाणेच. वाडीत रस्ते असे नव्हतेच. घरे बांधून उरलेली जागा चालण्यासाठी वापरली जात होती, इतकेच. बऱ्याच घरांच्या कवाडांना कुलपे होती. दोनतीन लहान मुले एका घरापुढे खेळत होती. घरांच्या सावल्या धुळींने भरलेल्या वाटेवर पडल्या होत्या. त्यांत कुठे कुत्रे तर कुठे पांढरीकाळी कोंबडी डोळे मिटून बसली होती.

डावीउजवीकडे घरे होती. त्यांतून बायांनी डोकावून बघितले. पोरे आत पळाली. थोडे पुढे गेल्यावर पटांगण लागले. लिंबाचे एक मोठे झाड लागले, त्याच्याभोवती पार होता. ती गार सावली बघताच, तापलेल्या कोंबड्यासारखा जाऊन मी तिच्यात बसलो. टोपी काढली. घाम पुसला. पाय आपटून धूळ झटकली. वरच्या थंड सावलीने घाम जिरला आणि बरे वाटले.

भूक लागली होती, पण पाणी कुठे आहे ते ठाऊक नव्हते. विचारावे असे कोणी आसपास दिसत नव्हते. तसेच तुकडे खावेत, असा विचार मनामध्ये आला, पण भुकेइतकीच तहानही लागली होती. तोंडातला ओलावा सुकून खारट चव आली होती. ती गार सावली सोडून उठावे, असेही वाटेना. उंच केलेल्या गुडघ्याभोवती हातांचा विळखा घालून मी उगीच बसून राहिलो. आसपास कसलाही आवाज नव्हता. माझ्या डोक्यावर असलेल्या एका फांदीवर कावळ्याचे जोडपे बसले होते तेसुद्धा आवाज करीत नव्हते.

जरा वेळाने, मी आलो त्याच वाटेने कुणी माणूस येताना दिसला. बरे वाटले. हा माणूस येताच त्याला हाक मारावी, आपण का आलो ते सांगावे, पाणी विचारून घ्यावे, भाकरी खावी, असे मनाशी म्हणतो आहे, तोपर्यंत तो गडी गावात शिरला.

समोर येऊन उभाही राहिला.

त्याच्या डोक्याला तांबड्या रंगाचा फटका होता. अंगात गोल सदरा होता. धोतराच्या टोकाबरोबरच एक उंच भालाही त्याने हातात धरला होता. त्याचा चेहरा मोठा आणि लांबोडका होता. गालाची हाडे वर आली होती. नाक सरळ होते. मिशांतले केस काळेकरडे होऊन धुरकटल्यासारखे दिसत होते. मुळीच संकोच न दाखविता त्याने आपल्या तांबरल्या डोळ्यांनी मला पाहून घेतले आणि मिशांवरून बोटे फिरवून धुळीत थुंक टाकली. ती मला तोंडावर आल्यासारखी वाटली. उगीच चुळबूळ करून मी पाय खाली सोडले आणि इकडेतिकडे बघितले.

दम देताना काढावा तसा आवाज काढून त्याने मला विचारले, "काय अंडीवाला हायेस का गा?"

त्या प्रश्नाने फटका बसल्यासारखा मी खाली आलो. क्षणभर काय उत्तर द्यावे हे मला सुचेना. माझ्या या लेहंग्याने मला एकदम खाली ओढले होते. सुऱ्या आणेल्यांच्या थैल्या घेऊन खेडोपाडी अंडी खरीदणारा मुसलमान बनवून टाकले होते. मी गडबडलो. गोंधळलो. तोंडावर ओशाळवाणे हसू आले. सोडलेले पाय वर घेऊन टोपी नीट केली आणि म्हटले,

"नाही, मी मास्तर आहे."

हा खुलासा ऐकून विचारणाऱ्याला आपण काही वावगे बोललो असे वाटले नाही.



डाव्या पायावरचा भार उजव्या पायावर टाकून तो म्हणाला,

"मास्तर?"

त्याचा विश्वासच बसला नाही. मळका लेहंगा आणि रेघारेघांचा धुवट शर्ट घातलेले हे गुडघ्याएवढे पोर मास्तर कसे असेल? लंगोटी लावून ज्याने शाळेत जावे आणि थुंकीने पाटी पुसावी, अशा पोराला मास्तर म्हणेल कोण? जरी म्हणाले तरी त्याला मास्तर करील कोण? छे! काहीतरी सांगणे!

मला आपल्या लहान वयाबद्दल, धोतर-कोट न घातल्याबद्दल विषाद वाटला. भाषेत जोर आणून मी म्हटले, "हो. माझी

नव्यानं नेमणूक झाली आहे. आजपासून मास्तर म्हणून मी इथं रुजू झालो आहे!"

हातात आडवा घेतलेला भाला त्याने झेंड्यासारखा समोर टेकला आणि तुच्छतेने म्हटले,

"हं, हतं काय करायचा गा मास्तर? साळा चालतीय कुटं हतं? पोरं हायती कुटं वाडीत? सरकारला काय ठावं न्हाई व्हय? रिकामा फाजीलपणा..."

आणि पटका नीट खोचीत तो निघूनही गेला. जाताजाता पुन्हा एकवार धुळीत थुंकला. अरुंद गल्लीतून तो जाईपर्यंत मला तिकडे बघत राहण्याचे धैर्य झाले नाही. मी फार ओशाळलो. शाळेत फाटकी चड्डी घालून जाताना जसे मेल्याहून मेले व्हायचे तसे झाले. तेवढ्या एकाच प्रसंगाने माझे धैर्य, उमेद, उत्साह वितळून टाकला. असेच माघारी जावे आणि या नोकरीचा राजीनामा द्यावा, हे आपल्याला जमणार नाही, इथे शाळा भरणार नाही, मुले येणार नाहीत, मास्तराचा, शाळेचा, शिक्षणाचा इथे काही उपयोग नाही, असे वाटू लागले; आणि उदासवाणा चेहरा करून मी लिंबाच्या पारावर बसून राहिलो. मघा लागलेल्या तहानेचा, भुकेचा, काही वेळ मला विसर पडला. उन्हात तळपणाऱ्या त्या गावात या वेळी मी कशाला आलो, असे वाटून मला फार एकाकी वाटू लागले.

आणि मग, मिशा पांढऱ्या झालेला एक म्हातारा हातातली काठी टेकीत रानाकडून आला. त्याच्या भुवयासुद्धा पांढऱ्या झाल्या होत्या. खांद्यावरचे जाडजूड कांबळे त्याने रुप्याचे कडे असलेल्या हातांनी बळकट धरले होते. जोड्यांतले पाय ओढीतओढीत तो आला. माझ्यापुढे थांबला. कपाळावर हात घेऊन त्याने मला न्याहाळले, खाणाखुणा पटण्यासाठी चुकले मेंढरू न्याहाळावे तसे न्याहाळले. म्हटले,

"हतं का बसला रे बाळा?"

मी म्हणालो, "मी मास्तर आहे. आजपासून माझी नेमणूक इथं झाली आहे."

"अरे, मग मास्तर असून हतं का बसतूस? शाळंत बस."

म्हाताऱ्याच्या या बोलण्याने मला थोडा धीर आला. मघाच्या भालाइतासारखा हा नाही असे वाटले.

"मला शाळेची इमारत कुठाय तेही नीट ठाऊक नाही!"

यावर समोरच्या लांबलचक चावडीकडे हातातली काठी करून म्हातारा म्हणाला, "ती नव्हं का शाळा—चावडीतच दोन खण शाळंचं!"

"ही?"

"हां. जा बस तत!"

"एकटा बसून काय करू? पोरं कुटं आहेत?"

"पोरं गेली गा शेरडांमागं. पर येत्याली. काय रानातच ऱ्हात्यात?"

"पण शाळा भरण्याइतकी आहेत का तरी?"

"हायेत, बक्कळ हायेत. आन् हुत्याल की. दरसाल दहाईस लगीन उभं ऱ्हातंय. पोरं हुत्याल. तू शिकवायचं काम कर म्हंजे झालं."

त्या बोलण्याचे हसू आले. पाराखाली उडी टाकून मी पिशवी घेतली आणि म्हटले, "मला पाणी कुठाय तें सांगा, म्हणजे जेवण करीन. भाकरी आणल्यात बरोबर."

म्हातारा म्हणाला, "पाण्याची वरड हाय गा वाडीला. उन्हाळ्यात पार वाळवण हुतं. एक हेळ हाय त्यो तिकडं बग—"

मी गल्लीतून समोर पाहिले. गावाबाहेर दगडचुन्याने बांधलेला हेळ दिसला.

"आमच्या धनगराचं पानी चाल्त असलं तर बग, देतो."

मी म्हणालो, "न चालायला काय झालं? पण तांब्या मिळाला तर मी घेऊन येईन."

पण म्हाताऱ्याने तिथे उभ्या राहिल्याच हाक मारली, "अग ये अंजे, पान्याचा तांब्या आन भरून मास्तराला."

लांब, गल्लीतल्या एका घरातून कुणीसे बाईमाणूस डोकावले. म्हाताऱ्याने परत ओरडून तेंच सांगितले आणि मग आम्हीं दोघेही शाळेपाशी आलो. तालुक्याच्या मास्तरांनी माझ्यापाशी चावी दिली होती. ते म्हणाले होतें,

"चार्ज देण्यासारखं काही काम नाही. पोरंच नाहीत तिथं तर शाळा कसली? ही चावी घेऊन जा आणि चार्ज दिला म्हणून मी रिपोर्ट करतो."

कुलूप काढून मी शाळा उघडली. कुबट भपकारा आला. खालची उंचसखल जमीन उखणली होती. धुळीने आणि चिमण्यांच्या पांढऱ्या विष्ठेने भरून गेली होती.

खांद्यावरचे घोंगडें काढून म्हाताऱ्यानें त्यानेच तो कचरा लोटला, तो आम्हा दोघांच्याही अंगावर आला. त्या खाटानें मला ठसका लागला.

थोडीशी जागा स्वच्छ झाल्यावर, त्यावर म्हाताऱ्यानें घोंगडे टाकले. अंथरले नाही, तसेच आपले टाकले, आणि म्हटले,

"बस."

आणि मग हात खाली टेकून तोही बसला. काठी बाजूला आडवी ठेवीत म्हणाला, "हां, सोड भाकरी. पानी आनील आत्ता पोरगी!"

मी पिशवी घेतली. जुन्या धोतराच्या फडक्यांत बांधलेल्या भाकरी सोडल्या.

"तुम्ही खाता का बाबा?"

आपला सुरकुतला चेहरा हसरा करून म्हातारा म्हणाला, "आमी आतापातूर ऱ्हातू व्हय? दोन बार होऊन तिसरा वखत आला. खा तू!"

मला थोडे संकोचल्यासारखे झालें. पण भूक संकोचाला जुमानणारी नव्हती.

कुणीतरी एक काळीभोर पोरगी आली. बाहेरूनच तिनें उंबरठ्यात पाण्याचा तांब्या ठेवला आणि माझ्याकडे थोडे बघून ती निघून गेली.

एक गुडघा उभा करून बसलेला म्हातारा कमरेची तमाखूची पिशवी काढून तींत बोटे घालू लागला.

भुकेल्या पोटी मी भराभर घास घेत राहिलो. घेता घेता त्या म्हाताऱ्याकडे पाहू लागलो. डोक्याचें मुंडासे सोडले, अर्धे धोतर सोडले, तर त्याच्या अंगावर काही नव्हते. ज्या मातीत तो दिवसभर मेंढरांमागे हिंडत असेल त्या मातीप्रमाणे, त्या मेंढरांप्रमाणे त्याचाही रंग काळाभोर होता. अंगकाठी सडसडीत होती. उघड्या पायांवर झाडेझुडपे लागून पांढरेधोट फरकाटे उठले होते. आणि म्हातारा पार पिकला होता. कबुतराच्या पिसाऱ्यासारख्या भुवया, पांढऱ्याधोट भरघोस मिशा, बोटबोट वाढलेली पांढरी दाढी आणि छातीवरचे पांढरे कुरळे केस. वयाचा अंदाज बांधणे कठीण होते, पण म्हातारा पार थकला होता. चेहऱ्यावर सुरकुत्यांचे जाळे होते. हातापायांवरच्या शिरा फुगल्या होत्या, जागजागी गाठळल्या होत्या.

तमाखू गालात धरून, पिशवी नीट बांधता बांधता त्याने विचारले, "गाव कुठशीक तुजं ?"

मी म्हणालो, "आहे इथं जवळच—विभूतवाडी."

"तिथला कोन तू ?"

मी जरूर ती माहिती सांगितली. त्याने कुणाकुणाची ओळख सांगितली.

"मग तू आमच्यापैकीच आहेस !—" असे म्हणून माझ्या पाठीवर हात टाकला आणि थुंकायला यावे म्हणून तो बसल्याबसल्याच उंबऱ्यापाशी सरकला.

मला पुष्कळच धीर आला. या धनगरी खेड्यात मी अगदीच एकाकी नाही, जवळ येऊन बोलणारे, आपुलकी दाखविणारे कोणीतरी आहे, अशीच दहापाच माणसे मिळाली तरी मला इथे राहणे सुसह्य होईल, असे वाटले.

जरा वेळाने निरोप घेऊन म्हातारा रानात निघून गेला. मी एकटा उरलो. शाळेच्या तुळयांवरून पूर्वीच्या मास्तरांनी निरनिराळ्या म्हणी खडूने लिहिल्या होत्या. पूर्व-पश्चिम दिशांना त्या त्या नावाच्या रंगीत पाट्या डकवल्या होत्या. आढ्याला शेराची एक फांदी टांगली होती. तिच्यावर चिलटांचे पुंजके बसून राहिले होते. किलचांतून जागा मिळेल त्या ठिकाणी चिमण्यांनी घरटी केली होती. त्यांतून वाळाचे दोर, चिंध्या लोंबत होत्या. इथेतिथे फडफडून चिमण्या चिवचिवत होत्या. एक टेबल, एक खुर्ची, फळा हे साहित्य होते. टेबलाला लागून लाकडी पेटी होती, ती उघडून बघितली. फळा पुसायचे फडके, रूळ, जुने रजिस्टर, हजेरीबुक, खडूची रिकामी वाक्से, दौत, टाक—सटर नि फटर.

पिशवीतून आणलेली चादर काढून खाली अंथरली आणि चिलटांचा कहार वाचविण्यासाठी डोक्यावर धोतर घेऊन पडलो. असे एकाकी पडणे काही नवीन

नव्हते. पण माणूसकाणूस नसलेल्या, उन्हानें तळणाऱ्या गावानें—त्या रिकाम्या शाळेनें—मी जास्तच एकाकी झालो. चिमण्या ओरडत होत्या. एखादी चिमणी चिवचिवली म्हणजे ऐकायला बरे वाटते. पण दहापाच चिमण्या सारख्या ओरडू लागल्या, फडफडू लागल्या, तर नको नको होते. पण त्याच्यावर उपाय नव्हता. दार बंद केले तरी भिंतीवरून आत वाट होती. डोळे मिटून मी पडलो. चालण्याचे श्रम, जेवण, सावली—यामुळे गुडूप झोपून गेलो.

## ३

त्या गडद झोपेतून जागा झालो. पडल्यापडल्याच उघड्या दारातून मी समोर बघितले, तेव्हा दिवस पार मावळून गेला होता. आणि रानातून परत येणाऱ्या मेंढरांचा गलगा ऐकू येत होता. मी फार वेळ झोपलो होतो आणि अद्यापही उठावे असे वाटत नव्हते. कारण माझे पाय विलक्षण दुखत होते. दोन्ही हात डोक्याखाली घेऊन तुळयांकडे बघत काही वेळ मी पडून राहिलो.

बाहेर मेंढरांचा गलगा सारखा वाढत होता. मेंढक्यांनी घातलेल्या उंच आरोळ्या लांबून-जवळून ऐकू येत होत्या. धनगरी कुत्री भुंकत होती, कोंबडे आरवत होते, माणसे बोलत होती. आणि चिमण्या-कावळे गोंधळ करीत होते. मघा, 'दुपारी निर्जीव वाटणारे गाव एकदम जिवंत झाले होते, विलक्षण जोमाने हलू लागले होते.

मी बाहेर आलो. पटांगणात येऊन उभा राहिलो. ज्या वाटेनें मी आलो, तो भालाईत आला, आणि तो म्हातारा आला, त्या सर्व वाटा येणाऱ्या मेंढरांनी भरून गेल्या होत्या. खाली माना घालून ती जनावरे भराभर चालत होती. त्यांच्या पायांचा दबका आवाज येत होता. धूळ उडत होती. धुळीवर शेकडो खूर उठत होते. आणि धोतर खोचलेले, काळेभोर धनगर खांद्यावर आडवी काठी टाकून तोंडाने चमत्कारिक आवाज करीत त्यांच्यामागून येत होते. त्या मेंढरांच्या लोंढ्यांतून शेरडे होती. केसाळ कुत्री होती.

पश्चिमेकडे तांबडेभडक झाले होते. पूर्वेकडे वारा वाहात होता. पांढऱ्या ढगांचे लहानलहान पुंजके तांबड्या पश्चिमेकडून निळ्याकाळ्या पूर्वेकडे पसरले होते. जमिनी-प्रमाणे आभाळातही पांढरी मेंढरे वाड्याकडे चालली होती!

लेकुरवाळ्या मेंढ्या धावतधावत आल्या. आठदहा दिवसांची त्यांची पोरे घरी राहिली होती, ती ढांगुळ्या पायांवर शरीरे तोलीत चालू लागली. पातळ गुलाबी जिभा बाहेर काढून कातर आवाजात ओरडू लागली. मेंढरांचा घोळका आल्या-बरोबर कासेत शिरून ढुश्या देऊ लागली.

घरोघरी रानातून परत आलेल्या धनगरणींनी चुली पेटवल्या. काडाच्या छपरातून त्यांचा धूर आभाळात चढू लागला. मेंढके मेंढरे कोंडण्याच्या खटपटीस लागले.

बघता बघता गर्द काळोख झाला. मेंढरांचा गल्गा, कावळे-चिमण्यांची गजबज, माणसांच्या हाळ्या—सारे विरून गेले.

शाळेबाहेरच्या जोत्यावर, पाय खाली सोडून मी बसून राहिलो. वर चांदण्या चमकत होत्या. खाली दिवे लुकलुकत होते. वाऱ्याच्या थंड झुळका येत होत्या.

कुणीतरी अंधारातून आले आणि समोर एका बाजूला असलेल्या मारुतीच्या लहान देवळात दिवा लावून गेले. त्या उजेडात जाऊन भाकरी खावी आणि पोरीने दिलेल्या पाण्यातले उरलेले पाणी प्यावे, असा विचार मनात आला; पण शरीराने अमलात आणला नाही. खांबाच्या तळखड्याला टेकून मी त्या अंधाराकडे बघत बसूनच राहिलो.

आता इथून पुढे तीन वर्षे माझे गाव हेच होते. इथेच मला राहायचे होते. या मंडळीत मिसळायचे होते. त्यांचा विश्वास, प्रेम मिळवायचे होते. प्रतिष्ठा मिळवायची होती. आणि हे सारें करता करता, उखणून उकिरडा झालेली, चिमण्यांच्या विष्ठेनें आणि चिलटांच्या वासाने भरलेली ती शाळा नावारूपाला आणायची होती. पोरे जमवायची, त्यांना शाळेची गोडी लावायची, आपण गावात राहायचे आणि प्रतिष्ठा मिळवायची, या सर्वाला मोठी आडकाठी म्हणजे माझे पोरसवदा वय आणि किरकोळ अंगकाठी. आणि हे असे आडमुठे गाव. जिथे आजपर्यंत दहापाच मुले कधी नियमित शाळेत आली नाहीत ते गाव. हे कसे जमणार ? कसे निभणार ?



समोर पाय वाजले. मारुतीच्या देवळातल्या दिव्याचा मंद पिवळा-तांबडा उजेड बाहेर आला होता. त्याच्या पार्श्वभूमीवर कुणी काळी आकृती दिसली. मला अंधारात काहीही दिसत नव्हते. केवळ कुणी तरी जवळ आले एवढेच दिसले. मी थोडा ठसकलो.

"कोन, मास्तर बसलाय काय ?"

मी म्हातारबाबाचा आवाज ओळखला.

"होय, या."

"भाकरी खाल्लीस का?"

"नाही. खाईन आता."

"हे दूध आनलंय बग शेरडाचं."

जोत्यावर भांडे ठेवल्याचा आवाज मी ऐकला. त्या दिशेने पुढे हात केला तेव्हा हाताला भांडे लागले.

दरम्यान आणखी कोणी अंधारातून आले आणि खाकरूनखोकरून पायरीवर बसले.

म्हाताऱ्याने विचारले,

"कोन हाय?"

"मी हो कारभारी—"

"आनंदा?"

"हां."

"आ लेका, मास्तर अंधारात बसलाय. घराकडे जाऊन चिमनी तरी आन जा."

"कोन मास्तर?"

म्हाताऱ्याला सुरुवातीपासून सगळे सांगावे लागले. कोण मास्तर, कशासाठी आला आहे, केव्हा आला आहे, कुठला, कुणाचा?—या सर्वांची उत्तरे कारभाऱ्यांनी दिली. आनंदाने ऐकून घेतली, आणि मग तो चिमणी आणण्यासाठी निघून गेला. तांब्याभांडे, दिवा, अंथरूण या वस्तू अतिशय आवश्यक होत्या. त्या मी येतानाच आणायला पाहिजे होत्या. पण ध्यानी आले नाही.

आनंदा रामोशी चिमणी आणण्यासाठी निघून गेला. तो माघारा येईपर्यंत आणखी दहाबारा माणसे आली आणि घोंगडी टाकून खाली धुळीतच बसून राहिली. एकमेकांच्या बोलण्यावरूनच त्यांना ओळखी पटल्या. कुणाचे तरी मेंढरू लांडग्याने मारले होते. त्याविषयीचे तपशील पुरवले गेले. ती लांडग्याची मादी कुठल्याशा ताल्रीत व्याली आहे, तिची छावणी तिथे आहे, रात्री जाऊन मारली तर कहार चुकेल...असे बोलले गेले. कुणीतरी त्यांची चेष्टा केली. जनावर असे सापडणे शक्य नाही, ते नेहमी फिरते असते, असे त्याचे मत पडले. आणि हे सर्व झाल्यावर कुणा माणसाने बातमी आणली की ते मेंढरू लांडग्याने नाही, कुत्र्यानेच मारले, ते कुत्रे अमक्यातमक्याचे आहे, आणि ही घटना अमक्यातमक्याने बघितली.

फऱ्याचा शेव आडवा धरून आनंदा रामोशी चिमणी घेऊन आला. त्या उजेडात बारापेक्षाही अधिक माणसे धुळीत बसल्याचे माझ्या ध्यानी आले. बहुतेक सर्वांच्या अंगात अंगरखे नव्हते. बहुतेक सर्वांपाशी जाड घोंगड्या होत्या. कुणी त्या घोळा करून खाली टेकायला घेतल्या होत्या, तर कुणी अंगावर टाकल्या होत्या. क्वचित एखादादुसरा खोळ घेऊन बसला होता.

शाळेत जाऊन आनंदाने आणलेल्या चिमणीच्या उजेडात मी खाऊन घेतले आणि

बाहेर आलो.

कारभाऱ्यांनी विचारले, "खाल्ली भाकरी?"

मी म्हणालो, "हां."

खाकऱ्याखोकऱ्यावरून अद्यापही सभा बसून होती हे कळले. एकवार आतील चिमणी बाहेर आणावी असे वाटले. पण ती वाऱ्याने राहिली नसती आणि माझ्या-शिवाय कुणालाही त्याची जरुरीही वाटत नव्हती.

माझ्या शेजारी बसलेला आणि 'बाळा' म्हणून माझ्याशी बोलणारा हा पिकला म्हातारा गावचा कारभारी आहे, हे मला ह्या वेळपर्यंत जाणवले होते. लोक त्याचा उल्लेख कारभारी म्हणून करीत होते.

काही वेळाने न दिसणाऱ्या सभेला उद्देशून कारभारी म्हातारा म्हणाला,

"अरं, मास्तर आलाय. पोरांस्नी धाडा उद्यापास्नं साळंत."

कुणीतरी खाकरून थुंकले.

हलक्या आवाजात शेजाऱ्यांशी बोलल्यासारखे कुणी बोलले,

"कुठं हायेत गावाला पोरं?"

म्हातारा आवाज चढवून म्हणाला, "मग काय वांझोटाच हाय काय रं गाव?"

"तसं नाही. पर साळंत याला मोकळं असं पोर हाय कुठं?"

"एक सुदीक न्हाई? सगळी कामातच हायेत म्हण की!"

"न्हाई; पर मेंढरांमागं, शेरडांमागं जात्यात हो. रिकामं कोन हाय?"

क्षणभर उलटसुलट प्रश्नांचा नि उत्तरांचा गलगा वाढला. मग मी म्हणालो,

"सहा वर्षांपुढची मुलं शेरडांमागं जातात, ती एकटी जातात का?"

"कुठली जात्यात? रानमाळात हिंडत्यात थोरल्या भावामागं. लहानगी असली की दोघंतिघं मिळून शेरडांमागं जात्यात."

"मग अशी मुलं असतील ती पाठवा. त्यांना लिहावाचायला आलं तर काही तोटा होणार नाही. झाला तर फायदाच होईल!"

लांबून तमाखूने कमावलेला आवाज आला,

"आन् त्याला पोटाला गा?"

मला क्षणभर उत्तर सुचले नाही. मुले शाळेत आली तर त्यांना पोटाला कुणी घालावे, कसे, हा प्रश्न मला कधी जाणवला नव्हता. लहान मुलांना आईबाप मिळवून खाऊ घालतात, अशी माझी समजूत होती. पण म्हाताऱ्याने परस्पर उत्तरं दिले. तो म्हणाला,

"पोटानं मरू लागली तर माझ्या घरी ये. जोंधळे घालीन तुला पायलीभर. बायली, ज्या त्या कामात तिरकसतुंबा हायेच तुमचा. चांगली पंतसरकारनं साळा दिली, मास्तर दिला—तर शिकाय का जातंय रं तुमचं?"

मग मात्र सर्वांनीच सूर बदलला. पोरे कुणाकुणाला पाठवता येतील त्याची

चर्चा झाली. आमचा सदा येईल, आमचा महादा येईल, तुमचा तुका येईल, ह्यांचा सखा येईल—असे करताकरता दहाबारा मुले जमली.

कारभारी म्हणाला,

"झालं का मास्तर तुज्या मनासारकं? लाग उद्यापासनं उद्योगाला!"

चर्चेचा शेवट असा झाला. दरम्यान कुणी घरी जाऊन आले होते. मंडळी आता जातील, मग जातील, म्हणून मी बसलो होतो. पण इकडच्या तिकडच्या कथा निघाल्या. पाऊसपाणी, कुरण, मेंढरे—माझे कसे, तुझे कसे—हे सुरू झाले. मी हलकेच कारभाऱ्याला म्हणालो,

"बराय, मग मी पडू का?"

"हां हां, पड. पोरं येत्याल सकाळी. काळजी नगं."

आत जाऊन चादर अंथरली आणि धोतर पांघरून पडलो. चिमणीला निरोप दिला. बाहेर बोलणी चाललीच होती. माझा डोळा लागला.

मध्ये जागा झालो तेव्हा बाहेर चांद उगवला होता, आणि मंडळीपैकी कुणी चावडीत, तर कुणी त्या पटांगणात बसल्या जागीच घोंगडे खाली-वर घेऊन मुरगाळली होती. आकाश निरभ्र होते. आणि सुरेख चांदणे पडले होते. बाहेर मी बराच वेळ उभा राहिलो. समोर, गावाच्या कडेला दोन बुटकी छपरे होती. त्यांच्या सावल्या पडल्या होत्या. मधल्या बोळातून पलीकडच्या दगडांचा खिळगा दिसत होता. आणि त्यापलीकडे मोकळे रान होते. लांबचलांब पसरलेले रान. दूर फिक्कट दिसणारी झुडपे. आणि जिथे मी उन्हाचा येऊन बसलो ते लिंबाचे झाड शांत उभे होते. त्याच्या वरच्या टोकाला चार पांढरेशुभ्र बगळे स्तब्ध बसले होते.

## ४

मला येऊन आठपंधरा दिवस झाले होते आणि अद्यापही शाळेत मुले येत नव्हती. शाळा भरत नव्हती. कधी एखादे दिवशी दोनतीन मुले येत, तास-अर्धा तास झाला की कंटाळत. लघवीचे निमित्त करून बाहेर जात आणि पुन्हा परत येतच नसत. त्यातून एखादे नियमित येऊ लागले तर कधी बाप तर कधी आई येऊन भाकरी खाण्याच्या निमित्ताने बोलावून नेई, आणि त्याला शेरडांमागे रानात धाडून देई. टंगळमंगळ केल्याबद्दल क्वचित मुलाला दटावले तर तो रडू लागे आणि घरी असलेली त्याची आई धावून येई. "बाबा, तुला लेकरंबाळं नाहीत का? मातीत बसली ती साळा! पोरा, तू चल आपला घरी—" असे म्हणून चक्क मुलाला हाताला धरून निघून जाई. अशी शाळा चालली होती. रोज मंडळी चावडीपुढल्या पटांगणात

जमत. त्यांच्यापुढे ही गोष्ट काढली की म्हणत,

"अजून पोरांस्नी सवय न्हाई. महिना-पंधरा दिवस जाऊ द्या."

ते जाऊ देण्यावाचून मी तरी काय करू शकत होतो ?

दरम्यान कारभाऱ्याने एक लहानसे घर मला दिले होते. त्यात मी माझे बिऱ्हाड केले. म्हणजे दगड मांडून चूल केली. रविवारी गावी जाऊन दोन भांडीकुंडी आणली आणि हाताने करून खाऊ लागलो.

एके दिवशी रात्री भाला घेऊन दादू आला. चिमणीच्या उजेडात वळकटीला टेकून मी उगाच बसलो होतो.



तो आला आणि सतरंजीवर ऐसपैस बसला. हातातला भाला भिंतीच्या कोपऱ्यात ठेवून म्हणाला,

"हीच जागा आली म्हण की तुझ्या वाट्याला !"

आतापर्यंत या लोकांच्या निबर बोलण्याची सवय मला झाली होती. आदरार्थी बहुवचन हा प्रकारच त्यांना ठाऊक नव्हता. बरे, ते प्रेमाने, विशेष ओळखीने असले, तर कानांना काही वाईट लागत नाही; पण कुणीही अनोळखी धनगराने "का गा मास्तरा!" म्हटले की मला कसेसे वाटे. त्यात दादूने तसे म्हणताच ते मला फार लागले.

खिशातून चिलीम काढून त्याने तमाखूने भरली. सांडू नये म्हणून पायाचा अंगठा आणि त्याशेजारचे बोट या दोन्हीच्या पकडीत ती उभी धरून ठेवली आणि मोकळ्या हातांनी चकमक मारून गूल पेटवला. पेटता गूल चिलमीवर ठेवून फक्फक् लहान झुरके मारले आणि मग धुराचा लोट सोडला. पोटात गेलेल्या कडक धुराने त्याचे डोळे ओले झाले.

पहिल्या भेटीपासून या माणसाविषयी माझ्या मनात अढी निर्माण झाली होती.

त्यात चौकशी करता मला कळले होते की, केवळ टिवल्याबावल्या करून हा माणूस जगत होता. गावावर त्याचे वजन होते. तालुक्याच्या अधिकाऱ्यांशी वसऊठ होती. थोडेफार लिहावाचायला येत असल्यामुळे पुष्कळ वेळा त्याला गावकरी सल्ला विचारत.

नाकातोंडातून धूर सोडून त्याने चिलीम विझवली आणि पुन्हा खोलीत नजर फिरवून म्हटले, "तुज्या अगुदरचा मास्तर ह्याच खोलीत न्हात व्हता!"

त्या मास्तराने गावात काही खवडब केली म्हणून त्याला मार बसला, गावातल्या लोकांनी त्याला बेदम मारले, असे मी उडतउडत ऐकले होते. त्याची आठवण होऊन पोटातून भीतीची कळ उठली. तरीही तोंडावर काही न दाखवता मी म्हणालो,

"असं का?"

पण माझा आवाज घाबरलेल्या मेंढरासारखा आला होता.

"नीट नोकरी करायची सोडून गावात दादागिरी करायला लागला. पार चुली-पर्यंत पोचला आमच्या. मी ताकीद दिली दोनचार येळा. म्हनलं, आमच्या बायांकडं, पोरीबाळींकडं डोळा उचलून बगू नकंस, गोष्ट बरी होनार न्हाई. पण ऐकलं न्हाई त्येनं. त्येला वाटलं, मी सरकारी नोकर हाय. ही येडी धनगरं माझं काय करनार? ह्या मरनानंच मेलं फुकाट."

एवढे बोलून त्याने आपला निबरट चेहरा खुषीने उजळला आणि आपले तांबडे डोळे माझ्यावर फिरवले. मी दबकून गेलो. सावरून बसलो.

कोपऱ्यातला भाला घेऊन त्याने जवळ ठेवला आणि पुन्हा म्हटले,

"असाच बसला हुता. हीच येळ. मी आलो आन् एक न्हाई, दोन न्हाई, सरळ हा भाला उलटा धिऊन ठोकला पडंस्तोवर! धोतर वलं झालं त्येचं. माझं पाय धरायला लागला. रडायला लागला. पण मी रागाला गेलोलो. दहापाच टोले हानून त्यो जवा जमिनीवर निपचित पडला, तवा म्हनलो, मुकाट पोरं शिकव गावात! टगेपना करायला लागलास तर भोकसून मारीन जिवं!"

चिमणीचा तांबडा उजेड बाळक्याच्या हाडक्या तोंडावर पडला होता. मिशा पिंजारल्या होत्या आणि विडीने काळा पडलेला ओठ त्याने फारोळ्या दातांखाली दाबला होता. मला काय बोलावे हे सुचेना. अभावितपणे "हॅ–हॅ—" करून मी हसलो, आणि दरवाजाकडे पाहिले. या वेळी कुणीतरी यावे असे मला वाटले, पण बाहेर दाट काळोख होता.

मिशा साफ करून दादू म्हणाला,

"हसू नकंस मास्तरा! ही हसण्यासारकी गोष्ट न्हाई. तू नवा आला हायेस. नीट आपलं काम कर. गावात चबाढब करू नकंस. पोरं साळंत आली तर त्येस्नी शिकव. गावाला शिकवायच्या भानगडीत पडू नकंस!"

जमिनीवर ठेवलेली चिलीम, छापी, चकमक उचलून त्याने गोल अंगरख्याच्या खिशात घातली, भाला उचलला आणि छाती काढून तो बाहेर पडला. अंधारात दिसेनासा झाला.

काही वेळ मी गप बसून राहिलो. माझ्या कपाळावर घाम आला होता. श्वास चोरटा झाला होता. पटकन उठून दार दडपावे आणि कडी घालावी, असे मनात आले. पण ही क्रिया माझ्या हातून घडली नाही.

खोलीतील घोंगड्यावर मी पालथा पडलो.

काही वेळ गेला आणि उघड्या दारातून कुणी आत आल्यासारखे वाटले. माझ्या मानेवरचे केस उभे राहिले. भीतीची सणक मणक्यातून गेली. झटकन उठून बसलो आणि समोर बघू लागलो.

बाहेरच्या काळोखातून वीसबावीस वर्षांचा एक दांडगादुंडगा माणूस आत आला आणि मुकाट्याने उंबऱ्यालगत, भिंतीला टेकून बसला. तो माझ्या ओळखीचा नव्हता. आजपर्यंत मी गावात त्याला कधी बघितले नव्हते.

घोगऱ्या आवाजात मी विचारले,

"कोण आहे?"

"मी—आयबू."

मला काही बोध झाला नाही. पावसाने भिजणाऱ्या कुत्र्यासारखा आत येऊन बसणारा हा आयबू कोण, हे माझ्या लौकर ध्यानात आले नाही. तो मात्र गुडघे उभे करून आणि हातांची मिठी त्यांच्याभोवती घालून गप बसला होता. मग त्याने तोंड वळवून माझ्याकडे बघितले. चिमणीच्या उजेडात त्याचे बारीक डोळे, हसरा चेहरा मी बघितला.

"इथलाच का?"

"नाही. मी एखतपूरचा."

"एखतपूरचा? लांब आलास इकडं. कुणाकडं उतरला आहेस इथं?"

आयबूने डोक्यावर दाबून बसलेली टोपी काढली आणि खाली जमिनीवर ठेवली. दोन्ही हातांचे तळवे जोडून सर्व खोलीतून नजर फिरवली. आणि म्हटले,

"मला कुणी नाही. पोटामागं गावोगाव हिंडतो, आज हितं आलो. शाळंपुढं लोकांनी सांगितलं, मास्तर हाय एकलाच, जा त्येच्या सोबतीला. आलो!"

आणि त्याची-माझी ओळख अनेक दिवसांची—अनेक वर्षांची—आहे, असे मला वाटले. फुगीर गालांचा आणि तांबड्या नाकाचा आयबू का हिंडत असेल, कसा जगत असेल, याचा विचार मला करावा लागला नाही. तू गाव का सोडलास, इथेच नेमका कसा आलास, काय करणार आहेस, कुठे राहणार आहेस, अंगावरच्या कपड्यांशिवाय तुझ्यापाशी दुसरे काहीही कसे नाही—हे प्रश्न मला विचारावे लागले नाहीत. अंगातल्या कुडत्याच्या चिरफळ्या झालेल्या, मुसलमानी

चोळणा घालणाऱ्या आयबूची न् माझी जास्त भाषा झालीच नाही.

सकाळच्या न्याहारीसाठी ठेवलेली एक भाकरी मी काढली, वर थोडे तिखट आणि तेल घातले, आणि ती त्याच्या हाती दिली.

बसला त्याच स्थितीत त्याने एका हातावर ती बोलबोल म्हणता संपवली. मटमट आवाज करणारे त्याचे तोंड गप झाले. तांब्या भरून दिलेले पाणी तो ओंजळ लावून प्याला. उंबऱ्याच्या खाली उतरून चूळ खळखळून आला. भिंतीला लागून त्याने तो मोकळा तांब्या पालथा घातला आणि बाहीला तोंड पुसून परत इकडेतिकडे बघत पहिल्यासारखा बसून राहिला.

आढ्याकडे बघत मीही पाचदहा मिनिटे वळकटीला टेकून पडून राहिलो.

आणि आयबूचे जड श्वास ऐकू येऊ लागले. त्याच स्थितीत गुडघ्यात मान घालून तो झोपला होता. निवारा मिळाला, पाणी पिण्यापुरती भाकरी मिळाली. गडद झोप लागली. मी खालचे घोंगडे काढून त्याच्याकडे टाकले. ते अंगावर पडताच तो जागा झाला. जड झालेल्या डोळ्यांनी त्याने एकवार माझ्याकडे आणि एकवार त्या घोंगड्याकडे बघितले. मी चादर अंथरून त्यावर पडतो आहे हे ध्यानी येताच त्याने घोंगडे घेतले. अर्धा भाग खाली घेतला, अर्धा अंगावर घेतला. दूधभात खाऊन मांजर झोपते, तसा आयबू झोपला. वेताबेताने घोरू लागला.

भाला वागवणाऱ्या त्या दादूला यापुढे मुळींच भीक घालायची नाही, असा निश्चय मी स्वतःशी केला. मुळात मी भित्रा माणूस मुळींच नव्हतो. गेल्या एवढ्या टीचभर आयुष्यात मी अनेक भलेबुरे अनुभव घेतले होते. सामान्य मुलाच्या वाट्याला क्वचित येईल असले आयुष्य भोगले होते. पण त्या मानाने हा अनुभव वेगळा होता, म्हणून एकदम मी गांगरून गेलो. पण त्या गांगरण्याची उलटी प्रतिक्रिया म्हणूनच की काय, विलक्षण बेरडपणा माझ्यात आला. आणि वारा येण्यासाठी खोलीचे दार मोकळे सोडून, आयबूइतक्याच निष्काळजी मनाने मीही गडद झोपी गेलो !

## ५

बनगरवाडीची बहुतेक वस्ती धनगरांची होती. रंगाने काळेभोर असलेले हे धनगर सदोदित उघडे वावरत. बाहेरच्या जगाविषयी त्यांना विशेष ज्ञान नव्हते. ते नव्हते याची जाणीवही नव्हती. भल्या सकाळी उठून, रात्रभर वाडग्यात कोंडलेली मेंढरे घेऊन ते वाडीबाहेर पडत. तीनएक मैलांवर गवताळ कुरण होते, तिकडे जात. शंभरशंभर मेंढरांमागे एक धनगर आणि एक कुत्रे असे. खाली मान घालून फुर्रफुर्र



करीत मेंढरांचा कळप सारखा हलत राही. नाना जातींच्या गवताचे बी त्यांच्या लोकरीला चिकटून इकडून तिकडे प्रवास करी. जागजागी पडे. पुढच्या वर्षी मेंढरांना खाण्याजोगे गवत त्यातून जन्म घेई. खांद्यावर काठी टाकून धनगर मेंढरांमागे हिंडत राही. कडक उन्हामध्ये तळत तो दिवसभर उभा असे. त्याचे कुत्रेसुद्धा कंटाळून जाई. टुणटुण उड्या मारणाऱ्या टोळाचा पाठलाग कर, काळसर रंगाच्या सरडयामागे धाव, उगाच भुंक—असले काही काही करून त्याला आला कंटाळा घालवावा लागे. धनगराचेही तसेच होई. मग कधी एखादे तल्लख मेंढरू निवडून तो त्याच्या गळ्यात घुंगरू बांधी. भाकरी खायला बसला म्हणजे भाकरीचा तुकडा त्याच्या तोंडात देई. पीक आढळले की एक-दोन कोवळी ज्वारीची कणसे खुडून ती चारी. असे वागवल्याने सवयीचे होऊन ते मेंढरू कुत्र्यासारखे त्याच्या मागून जाई. इतपत तयारी झाली की मग इतर मेंढरे माळावर चरू लागली म्हणजे करमणुकीखातर तो त्याला काठीवरून उडी मारायला शिकवी. बैस म्हणताच बसावे आणि ऊठ म्हणताच उठावे, अशी सवय त्याला लावी.

कधी हाती नेहमी असलेल्या कुऱ्हाडीने बाभळीची काठी तोडून ती ताशी तर कधी फासे लावून कबूतर पकडी.

मेंढरे चरत आणि मेंढके असे काही करून वेळ घालवीत.

पण अशी एकुटपणाची वेळ त्याला क्वचित येत असे. कारण बहुधा तीनचार मेंढके मिळून आपली खांडे चारीत. दुपार झाली की आळीपाळीने विहिरीवरून आंघोळी करून येत. जसजशी उन्हे चढू लागत तसतशी मेंढरेही दमगीर होऊन पाण्याकडे जाऊ लागत. सुकल्या ओढ्याओघळींला असलेले हिरव्यागार शेवाळाखालचे पाणी पिऊन ती जोगावत आणि अपुऱ्या सावलीला उभी राहात. मग मेंढकेही सावली बघत आणि एकत्र बसून भाकरी खात. ती खाऊन झाली की नजर द्यायला एखादा मेंढका जागा राही. आणि दोघे घोंगड्यांचे बोळे उशाशी घेऊन पटक्यांचे शेमले तोंडावर टाकून डुलक्या घेत. त्यांची कुत्री गार ओल्या वाळूत अंग घोळसून ल्हा-ल्हा करीत बसत.

दिवस थोडा उरला की मेंढके गावच्या दिशेने मेंढरे वळवीत. माळावरचा चघळ-

चोथा टिपटिपत गावाशेजारी यायला त्यांना संध्याकाळ होई. गाव जवळ आले की एक-एक मेंढका बाजूला उभा राही. आणि आपआपली मेंढरे बोलावून घेई. पुन्हा एकाची तीन खांडे होत.

नवऱ्याला माघारी घरी राहून रहाटावर वा टकळीवर लोकरीचे सूत काढणाऱ्या बायका मेंढरे येताच लगबगीने उठत. कोंडून ठेवलेली लहान कोकरे सोडत आणि चार काटक्या खुपसून चुलीला जाळ घालत. हा वेळपर्यंत बहुधा अंधार पडलेला असे. सर्वांच्याच घरी काड्याची पेटी नसे, तेव्हा बायका लामणदिवे घेऊन शेजारणीच्या दिव्यावर पेटवून आणत आणि चुलीला पेटत घालून ऊन भाकरी टाकत.

परत आलेल्या मेंढक्यांना 'मेंढरे जुळवणे' हा एक अर्ध्याएक तासाचा कार्यक्रम असे. घरी राहिलेली लहान पोरे आणि रानातून आलेल्या मेंढ्या यांचा एकच गोंधळ होई. आई पोराला शोधत राही आणि पोर आईला बोलवत राही. बें-बें, में-मेंचा एकच गोंधळ होई. भुकेली पोरे कुठल्याही मेंढीच्या कासेत शिरून ढुशा मारू बघत. आईला तो नवखा स्पर्श कळे, आणि ती उडी मारून बाजूला जायला बघे. त्या धडपडीत लहान पोरे कोलमडत, उताणी पडत. पोरांसाठी वेड्या झालेल्या मेंढीच्या लाथा त्यांच्या तोंडांवर, डोळ्यांवर लागत. साऱ्या गावभर हा गोंधळ चालू असे हजार-बाराशे मेंढरे आणि त्यांची चारदोनशे पोरे यांचे आवाज सारखे उठत राहात. मेंढक्याला आणि धनगरणीला साधे बोलणे ओरडून बोलावे लागे. मेंढरांच्या आवाजात हे उंच बोलणे मिसळे. वारा गुरगुरत वाहात राही. चिमण्या-कावळे गोंगाट करीत. मेंढरांनी टाकलेल्या लेंड्यांचा आणि मुताचा वास भपकारत राही.

या मेंढरांच्या गोंधळात शिरून मेंढक्याला मेंढरे जुळवावी लागत. ह्या गंगीचे हे लावार, ह्या भुरीची ही काळी पोर—असे करून जुळवावे लागे. चुकलेली पोरे मागच्या एका तंगडीला धरून तो चालवत आईपाशी आणी आणि कासेला लावून देई. असा प्रकार अर्धा-अर्धा तास चाले आणि मग गलगा खाली बसे. पोरे लुचताना होणारा मचमच आवाज तेवढा ऐकू येई. पोरांची धुळीने मळलेली अंगे मेंढ्या चाटत आणि पांढऱ्या घट्ट दुधाने पोरांची तोंडे माखून जात.

पाराजवळ एकमेकांना भेटलेले धनगर विचारत,

"जुळली का मेंढरं?"

"हां. तुजी गा?"

"जुळली!"

दरम्यान धनगरणीने चार भाकऱ्या टाकलेल्या असत. मटकी-मुगाचे कोरड्यास गाडग्यामध्ये उकळत असे. मेंढरांची उस्तवारी करून मेंढका घरात जाई आणि सकाळपासून उभी असलेली त्याच्या हातातली काठी आडवी होई. चूल भरून तो दोन पायांवर बसे आणि अपुऱ्या उजेडात भाकरी खाऊ लागे. जेवण किंवा भोजन

हा शब्द तिथे माहीत नाही. भाकरी खाणे! जेवण म्हटले की त्यात कदाचित आणखी एखादुसरा पदार्थ येतो, तो धनगरांना ठाऊक नाही. त्याची जरुरीही नाही. ते फक्त दोन वेळा भाकरी खातात. हिरव्या भाजीच्या पाल्याशी, एका कांद्याशी, चिमूटभर चटणीशी किंवा मिठाशी! दिवसभर कष्ट करून ते फक्त भाकरी खातात!

भाकरी खाल्ली की दिवसभर हिंडलेल्या मेंढक्याच्या ती हातीपायी उतरे. कांबळे घेऊन तो घराबाहेर पडे. घटकाभर चावडीपुढे बसून चार गोष्टी करी. आणि पुन्हा वाडग्याशेजारी जाऊन पडे. त्याचे इमानी कुत्रे अंगाचे वेटोळे करून पायांशी बसे. वाडग्यात मेंढरे झोपत, घरात धनगरीण लहान पोराला पुढे घेऊन झोपे आणि वाडग्याच्या दाराशी, उशाशी कुऱ्हाड ठेवून मेंढका झोपे. सर्वांच्या झोपा गडद असत; पण मेंढका आणि कुत्रा सावध असे.

पहाटे मेंढरे जागी होऊन धडपडत, खळाखळा मुतत, लेंड्या टाकत. भल्या सकाळी मेंढका जागा होई. वाडग्यात मेंढरांचा गलगा चाललेला असे. त्यांना मोकळे करताच आवारात पुन्हा पोरे आयांच्या कासेला ढुशा मारू लागत. सकाळचा थंड वारा हुंगत मेंढ्या स्वस्थ चित्ताने उभ्या राहून आपल्या पोरांना पाजत. वाडग्यात लेंड्यांचा खच पडलेला असे. मुताची थारोळी झालेली असत. हाती खराटा घेऊन मेंढका वाडगा स्वच्छ झाडून काढी. ते मोलाचे खत पाट्यापाट्यांनी उचलून नेहमीच्या ढिगावर टाकी. धान्याच्या ढिगासारखे लावलेले हे लेंड्यांचे ढीग वर्षाशेवटी आस-पासचे शेतकरी विकत घेऊन जात, म्हणून मेंढका हे काम नीट काळजीपूर्वक करी. हे होईतो पोरांची पोटे दुधाने भरलेली असत. उड्या मारत, आखूड शेपट्या लुटूलुटू हलवीत, ते लोकरीचे गोळे इकडेतिकडे करीत असत. त्या सर्वांना गोळा करून मेंढका शिस्तवार कोंडून टाकी. धनगरणीने केलेली ऊनऊन भाकरी शेरडाच्या दुधात मुरगाळून सकाळची न्याहारी करी. दुपारच्या जेवणासाठी दोनचार भाकरी, मिरचू बांधून घेई. आणि घोंगडे-काठी घेऊन मेंढरांना इशारा करी. रानात जाण्यासाठी आतुर झालेली मेंढरे उठत, उंच स्वरात ओरडून कोंडलेल्या पोरांना जातो असे सांगत. पोरांचा आतल्या आत गोंधळ चाले आणि मग वरचेवर मागे बघत, ओरडत, लेकुरवाळ्या मेंढ्या चालू लागत.

सकाळची कोवळी उन्हे निबर होण्याअगोदर मेंढरांचे वाडगे मोकळे होत. दूरची राने तुडवीत मेंढरे घेऊन जात. ही मेंढरे गेली की, वाडीतले चैतन्य गेल्यासारखे होई., मग शेतकरी होते ते गुरेढोरे घेऊन रानात जात. लहान पोरे शेरडांमागे जात. बायाबापड्या तान्ही पोरे काखेला मारून, डाल पाटीत घालून रानात कामाला जात. त्यांच्या मागोमाग पाळीव कुत्री जात. दुपार होई तेव्हा रहाटावर लोकर कातणाऱ्या बायकांवाचून वाडीत कोणीही दिसत नसे.

# ६

अलीकडे नियमाने आठबारा मुले शाळेत येत होती. ज्यांना रोजगारावर जाता येत नव्हते, शेरडांमागे जाणे जमत नव्हते, अशीच लहानलहान पोरे, पण ती येऊन शाळेत बसत होती. आणि मी त्यांना 'ग-म-भ-न'चे धडे गिरवायला देत होतो.

दिवस उगवला, वाडग्यात कोंडलेली मेंढरे बाहेर पडली, की उघडीवाघडी पोरे शाळेत येत. तोंड न धुता, डोळे न धुता, अंगात कुडते अडकवून, डोईला तांबडा पटका गुंडाळून येत आणि शेणाने सारवलेल्या जमिनीवर एकमेकांशी भांडत बसून राहात. पाटीवर पेन्सिली कुरकुरू लागत. थुंकीने पाटी पुसण्याचा सपाटा चाले. वरचेवर कुणीतरी करंगळी दाखवून बाहेर जाई. शाळेच्या पाठभिंतीची दगडे गाठून काही पोरे टोक येण्यासाठी पेन्सिली त्यांच्यावर घासत. अशा घासण्याने पाठभिंतीची बरीच दगडे विभूती लावल्यासारखी दिसत. पेन्सिली लवकर संपतात म्हणून पोरांचे आईबाप माझ्याकडे येऊन तक्रारी घालत. येताना तोंड धुवून यावे, पाटी पुसण्यासाठी पाण्याचा बोळा घेऊन यावे, यासाठी मी अनेकवार सांगूनही सुधारणा झाली नाही. तोंड धुण्यासाठी परत घराकडे पाठविलेला मुलगा बहुधा माघारी येत नसे. पाण्याचा बोळा तासा-दोन-तासांतच वाळून जाई आणि पुन्हा पोरे पहिलीच सोपी पद्धत वापरत. शाळेतल्या अनिवार चिलटांमुळे कुणातरी मुलाचे डोळे हटकून येत. त्याच्या वासाने दुसऱ्याचे येत. दुखऱ्या डोळ्यांमुळे मुले रडत, नाचत, आणि त्यांच्या आया डोळे बरे होण्यासाठी, दुधाने भिजलेले कापसाचे बोळे झोपताना मुलांच्या डोळ्यांवर ठेवत. मावल्या आईला नवस करत.

सकाळी लवकर भरलेली शाळा साडेदहा-अकराला सुटे. आरडाओरड करत, धावत, पळत धनगरांची मुले घरी जात. पुन्हा तीनला शाळा भरे आणि सहाला सुटे. डांबून ठेवल्याप्रमाणे मुले मरगळून जात, तरीही शाळेपुढे लोंपाट खेळण्याची गर्दी उडे. चांदण्यारात्री हा डाव बराच वेळ चाले. रानातून परत आलेली तरणीबांड पोरेही त्यात भाग घेत. कधीकधी मलाही आत घेत. पिठासारख्या स्वच्छ चांदण्यात लोंपाटचा डाव रंगे आणि मारुतीच्या कट्ट्यावर, लिंबाच्या पारावर बसून मोठी मंडळी खेळ बघत. कधी काही नादी मंडळी लेझीमसाठी कडे धरत. हलगीचा शेडा होई. तास-दोन-तास लेझीम खळखळत. पटांगणात दगडाच्या एकदोन लहानमोठ्या गोट्या आणि नाल होते. वाढीला लागलेली पोरे यावर ताकत अजमावत. एका हाताने तो जडशीळ नाल पुरुषभर उंच कोण उचलतो याची चढाओढ सुरू होई. डोक्याचे पटके हाताला गुंडाळून पोरे नालाचा पुरुष करीत. डोक्यावर नेऊन तो

नाल जमिनीवर टाकीत. जमीन हादरे. मोठमोठ्या गोट्या दोन्ही हातांचा वेढा घालून छातीइतक्या उचलून टाकल्या जात.

गावापासून दोनतीन फर्लांगांवर असलेल्या वस्तीवर राहात असलेल्या बिरा बनगराचा एक मुलगा सता अलीकडे शाळेत येऊ लागला होता. पूर्वीच्या मास्तराने चार अक्षरे नीट शिकवल्यामुळे जी चारसहा मुले पुढे प्रगती करीत होती त्यांत सता उजवा होता. बारातेरा वर्षांचे वय असलेले हे पोर केवढेतरी ताडमाड वाढले होते. इतर मुलांपाशी नसलेला समज त्याच्यापाशी होता. शिकण्याची आवड होती. शाळा सुटली तरी पारावर बसून तो धडा घोकत बसे. एरवी माझ्या खोलीत येऊन हिशेब, गणिते विचारीत बसे. शिक्षणाकडे असलेला हा त्याचा कल बघून मी एकवार विचारले,

"किती शाळा शिकण्याचा विचार आहे, सता?"

सता म्हणाला,

"पाक सातवी पास करायची!"

"तालुक्याला जावं लागेल."

"जाईन."

"बाप शिकायचं म्हणतो का?"

"त्याचं कोण ऐकतंय?"

पोरे शिकली म्हणजे त्यांचे शेतीतले लक्ष उडते, पांढरी कापडे घालून हिंडायचा नाद लागतो, असे मत असलेला बिरा या पोराला शिकू देईल की नाही, याची शंका होती, तरीपण मी सताकडे विशेष लक्ष देऊ लागलो. या शाळेतून एखादा हुषार विद्यार्थी बाहेर गेला, तरी मला पुरे होते. तसा कुणी जाण्याजोगा पोरगा म्हणजे सताच होता. साहजिक तो माझा आवडता विद्यार्थी झाला.

या आठबारा मुलांव्यतिरिक्त रोज शाळेत येऊन बसणारे आणखी तिघेजण होते. आयबू मुलाणी, आनंदा रामोशी आणि रामा बनगर.

हे तिघेही बहुतेक, दिवसातील काही वेळ का होईना, शाळेत येत आणि भिंतीला टेकून उगीच बसून राहात. काही बोलत नसत, काही करत नसत, पण येत. पोरांच्या तोंडांकडे, माझ्या तोंडाकडे, बघत निवांत बसून राहात. त्यांचा काही त्रास मला होत नसे. पण उगाच इथे येऊन ही मंडळी वेळ का घालवीत असतील याचे मात्र कुतूहल वाटे. पण नंतर मला कळले की, वेळ घालवणे हाच त्यांचा त्यात प्रधान हेतू होता.

मळक्या अंगाचा आणि मळक्या कपड्यांचा आयबू तर मोकळाच होता. त्याला उद्योग करावा लागत नव्हता. कारण माणसाने उद्योग करायचा तो पोट भरण्यासाठी; पण आयबूचा तो प्रश्न सुटला होता. तो जातीने मुलाणी आहे हे कळताच वाडीच्या लोकांनी त्याला आनंदाने गावी ठेवून घेतले होते. कारण वेळप्रसंगी बकरे कापायला मुलाणी लांबून आणावा लागे, खोळंबा होई. ती आयती सोय झाली होती. एवढी



55415

सवड मिळताच भाकरीचा प्रश्न आयवूने आपणहूनच सोडवला. दुपारची वेळ झाली की तो चार घरे मागी आणि ऊनऊन भाकरीकोरड्यास घेऊन येई. कुठेही बसून खाई आणि ढेकर देई. त्याने सारा व्यापच मिटवला होता. आयवूच्या गरजा जास्त नव्हत्या, आणि गावाला चारदोन भाकरींचा तेगार नव्हता. झोपण्याच्या जागेविषयीही त्याला अडचण नव्हती. चावडी होती, पटांगण होते, माझी खोली होती. अंथरुणा-पांघरुणाची गरज त्याला कधीच नसे. भटके कुत्रे, रानातली जनावरे जशी झोपतात, तसेच निश्चिंतपणे कुठल्याही जागी तो झोपू शकत असे. थंडीपावसालाही त्याने आपले अंग टणक केले होते.

पस्तीस-चाळीस वयाचा आनंदा रामोशीही मोकळाच होता. तो उंचीने बुटका आणि अंगाने वाळलेला होता. दाढीची खुटरे सदोदित वाढलेली. वाढलेल्या केसांवर एक गांधीटोपी, अंगात नुसता कोट आणि खाली आखूड चड्डी, अशा वेषात तो नेहमी असे. वाडीत जी रामोशांची चारदोन घरे होती त्यांपैकी हा एक. हे सारेच रामोशी कधी कसलाही उद्योग करीत नसत, तरी त्यांचे पोटपाणी चाले.

खाण्याची पंचाईत उभी राहिली की आनंदा एक कांबळे खांद्यावर टाकून तिसऱ्या प्रहरी गावाबाहेर पडे. वाडीच्या आसपास, तीनचार मैलांवर दुसऱ्या गावांची राने होती. त्या रानांच्या बांधांवरून तो फिरत राही. रानात असलेल्या मालकाने विचारले,

"कुठे आनंदा ?"

तर हा म्हणे,

"जातो रामा लिगाड्याच्या रानात."

रामा लिगाड्याने विचारले,

"कुठे तयारी रे बेरडा ?"

तर हा रामराम घालून म्हणे,

"चालशो तुका कारंड्याच्या मळ्याकडं."

तुका कारंड्याने विचारले,

"काय आनंदा, कुठे तयारी ?"

तर आनंदा समोर हात करून म्हणे,

"जरा भोसल्याच्या शिवारातून येतो."

असे फिरूनफिरून तो कुठे कांदे आहेत, कुठे वांगी आहेत, कुठे ज्वारी आहे, कुठे बाजरी आहे, हे ध्यानात ठेवी; आणि रात्र झाली, मळेकरी गावात गेले, राखणदार झोपी गेले की, या रानातली चार कणसे, त्या रानातली दोन कणसे, इथल्या मूठभर मिरच्या, तिथली दोन वांगी, असे करून घोंगड्याची खोळ भरी आणि मध्यान्हरात्री वाडीला परत येई. सकाळ होईतो त्याने ती कणसे बडवून ज्वारी काढलेली असे. बायकोने दळून पीठ काढलेले असे! वांगी शिजलेली असत! एवढ्या मोठ्या शिवारातली चार कणसे गेल्याचे मालकाच्या काही ध्यानात येत नसे.



पाखरानें खाल्ले की जनावरानें ओरबडले याचा पत्ता लागत नसे. आनंदावर आळ येत नसे! वर्षानुवर्षे त्याचा हा उद्योग चालू होता. लहान चोऱ्या हा त्या माणसाने जीवनाचा धंदा निश्चित केला होता, आणि त्यांच्या पद्धती ठरवल्या होत्या. अंगच्या कसबाने त्याचा धंदा उत्तम चालला होता. पुष्कळ वेळा बारीकसारीक चोऱ्या, आठपंधरा दिवसांनी मालकांकडे जाऊन तो कबूल करी. आपणहूनच विचारी,

"का पाटील, तुमच्या रानातली वांगी कुणी तोडली का तुमच्या माघारी, ह्या आठपंधरा दिसांत?"

"होय रं आनंदा, कोन चोरटा सोकलाय कुनास ठावं, वटाभर वांगी गेली बग माजी!"

"असं? मीच नेली वांगी."

"लेका, वर आणखी सांगतोयास बिनअब्रूच्या!"

"कबूल केल्यावर चोरीचा डाग जातो मालक. अवं, द्या म्हनल्यावर कुनी काय देत न्हाई; मग काय करावं? किडामुंगी, राघूकावळं इतकं धान खात्यात ते काय इचारत्यात का तुमाला? त्येस्नी जसं तुमी काय करत न्हाई तसं मलाबी करू नका. खाल्लं पाखरानं म्हना आन् जा इसरून."

आनंदाचा हा स्वभाव आता सर्वांना माहीत झाला होता.

कधी फावल्या वेळात तो दोन सोबती घेऊन रानात जाई आणि एखादा ससा, एखादी घोरपड मारून घेऊन येई. तोंडाला फारच आळणी आले तर एखादे परगावचे मेंढरू चोरून आणी. त्याची कापाकापी, शिजवणे, जेवण—सगळे परस्पर कुठेतरी रानात उरकले जाई. आनंदाचे भाईबंद असे जगत होते. आनंदा असा जगत होता. कधीमधी मिळणारा रानातला रोजगार सोडला तर वर्षानुवर्षे त्यांचा धंदा हाच होता.

रामा बनगर हा माणूस मात्र चांगला मुलेबाळे असलेला होता. वयाने तीस-पस्तिशीचा असावा. ओठावर मनगटासारख्या मिशा आणि मोठे जाबाड, यामुळे तो चांगला दांडगेश्वर दिसे. त्याच्या घरी शंभर मेंढरू होते; पण त्याची उसाभर बाप करत होता, पोरगा करत होता. रामाला उद्योग नव्हता. नव्हता म्हणण्यापेक्षा तो करत नव्हता. तोही शाळेत येऊन उगाच बसे.

अनेक दिवस तो असा न बोलता बसत होता. शाळा सुटली की अंगावरचे कांबळे उचलून घराकडे जात होता. प्रथमप्रथम मी त्याला विचारीत असे. "काही काम

आहे का? का आला?" म्हणत असे. पण यावर तो राठ आवाजात म्हणे,

"काय न्हाई. आपला असाच आलोय."

अनेक दिवस शाळेत असे बसून बसून एकवार तो म्हणाला,

"मास्तर, माझं एक काम आहे तुझ्याकडं."

शाळा सुटली होती. आनंदा, आयबू गेले होते. मी आणि रामा दोघेच शाळेत होतो. कधीही न बोलणारा हा माणूस बोलला याचे मला आश्चर्य वाटले.

याचे काय काम माझ्याकडे असावे याचा अंदाज लागेना. "काय, बोला की."

रामा लवकर बोलला नाही. खाली मान घालून त्याने काही वेळ घेतला. बोलावे का नको असे अजूनही त्याच्या मनात चालले असावे.

त्याचा संकोच जाण्यासाठी मी म्हणालो, "काय काढलंय रामभाऊ?"

मग इकडे तिकडे बघून रामा म्हणाला, "माझ्याजवळ एक बुचड्याचा रुपया आहे—"

बुचड्याचा रुपया म्हणजे राणीछाप रुपया. राणीनें केसाचा बुचडा घातल्यासारखे चित्रात दिसे. तो सरकारने बंद केला होता.

"बरं, मग?"

"बंद झालाय म्हनं तो! मला गरिबाला उगीच खोट आलीया बघ!"

"हो बंद झालाय खरा. आता बाजारात तो चालत नाही."

"तू तालुक्याला जातो-येतोस. चालला तर बघ तुझ्या वजनानं. मेहरबानी होईल."

मला चालेल का नाही याची कल्पना नव्हतीं. कधी प्रसंग आला नव्हता. प्रयत्न करून बघायला हरकत नाही म्हणून मी म्हणालो, "बघतो चालला तर—द्या माझ्यापाशी."

रामा होकार देऊन उठून गेला. रात्री घरी आणून त्याने तो रुपया माझ्यापाशी दिला. एखादे जडजवाहीर देतात तसा दिला. तो देताना त्याचा जीव धाकधूक करत होता हे मला समजले. रुपया मास्तरने खाल्ला तर?

## ७

शनिवारी सकाळची शाळा करून मी विभूतवाडीला गेलो. दीड दिवस घरी काढून परत शाळेला रुजू झालो. रामाच्या रुपयाची मला आठवण झाली. तो मी मोडून आणला होता. पण दोनचार दिवस रामा शाळेत आला नाही. चौकशी करता समजले की, त्याचे एक मेंढरू चुकले आहे, ते शोधण्यासाठी तो कुठे परगावी गेला आहे.

यानंतर तो शाळेत आला तेव्हा मी खिशातून पैसे काढले आणि त्याला दिले.

"तुमचा रुपया मोडला—ही मोड."

मी शिकवण्याच्या नादाला लागलो. मोड धोतराच्या कोपऱ्यात बांधून रामा बाहेर केव्हा गेला ते मला कळले नाही.

रात्री जेवण करून मी वाचीत बसलो होतो, तेवढ्यात तो परत आला. कधी नव्हे तो माझ्या घराकडे आला. आणि भुईवर बसला.

मी विचारले, "काय रामभाऊ, मेंढरू मिळालं का?"

"हां मिळालं. हितंच—शेजारच्या वस्तीवर घावलं!"

"मग चार दिवस बरे लागले?"

"पावण्याकडं गेलों मेटकरवाडीला."

मी पुढे वाचू लागलो. रामा बसला बसला आणि म्हणाला,

"मास्तर, माझ्या रुपयाची मोड कशी आणली?"

"आणली एका वाण्याकडनं. ओळखीचा होता."

"ते न्हाई विचारत. कशी म्हंजे कनवटीला लावून आणली, का खिशातनं आणली अंगरख्याच्या, का कशी?"

मला प्रश्नाचा रोख कळला नाही. म्हटले,

"विजारीच्या खिशातनं आणली. का?"

"पक्कं अगदी?"

"हो, का?"

"मग याद करून बघ, तुझं काही पैसं होतं का त्याच खिशात?"

उत्तर द्यायला मला थोडा वेळ लागला.

"होते; पण का?"

"मग लागला हिशोब. पैसे जास्ती आलेत आमाकडं."

आणि असे म्हणून त्याने खिशातून चंची काढली, आणि त्यातले दोन आणे काढून माझ्यापुढे ठेवले.

ते दोन आणे बघताच सारा प्रकार माझ्या लक्षात आला. बुचडेवाल्या राणीचा रुपया बंद झाला होता तरी त्यात चांदी असल्यामुळे काही व्यापारी अठरा आणे देऊन तो घेत होते. त्या हिशेबानुसार रामाच्या रुपयाचेही अठरा आणे आले होते. हा खुलासा पैसे आणल्यावेळीं करायला मी विसरलो. रामाने घरी जाऊन चार-चार आण्यांचे चार ढीग घालून बघितले, पण चार ढिगांशिवाय दोन आणे वर येऊ लागले. तेव्हा साहजिकच मास्तराने चुकून जास्ती पैसे दिले अशी त्याची समजूत झाली आणि तो चौकशीसाठी परत आला.

हा सगळा खुलासा त्याच्यापाशी करून मी ते दोन आणे उचलून त्याच्याकडे टाकले, तेव्हा त्यातील एक आणा माझ्याकडे फेकून तो म्हणाला,

"मग हे राहू दे तुला—पानतमाखूला."

मी तो आणा घेतला नाही. रामजीने कितीही गळ घातली तरी घेतला नाही.

रामानें विचारले, "रुपया चालतो म्हणायचा मग?"

मी म्हणालो, "हो, चालतो. नुसता नाही—दोन आणे फायदाही होतो!"

"हे आमाला ठावं कुटाय! गावात कैक जणांपाशी रुपयं पडून हायेत. दहाबारा निघतील. मोडून आणशील का?"

"गावाचं गाव बघील. तुम्हांपाशी असतील तर द्या. मी आणीन."

पुढच्या आठवड्याला निघालो तेव्हा रामानें बारा रुपये माझ्यापाशी दिले. ते मी अठरा आण्यांप्रमाणे मोडून आणून दिले. पानतमाखूला चार आणे घेण्याबद्दल रामानें पुन्हा आग्रह केला. मी नाही म्हटले.

मग त्यानें रात्री मला घराकडे बोलावले. त्या अंधाऱ्या घरात मी वाकून शिरलो. तेव्हा चुलीपुढे चिलीम ओढीत एक साठ-सत्तर वर्षांचा म्हातारा बसला होता. रामाची बायको आतबाहेर करत होती.

बसायला कांबळे टाकून रामानें शेरडाचे दूध थाळीतून प्यायला दिले. ते निवण्याची वाट पाहात मी थांबलो, तेव्हा चुलीपुढच्या म्हाताऱ्याकडे बघून तो म्हणाला,

"ह्यो माजा बा."

म्हाताऱ्यानें अंगावर लपेटून घेतलेल्या पांघरुणातून गडबडीनें हात काढले आणि रामराम केला.

रामा म्हणाला, "सत्तर वरसं झाली. आठ वर्सांचा हुता तवाधरनं मेंढरं राखतोय. त्याला दुसरं काय ठावं न्हाई!"

वयाच्या आठव्या वर्षापासून आजतागायत या माणसाने मेंढरे राखण्यावाचून दुसरे काही केले नव्हते! आणि आजही तो तेंच करत होता. नातवाबरोबर दिवसभर मेंढरांमागे हिंडत होता. तोंडावर सुरकुत्यांचे जाळे झाले होते. केस पार पिकून गेले होते, तरी हा म्हातारा हातात काठी घेऊन मेंढरांमागे जात होता. त्याला दुसरे काही ठाऊक नव्हते. बैलगाडी कशी जुंपतात हे त्याला सांगता आले नसते. पण कुत्र्याला यावा तसा लांडग्याचा वास त्याला येत असे. रानात रात्रीच्या वेळी मेंढरे खतासाठी बसवली असली म्हणजे एकाएकी म्हातारा नाक सुरू-सुरू करून म्हणे, "पोरानूं सावध ऱ्हा रे, लांडगा हाय आसपास!"

पोरे तयार होत. कुत्री कावरीबावरी होऊन बघू लागत आणि दूर उंचवट्यावर उभा राहून टेहळणी करणारा लांडगा दिसे! राखणीला सावध बसूनबसून त्याला अशी सवय झाली होती की अंग पसरून झोपण्याचे तो विसरलाच होता! बैल, घोडा जसा बसल्याबसल्या झोप घेतो तसा हा म्हातारा बसल्याबसल्या झोप घेई. जमिनीवर आडवे पडण्याची त्याला मुळी गरज वाटत नसे! एकमेकांच्या खांडांत मिसळलेली मेंढरे मेंढके कशी ओळखतात हे आपल्याला कोडे वाटते, पण म्हातारा काकुबा धनगर फारच पुढे होता. नव्यानें मेंढरे करायची झाली तर मालकाला मेंढरे विकत घेऊनच सुरुवात करावी लागत नाही. असा माणूस लोकऱ्याची एक वाटी

आणि त्यावर थोडा भंडार घालून चांगल्या मेंढक्याकडे जातो आणि ती खोबऱ्याची वाटी देऊन त्याला म्हणतो, "मी वेणं करतोय."

मग तो मेंढका आपल्या खांडातील शेलके मेंढरू काढून ते मागणाराला मोफत देतो. अशी दहापंधरा मेंढरे मिळवून सुरुवात केली जाते आणि दोनतीन वर्षांत बियाणे मागणारा दुसऱ्यास बियाणे देऊ शकतो. मात्र बियाणे म्हणून आणलेली मेंढरे विकायची नाहीत, कापायची नाहीत, हा नियम पाळला जातो

काकुबाकडून एकदा दोनपाच मेंढरे एका परगावच्या इसमाने नेली. पुढे एकदोन वर्षांनी म्हातारा त्या गावी गेला, तेव्हा त्या इसमाने चुकचुकून म्हटले, "काकू, तुजी चार बी मेंढरं मेली!"

"मेली? त्यांची काही वाढ गा?"

"न्हाई. वाढ न्हाई, काही न्हाई. बीमोडच झाला!"

म्हाताऱ्याला हे खरे वाटले नाही. तो म्हणाला, "तुझा वाडा मला दाखव."

त्या इसमाने तो दाखवला. बराच वेळ मेंढरे बघत म्हातारा हिंडला आणि काही वेळाने त्याने आपल्या मेंढरांची संतती शोधून काढली. तो म्हणाला, "ही दोन पोरं माझ्या मेंढीची हायेत!"

आणि ही गोष्ट खरी होती. खजील झालेल्या त्या इसमानेही ती कबूल केली.

रामा बनगराने आपल्या बापाविषयी ही माहिती सांगितली, तेव्हा मला नवल वाटले. मी काकुबाला विचारले, "काकुबा, हे तुम्ही कसं ओळखलं?"

म्हातारा म्हणाला, "त्याचं तोडगं असत्यात लेकरा. चेहरा, रंग, रूप कळल्याशिवाय कसं राहील? आता तू हायेस—तुज्या बाचं, तुज्या आईचं, तुज्या आज्याचं कायतरी तुज्यात उतरलं असंलच की. नाक म्हन, डोळे म्हन—कायतरी सारखं असंल!"

मग रामाने मला थोडे आत नेले. दिव्याच्या प्रकाशात तो आत गेला आणि एक लहान मडके घेऊन बाहेर आला. त्यात चांदीचे नगद रुपये होते. बुचड्याच्या छापाचे! मी बघतच राहिलो. या धनगराकडे एवढे पैसे असतील अशी कधी चुकूनही शंका मला आली नव्हती.



रामा म्हणाला, "लईदी साठवत आलोय बग. हे मोज आन् संगं विऊन जाऊन मोडून आन."

मी ते रुपये मोजले. तीनशेचाळीस भरले. आकडा सांगताच रामाने तो मानला आणि पैसे बिनघोरपणे माझ्या हवाली केले. मास्तराने पाच रुपये कमी मोजले असतील, किंवा एवढे पैसे मास्तर खाऊन टाकील, अशी शंका त्याला आली नाही.

मी म्हणालो, "रामभाऊ, हे इतके पैसे मोडायचे, नवे रुपये तुम्हांला द्यायचे म्हणजे काही दिवस लागतील. तुम्हांला नड नाही ना?"

रामा म्हणाला, "सावकाश मोड. महिनापंधरादी लागले तरी हरकत नाही."

मी उठून घरी आलो.

## ८

मे महिना संपला आणि जून आला. उन्हाळा संपला, पावसाळा आला. इंद्रगोप दिसू लागले आणि मृग निघाला. आभाळ झाकोळून आले. स्वच्छ ऊन नाहीसे झाले. वारा सुटला. झाडेझुडे गदगदू लागली. धूळमाती चौफेर उडू लागली. आभाळाकडे बघून लोक म्हणू लागले, 'वारा पाऊस घालवील.' पण तसे झाले नाही. सडासडा धारा आल्या. मृगाचा पाऊस बनगरवाडीला झोडपत राहिला. भटकी कुत्री भिंतीच्या आडोशाला उभी राहिली. लवकर उघडीप होण्याचे लक्षण दिसेना. धनगरांची धावाधाव झाली. डोक्यावर रिकामे पोते घेऊन त्यांनी वाड्यात भिजणारी मेंढरे काढून झोपड्यात आणली. घरात दाटीवाटीने उभ्या राहिल्याराहिल्या मेंढरांनी अंगे झाडली. भिजल्या लोकरीच्या वासाने धनगरांची घरे दरवळली. सरीवर सरी आल्या. तापलेल्या जमिनीतून वाफा निघाल्या. धूळ उडाली. चिखल झाला आणि मग तोही वाहून गेला. खडे उघडे पडले.

काडाने शाकारलेली घरे गळू लागली. सुरेख सारवलेली जमीन ठिकठिकाणी ओली होऊन उखणू लागली, तेव्हा धनगरणी चरफडल्या आणि गळणाऱ्या जागी त्यांनी लहानमोठी भांडी ठेवून दिली. मेंढरांच्या धडपडीतूनही भरलेल्या भांड्यांत ठिबकणाऱ्या पाण्याचा आवाज कान किटवू लागला. धाब्याच्या घरातून गळू लागले. तेव्हा डोक्यावर रिकामी पोती घेऊन धनगर माळवदावर चढले. जिथे पाणी साचले होते, माळवदाला भोक पाडून आत शिरत होते, ती भोके त्यांनी दगडमाती घालून तात्पुरती बुजवली.

हवेमध्ये गारवा आला. धनगरांच्या कुऱ्हाडींवर गंज धरू लागला आणि धनगरणींनी साठवून ठेवलेले मीठ पाझरू लागले.

पोपटी रंगाच्या गवताने जमिनीतून डोकी वर काढली. अंगणात, माळवदावर,



छपरांवर—जिथे उगवू नये तिथे गवत उगवू लागले. सर्वत्र झगझगीत पोपटी रंग दिसू लागला.

अंगठ्याच्या नखावर बसू शकतील एवढ्या बारक्या बेडक्या एकाएकी दिसू लागल्या. वाटेने चालताना टणाटण उडू लागल्या. त्यांच्यावर कावळे झडपा घालू लागले. छोटीशी पंखे असलेले किडे हजारो-लाखोंनी उडू लागले आणि साळुंक्या-चिमण्यांनी त्यांचा फडशा पाडला. त्यातून वाचले ते दिवे लागताच त्यांवर झडप घालून मेले. दोन दिवसांनी त्यांची पातळ पंखे ठिकठिकाणी गळून पडलेली दिसली आणि पंख टाकलेले ते लहान अळीसारखे पिवळ्या रंगाचे किडे नाहीसे झाले. विटकरी रंगाचे लांबट वाणी एकमेकांच्या पाठुंगळी बसून अनेक पायांवर चालू लागले. बोटाएवढे काळे वाणी आळशीपणाने इकडेतिकडे करू लागले. माणसा-जनावरांचा स्पर्श होताच वेटोळे घालून पडू लागले. धनगरांची पोरे मुद्दाम हात लावून ते गोल पैसे तळहातातून नाचवू लागली. माशा फार झाल्या. झोपड्यांतून घोंगावू लागल्या. मेंढरांच्या नाकांवर बसू लागल्या. चिलटे फार झाली आणि धनगरांच्या डोळ्यांसमोर उडू लागली.

नांगरून पडलेल्या जमिनीतील ढेकळे विरघळली. जमिनींनी पाणी पिऊन घेतले. ठिकठिकाणी लहानमोठी डबकी साचली आणि निळ्याकाळ्या आकाशाचे प्रतिबिंब त्यांत दिसू लागले. रानातून जाताना लोकांच्या, मेंढरांच्या, गुरांच्या पायांना चिखलाचे लपके चिकटू लागले. माळरान भिजले आणि हिरव्यागार माळावर काळीभोर मेंढरे हिंडू लागली. आणि त्यांच्या पाठींवर बसून काळे कोतवालपक्षी घोगरा आवाज काढू लागले. कुणाच्याही दृष्टीला न पडण्याची खबरदारी घेऊन चित्तर उंच स्वरात ओरडू लागले.

## ९

एका ठराविक वेळेला शाळा भरवणे, सोडणे, हे बनगरवाडीच्या शाळेबाबत नेहमीच जमत नसे. साऱ्या जगाला उन्हाळ्यात सुटी तर इथे सुगीला सुटी. मन मानेल तेव्हा शाळा. मोटारसर्व्हिस जशी जागा भरल्यावर सुटते तसे मास्तराने शाळा भरल्यावर

शिकवावे. त्यामुळे मास्तराचे क्षेत्र शाळेपुरतें मर्यादित राहू शकत नव्हतें. कुणी पत्र लिहायला सांगत, कुणी अर्ज लिहायला सांगत. घरी जाण्यासाठी मी जेव्हा रविवारच्या सुटीत निघत असे, तेव्हा माझ्या कोटाचे खिसे पोस्टात टाकण्यासाठी दिलेल्या पत्रांनी भरलेले असत. ही कामे जेव्हा बिनतक्रार मी करू लागलो, तेव्हा कोणी काहीही विचारायला यावे असे झाले. नवराबायकोच्या भांडणापासून तो मेंढरांच्या चोरीपर्यंत सर्व तक्रारी मास्तराकडे येत. मास्तर शिकलेला, शहाणा माणूस. त्याला कायदा कळत असला पाहिजे, बरे-वाईट कोणते हे कळण्याची बुद्धी त्याच्यापाशी असली पाहिजे!

त्यामुळे शाळा नाही तरी या उलाढाली करण्यात वेळ जाऊ लागला. मुले कमी आहेत, अशी तक्रार खात्याकडून आली तर "शाळा नवीन आहे, सुगी सुरू आहे—" इत्यादी कारणे दाखवून मी गावाची शाळा संभाळू लागलो. शाळा म्हणजे कोर्ट, चावडी, पोलिसठाणे, म्युनिसिपालिटी—सर्व काही! आणि मास्तर म्हणजे जज्ज, पोलिसअधिकारी, पाटील-कुलकर्णी, आणि स्टॅंपव्हेंडरसुद्धा! पण वाडीचे भांडण वाडीबाहेर सहसा जात नसे. सारा निकाल तिथे चावडीपुढे दहा माणसे जमून दिला जाई. मास्तर आणि कारभारी, काकुबा, शेकुबा, असली वृद्ध मंडळी न्याय देत. दहा जणांनी सांगितल्या गोष्टीच्या पुढे अपराधी जात नसे. केलेला दंड, सांगितलेला न्याय तो मानी. नाही पटला तर अपील करण्याची मुभा त्याला असे. हे अपील म्हणजे धनगरांचे महादैवत बोलवावे लागे. धनगरांची बरीच मोठी जातकुळी एकत्र येई आणि मग न्यायदान होई. पण असे कुणी करीत नसे. कारण महादैवत बोलवायचे तर त्याला जेवण करावे लागे आणि एवढे मोठे जेवण म्हणजे बराच खर्च करावा लागे.

वाडीत लग्नेसुद्धा एकदम करण्याची पद्धत होती. दर वर्षी एक मुहूर्त बघायचा आणि त्याच दिवशी गावातली सगळी लग्ने उरकून घ्यायची. यामुळे सर्व गाव जेवू घालण्याचा भार एकावर पडत नसे. जी दहावीस लग्ने उभी राहात, त्यांच्या प्रत्येकाच्या वाटणीला दहावीस पाने येत. या लग्नाच्या दिवशी एखाद्या गरजूचे पैशा-अभावी अडत असले, की सर्व गाव एकत्र जमा होई आणि 'अमकातमका अडला आहे, त्याला धक्का देऊ या' असा विचार पक्का होई. सर्वजण त्याचा भार उचलत आणि त्या गरजूचे लग्न होऊन निघे.

दादूच्या धमकीला न जुमानता मी बेधडक गावात मिसळलो होतो. वाडीच्या लोकांचे पान मास्तराविना हलत नाही अशी परिस्थिती झाली होती.

वाडीत शेतकरी असे फार थोडे होते. मृगाच्या पावसाने जमिनीत गवताचे कोंब उठले. चांगले माजले. पेरण्याआधी कुळवाची एक पाळी घालून शेतकऱ्यांनी त्या भाकड गवताचा मोड केला. आणि मग पुष्यनक्षत्राचा पाऊस झाला. रानात चांगला चिखल झाला. लोक वापसा येण्याची वाट बघू लागले. तो आला. चिखल वाळला. बैलांचे पाय रुतू नयेत, टिपणीची भोके लिपू नयेत, इतपत रान फडफडीत झाले.

ओल खोल राहिली, आणि वरून जमीन हाडकली. मग पेरणीची गडबड सुरू झाली. बाजरीच्या, कडधान्याच्या पेरण्या सुरू झाल्या. बियाण्यांची ओटी घेऊन आणि टिपण जुंपून भल्या सकाळी लोक रानाकडे जाऊ लागले.

या पेरणीच्या धामधुमीत शेकू माझ्याकडे आला. हा फारसा गावात दिसत नसे. त्याच्या दोनतीन एकरांच्या तुकड्यात राबणे एवढेच त्यास माहीत होते. सकाळच्या प्रहरी अंगावर धोतर पांघरून तो माझ्याकडे आला. त्याचे हात दिसत नव्हते. ते धोतर त्याने अशा रीतीने पांघरले होते की त्याचे वाळलेले तोंड आणि चालूनचालून राट झालेली ओबडधोबड नखे असलेली पावलेच दिसावीत.

मी बसलो होतो. आयबू बसला होता.

शेकू उभ्या उभ्याच म्हणाला,

"मास्तर, एक बैल बगून दे की मला. पेरनी थटली गा!"

मी शाळामास्तर होतो. माझ्यापाशी बैल कुठून असणार? पण हे शेकूला सांगण्यात अर्थ नव्हता. तो म्हणाला,

"तू मागितलास म्हंजे मिळेल. माझ्यापाशी एकच हाय. एक मेला. दुसरा मिळाला तर पेरीन. न्हाई तर वरीसभर उपाशी मरन्याची पाळी हाय."

मी म्हणालो,

"पण कुणापाशी आहे ते सांग, म्हणजे त्याला मागीन."

"जेच्यापाशी हाय त्येची पेरनी हाये. आपला खोळंबा करून कोन देनार? मी सर्व्यांशी मागून आलो."

"मग मी कुणापाशी मागू?"

"ते तू काय बी कर, पण माजी नड भागव. सगळं गाव म्हणतं, मास्तर येळंला येतो, अडचण वळकतो. मग माझ्याएकीच का असं?"

इतका वेळ आयबू गप होता. तो शेकूकडे तोंड फिरवून म्हणाला,

"तू येडा काय रे शेकू? मास्तरापाशी बैल कुठला? ते काय शेतकरी का हेटे? उगाच काहीबी मागायला याचं? जा घरी!"

आयबूनं झिंजाडताच शेकू खाली आला. आपले चुकत तर नाही ना, अशी शंका त्याला आली.

"घरी जायाचंच, पर बगा की मास्तर जमलं तर!" तो नरम येऊन बोलला.

आयबू नेटाने उठला. त्याने शेकूच्या बाव्हट्यांना धरून पायऱ्या उतरायला लावले आणि म्हटले,

"शानाच हायेस शेकू! मास्तरनी बैल काय कडुसरीला लावलाय?"

आणि काकुळती येऊन काही पुटपुटत शेकू गेला.

परत येऊन आयबू म्हणाला, "त्येचं काय मनावर घेऊ नका मास्तर. ते उगीच भोळसट हाय!"

पण मला राहून राहून वाटले की 'ग-म-भ-न' लिहायला शिकविणे एवढेच आपण करतोय, पण यांची गरज वेगळी आहे. आयबूला कुटुंब पाहिजे. आनंदाला भाकरी पाहिजे. शेकूला बैल पाहिजे.

दोन दिवस शेकू चोहीकडे फिरला, पण त्याला बैल मिळाला नाही. तो घरी जाऊन मटकन बसला. बायकोला म्हणाला, "काय चालंना माझं."

शेकूची बायको गावातील सर्व धनगरणींपेक्षा मुंडा हात उंच होती. तिच्या अंगात ताकदही चांगली होती. शेतीची सर्व कामे ती पुरुषाच्या बरोबरीने करत असे.

डोक्याला हात लावून नवरा बसला तेव्हा ती म्हणाली, "कुणाकडं मागितला ?"

"सर्व्या गावभर फिरलो—बैल कोन देत न्हाई."

"मग हो ?"

"ह्या साली पोटानं मरायचं. उपाशी पाय घासून मरायचं."

नवऱ्याचे हे बोलणे त्या बाईने ऐकले. त्याचे तेल संपत आल्या दिव्यासारखे डोळे बघितले आणि ती धीराने म्हणाली,

"उद्या पेरायचं!"

"बैल ग ?"

"मी आनते."

"कुटून आनतीस ?"

"वाटेल तथनं आनीन."

"तरी पन—"

"तुमाला का पंचाईत ? मी बैल आनीन. सकाळीं उठून रानात जा म्हंजे झालं!"

बायको कुणाचा बैल आणणार याविषयी विचार करीत सकाळीं शेकू उठला आणि टिपण खांद्यावर घेऊन, एक बैल एका हातात धरून रानात गेला. गावाकडे तोंड करून बांधावर बसला. बायको येण्याची वाट बघू लागला.

तासभर गेला आणि शेकूची बायको येताना दिसली. तिच्यापाशी बैल नव्हता. शेकूचे तोंड उतरले. बायकोने पैज मारली, पण तिलाही बैल मिळालेला नाही. आता पेरणी होत नाही. सर्वांची झाल्यावर बैल मिळेल, पण त्याचा काय उपयोग ? पेरले तरी पीक मागास होणार. नीट साधणार नाही. वर्षापुरते धान्य नाही आले तर उपासमार होणार. गाव सोडून रोजगारासाठी गावोगाव भटकावे लागणार.

असा विचार मनात येऊन तो कष्टाळू धनगर दुर्मूखला आणि त्याची दणकट बायको रानात आली.

"का ग, मिळाला न्हाई बैल ?"

"न मिळायला काय झालं ? जुपा टिपन!"

"पर बैल कुटाय?"

"हाय मी. एका बाजूला बैल जुपा, एका बाजूनं मी रेटीन!"

बायकोच्या या बोलण्याने शेकू थरारून गेला. काय बोलावे हे त्याला कळेना.

"छया, असं ग कसं?"

पण त्या बाईने मनाची तयारीच केली होती. तिच्या शरीरावर तिचा विश्वास होता.

"कसं न्हाई आन् काय न्हाई. टिपन जुपा!"

नवरा जागचा हलत नाही, खाली मान घालून बसला आहे, बघताच ती उठली आणि तिने बैल जोडला. एकीकडचे जू आत होऊन आपल्या खांद्यावर घेतले आणि ओरडून ती म्हणाली, "हां, आवळा."

मग मनाचा धोंडा करून तो दुबळ्या शरीराचा नवरा उठला आणि चाड्यावर मूठ धरून त्याने इशारा केला. बैल हलला. बाई हलली. टिपणींचे फण ओल्या मातीत घुसले, आणि जमीन फाडत चालले. शेकूने बाजरीची मूठ सोडली. पोकळ बांबूतून दाणे खाली उतरले आणि त्यांनी जमिनीवर उड्या घेतल्या.



अंगच्या बळाने शेकूची बायको बैलाबरोबर टिपण ओढीत राहिली.

सकाळपासून दुपारपर्यंत शेकूने पेरले. मग धापा टाकणाऱ्या बायकोने आणि त्याने बसून मुकाट्याने भाकरी खाल्ली. शेकूला काही बोलणे झाले नाही. बायको काहीतरी बोलली. पुन्हा दोघांनी मिळून रासणी केली. म्हणजे कुळव फिरवून उघडे बी मातीखाली झाकून टाकले. संध्याकाळ होईपर्यंत दोन एकर रान या तिघांनी पेरून टाकले. सूर्य मावळला तेव्हा दमगीर होऊन तिघेही परत घराकडे आली.

ही बातमी गावात कळली, तेव्हा सर्वांनी नवल केले. त्यात कौतुकाचा, आश्चर्याचा, क्वचित कुचेष्टेचाही भाग होता.

रात्री शाळेकडून घराकडे जाताना शेकूच्या घरापुढे मी क्षणभर उभा राहिलो. आत चिमणीच्या प्रकाशात शेकूची बायको भिंतीला लागून पालथी पडली होती, आणि तिच्या पाठीवर उभा राहून शेकू तिचे अंग तुडवीत होता. त्याने दोन्ही हातांनी भिंतीचा आधार घेतला होता आणि सावकाशपणे तो एकएक पाऊल उचलून बायकोची दुखरी पाठ तुडवीत होता.

# १०

शनिवारची शाळा सोडून मी गावी गेलो आणि सहा कोस जमीन तुडवून परत आलो, तेव्हा पार थकून गेलो होतो. हे जाण्यायेण्याचे काम खरोखरीच कंटाळवाणे होते. शारीरिक श्रमांचा भाग सोडला तरी एवढा वेळ गाडीवाट तुडवीत येणे मला जिकिरीचे वाटे. शाळा सोडून निघायचे म्हणजे सकाळी दहा-अकरा वाजत. घरी पोचेपर्यंत दुपार टळे. तिथे पोचताच आईच्या हातचे जेवून मी कलंडे, तो संध्याकाळपर्यंत! रात्री झोप. रविवारी सकाळचे जेवण होते न होते, दिवस कलतो न कलतो, तो परत जाण्याचे वेध लागत. रात्री झोपतेवेळी पुन्हापुन्हा मी आईला बजावी, "आई, पहाटे लवकर जाईन, दशम्या कर." ती बिचारी एक झोप घेऊनच उठे आणि स्वयंपाकाला लागे. चांदणी उगवायच्या सुमारास पाठीशी दशम्यांची पिशवी मारून मी वनगरवाडीच्या रस्त्याला लागलेला असे. प्रत्येक शनिवारी जाणे-येणे ही काही फारशी सुखद गोष्ट नव्हती, पण जावे वाटे. घराची ओढ ही काही वेगळीच गोष्ट आहे.

माझ्या या पायपिटीची कणव आयबूलादेखील येई. तो म्हणे,

"मास्तर, बिऱ्हाड कवा करताय?"

"का रे?"

"पोटाचं हाल होत्यात. लगीन करा आन् बिऱ्हाड करा."

लगीन करून बिऱ्हाड करायचे ते पोटाचे हाल होऊ नयेत म्हणून! नाहीपेक्षा लग्नाची तशी जरुरी आयबूला वाटत नसावी. खरे आहे. त्या बापड्याला जे जाणवले तेच त्याने बोलून दाखवले. हाताने तुकडे भाजून खायचा कंटाळा कोणा पुरुषाला येत नाही? पण केवळ त्यासाठी सगळे सोडून लग्न करावे, असा विचार माझ्या मनातही आला नाही. फारच कंटाळा आला म्हणजे एखादा आठवडा मी जाण्याचे टाळत असे. गेलो म्हणजे सोमवारचा मंगळवार करीत असे. एरवी पायपीट चालू होती.

या खेपेला उशिरा निघालो होतो. गावात आलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. मेंढरे अद्याप रानातून परतली नव्हती. या खेपेला रामाचे पैसे मी बदलून आणले होते. सर्व वाटेने येताना दशम्यांच्या पिशवीत असलेल्या धनाचे ओझे माझ्या डोक्यावर होते. ती पिशवी गच्च धरून चालताना, या वेळी अचानक कोणी आले आणि आपल्याला लुटले तर केवढा भयंकर प्रसंग येईल असे वाटून मागेपुढे बघत मी फार झपाट्याने पाऊल उचलले होते. गावात शिरताच ते ओझे, दडपण निघाले.

खोलीचे दार उघडून मी दिवा लावला आणि हातपाय धुवून जरा टेकून बसलो. खूप चालून आल्यावर पाय पसरून बसणे ही किती सुखाची गोष्ट असते, हे कळण्यासाठी ते अनुभवले पाहिजे !

पावसाळी हवेमुळे भिंतीला लोणा आला होता. चारदोन दिवस मोकळी हवा न आल्यामुळे खोली कुबट झाली होती. कोपऱ्यात बसून राहिलेले डास उठले होते. त्यांची कंटाळवाणी गुणगूण चालली होती. मी फार थकलो होतो. कंटाळलो होतो. डोळे मिटायला लागले होते. पण दिवेलावणीच्या सुमाराला झोपणे बरे नव्हे. लक्ष्मी यायच्या या वेळी झोपणे म्हणजे करंट्याचे लक्षण. पण नशीबवान असला तरी थकल्यावर काय करतो ? शरीर करंट्याचेही सारखे आणि भाग्यवंताचेही सारखे. ते थकले की विश्रांती मागणारच. ते विश्रांती घेऊ लागले की डोळे मिटणारच—आणि म्हणजे झोप आलीच. हे बरे नव्हे, हे चांगले नव्हे !

हलकेच बसलो होतो तो नीट पडलो. दुखरे शरीर सैल सोडून पडलो आणि डोळेही मिटले. गच्च डोळे मिटल्यावर डोळ्यापुढे झगमगत्या रंगाची वलये का दिसतात ? जांभळा-निळा-काळा रंग का दिसतो, आणि कशासाठी दिसतो ? शाळेत पोरांनी विचारले, तर मास्तरची फजिती व्हायची वेळ. कदाचित याचे उत्तर साधे असेल, पण मला ठाऊक नाही. फायनल पास होऊन मास्तर झालेल्या पोराला काय माहीत असणार ? पण पोरांनी विचारले तर फजितीच. आता बनगरवाडीची मुले इतकी हुशार नाहीत ही गोष्ट वेगळी, पण शिक्षक म्हणून ह्याचा अर्थ लावता आला पाहिजे. कारण शोधून काढता आले पाहिजे. डोळ्यांची रचना कशी असते ? आरोग्यशास्त्रात आले आहे सगळे...

...हं. वाचलेले फार झटपट विसरले जाते. जड झालेले डोळे मिटून बसले. ते उघडेचनात.

चारएक तासांनी मी जागा झालो तेव्हा झिमझिम पाऊस पडत होता. खोलीत दिवा नव्हता आणि उघड्या दारातून झोंबरा वारा आत येत होता. मी उठून बसलो आणि एकाएकी आठवण झाली. ताडकन उठून मी उशाकडची बाजू चाचपली. पिशवी हाताशी लागली, आणि तिच्यात पैशाचे गाठोडे नव्हते. माझे काळीज हादरले. अंधारातच मी पुन्हा पुन्हा पिशवी तपासून बघितली. धोतर, सदरा—सारे बाहेर उपसले. पण रुपयाचा कठीण स्पर्श हाताला लागला नाही. खिशातली काड्याची पेटी काढून मी काडी ओढली आणि रॉकेल तेलाची चिमणी पेटविली. एखाद्या वेड लागलेल्या माणसासारखा मी पिशवी, अंथरूण, जमीन चाचपत राहिलो.

पैसे गेले त्याला चारपाच दिवस झाले. मी रोजचे उद्योग करीत होतो. जेवत होतो, खात होतो, शाळेत जात होतो. रात्रीच्या सभेमध्येही बसत होतो. पण ते पैसे कसे गेले याचा नुसता अंदाजही मला बांधता येईना. जसजसा विचार करू लागलो तसतसा त्या गुंत्यात मी अधिक-अधिकच अडकत चाललो. पैसे घरून निघताना आपण

बरोबर घेतले होते का? वाटेत विसाव्याला बसलो आणि पिशवीतील गाठोडे पडले, असे तर झाले नाही ना? सुरक्षित म्हणून मी ते गाठोडे आणि दशम्यांचे गाठोडे एकत्र केले होते. न जाणो, एकटा वाटसरू बघून येता येता वाटेत कुणी फराऱ्यांनी हल्ला केला, तर माझ्यापाशी भाकरीच्या गाठोड्याशिवाय काही नाही अशी बतावणी करता आली असती...

आता तर दशम्याही गेल्या होत्या आणि रुपये गेले होते. कुत्र्याने भाकरीच्या वासाने गाठोडे नेले म्हणावे काय? का या येड्याबागड्या दिसणाऱ्या आयबूनेच काटा काढला? तसे त्याच्या नजरेवरून वाटेना. त्याच्या वागण्यात कसलाही संकोच दिसत नव्हता. मग घरात शिरून पैसे नेले कुणी? चोवीस तास हाच एक विचार सारखा मनात घोळत राहिला. रामाने विश्वासाने मोडायला दिलेले पैसे मी गबाळेपणाने घालवून बसलो होतो. ते मी खाल्ले नव्हते. तसा विचारही माझ्या मनात आला नव्हता. पण यावर विश्वास ठेवायला रामा तयार झाला असता का? त्याने का तयार व्हावे? उद्या जर मी त्याला जाऊन सांगितले की, बाबा रे, तुझे पैसे माझ्या पिशवीतून नाहीसे झाले, तर तो नक्कीच म्हणणार की, दहापाच रुपये मोडून आणून या लबाड माणसाने आपण सज्जन आहोत असे दाखविले, आणि जास्त पैसे हातात येताच ते ढापले. हा अखेर वळणावर गेला. आमच्या अडाणी-पणाचा फायदा घेऊन याने आपला खिसा भरला! साहजिकच रामा बनगर असे म्हणणार. जो चांगुलपणा मिळवायचा म्हणून मी झटत होतो त्याला हा हा म्हणता सुरुंग लागणार. हा विचार मनात येताच मी फार अस्वस्थ होत असे. कुठून बुद्धी सुचली आणि एवढी रक्कम मोडून आणण्याची जोखीम मी अंगावर घेतली असे मला होऊन जाई. शक्य असते तर माझ्या पदरचे पैसे मी रामाला दिले असते, आणि पैसे गेले ही गोष्ट त्याच्या कानांवर घातली नसती. पण एवढे पैसे माझ्यापाशी नव्हते. माझ्या घरात नव्हते. कुणी बाहेरचा कर्ज म्हणून देईल त्याचीही शक्यता नव्हती. चोहीकडच्या वाटा अशा बंद झाल्यावर पुन्हा पैसे कुठे आणि कसे गेले यावर मी विचार करीत राही, आणि राहूनराहून मला दादूने काही कारस्थान केले नाही ना असा धपका बसे! मास्तराची अब्रू घालविण्यासाठी त्यानेच ही चोरी केली असावी, असे मला राहूनराहून वाटे. पण मग आजपर्यंत तो गप्प का राहिला याचे कारण मला देता येत नसे. गावाहून आल्यापासूनच्या काळात रामा मला भेटला नाही असे नाही. तो शाळेत येत होता, पण त्याने कधी पैशांचे नावही काढले नाही. मास्तरापाशी असलेले पैसे घरातील पेटीत असल्यासारखेच आहेत; अजून मोड मिळाली नसेल, मिळाली की मास्तर आपणहून पैसे घरी पोचते करील, मग फुकट आपण शब्द का टाकावा? मनाचा हलकेपणा का दाखवावा?—अशा विचाराने रामा काही विचारीत नव्हता. आणि मीही काही बोलत नव्हतो. पण मला चोरट्यासारखे झाले होते. रामा बनगराची नजर टाळावी, त्याच्याशी बोलणे टाळावे,

हे गावही सोडावे, या कुणाशी आपली पुन्हा गाठ पडू नये, असे मला वाटू लागले होते. आणि मी स्वतःवर चिडत होतो.

दरम्यान एके दिवशी कारभाऱ्याची काळीशार नात लुगडे फडकफडक वाजवीत माझ्याकडे आली. खोलीत मी एकटाच होतो. दारातून तिने डोकावून पाहिले. एकदा, दोनदा, तीनदा पाहिले, आणि तोंडाला पदर लावून ती बाहेरच उभी राहिली. मी म्हणालो,

"कोण आहे?"

"मी—अंजा."

"कारभाऱ्याची अंजी काय?"

"व्हय की."

"काय काम आहे? आत ये की."

अंजी लाजतलाजत आली. तिच्या अंगावर तांबडेभडक असे हातमागाचे लुगडे होते. हिरव्या खणाची चोळी होती. गावात आणि कारभाऱ्याच्या घरी या पोरीला मी अधूनमधून बघत होतो, पण ती अशी लक्ष वेधून घेण्याइतपत नवी तरणी आहे, याची जाणीव मला झाली नव्हती. चौदावे संपून तिला आता पंधरावे वर्ष लागले होते, तरी ती विसाच्या दरम्यान आहे असे तिचा उफाडा बघून वाटे.

अंजीने उगीच पदर सावरला. ती मुरडमुरड मुरडली. आणि म्हणाली,

"तालुक्याला कधी जायचं आता मास्तर?"

आठवडा संपत आला होता. उद्या शनिवार होता आणि इतर कशासाठी नाही पण रामाच्या पैशासाठी तरी गावी जाणे मला भाग होते.

"जाणार उद्या सकाळी. का?"

"आमचं काम कराल का एक?"

शनिवारी अनेक लोकांची कामे माझ्यापाशी असत. कुणाचे औषध आणायचे असे, कुणाची नोट मोडून आणायची असे, कुणाची मनिऑर्डर करायची असे, कुणाचे पत्र लिहायचे असे.

"सांग की. करण्यासारखं असेल तर करीन."

अंजी म्हणाली,



"माजी एवढी चोळी शिव्रून आना!"

आणि मी गोंधळून बघत असताना तिने मापासाठी जुनी चोळी आणि एक झकास खण माझ्यापुढे टाकला.

"चोरून करतीया बगा. म्हाताऱ्याला सांगू नका आमच्या. रोजगार करून मी पैसं साटवलं आन् खन घेतला. दोन महिनं झालं, अजून शिवणंच झालं न्हाई. शिव्रून आना म्हंजे मी पैसं दीन शिवनावळीचं!"

आणि हो ना म्हणायच्या आतच तो खण आणि ती चोळी तिथे टाकून अंजी निघून गेली.

## ११

शनिवारी दुपारी घरी जाताच मी वेळ बघून पैसे गेल्याची गोष्ट वडिलांच्यापाशी बोललो. माझे बोलणे शांतपणे ऐकून घेऊन त्यांनी प्रथम मी ही जबाबदारी स्वीकारली याबद्दल मला दोष दिला.

मी समर्थनासाठी म्हणालो, "त्याचा विश्वास मला मिळवायचा होता. त्यासाठी मी ही जोखीम घेतली."

"पण तू असाही विचार करायला पाहिजे होतास की, हे पैसे आपल्या हातून गेले, तर तेवढे भरण्याची ताकद आपल्यापाशी नाही, आपल्या घरातल्या माणसां-पाशी नाही. ते जर भरता आले नाहीत तर आजपर्यंत मिळवलास तो सगळा विश्वास या गोष्टीपायी जाईल!"

"हे झालं. माझ्या हातून चूक घडली आहे. पण मी तुमच्यापाशी सल्ला मागतो आहे."

वडील थोडा वेळ गप्प राहिले. निष्कारण उलाढाली केलेल्या त्यांना खपत नसत. आपले काम बरे आपण बरे असे असावे, पैशासारख्या जोखमीच्या बाबींत तर मुळीच पडू नये, पैशामुळे हमखास वाईटपणा येतो, असे त्यांचे नेहमी सांगणे असे. त्यामुळे मी अंगावर आलेली ही भानगड सांगताच ते कठोरपणाने बोलले. पण पुन्हा त्यांचे त्यांनाच वाटले असावे की, 'तू केलंस; तुझं तू निस्तार' असे या पोराला सांगणे बरे नव्हे.

ते म्हणाले, "तू स्पष्टपणे त्या मालकाला सांग की पैसे चोरीला गेले. तुमच्याच गावात गेले. सर्वजण मिळून तपास करू या. चोरी सापडेल. तो फारच खळखळ करायला लागला तर म्हणावं, मी काही कोणी उपरा नाही. घरदार, शेतीवाडी असलेला माणूस आहे. सरकारी नोकर आहे. तुझे पैसे परत करीन!"

त्यांनी सांगितले. मलाही पटले. पण असे सांगणे माझ्याकडून होणार नाही, असे

मात्र राहूनराहून वाटू लागले. रामा विश्वास ठेवणार नाही. गाव विश्वास ठेवणार नाही. पोलिसात वर्दी देऊनही त्याचा उपयोग होईलच असे नाही. निष्कारण गावात शिपाई गोंधळ घालतील, कुणालाही धरून मारहाण करतील, सगळ्या गावाला त्रास होईल. यापेक्षा पैसे गेले हे न बोलता, आपल्या पदरचे हवाली करावेत आणि कानाला खडा लावून गप बसावे, असाच विचार मनात पक्का होऊ लागला. पैसे कुठून मिळतील याची गणितें सुरू झाली, पण वाट कुठेही दिसेना. तीनचार मित्रांकडे, एकदोघा सावकारांकडे मागणी केली; पण मला पोराला एवढे पैसे देणार कोण? कुणी वडिलांचा हवाला मागत. कुणी चक्क नकार देत. फिरूनफिरून मी कंटाळलो. तीनशे-साडेतीनशे रुपयेही आपण उभे करू शकत नाही, याचे मला वाईट वाटले. माझे तोंड चिमणीसारखे झाले. रविवारी रात्री मी जेवलोही नाही. बराच वेळ झोपही आली नाही. माझी ही तडफड आईने जाणली आणि अंधारातच ती उठून माझ्यापाशी आली. हळू आवाजात म्हणाली, "राजाराम, जागाच आहेस का रे अजून?"

मी 'हूं' म्हटले आणि त्याच वेळी तिचा खरबरीत तळवा माझ्या अंगावरून फिरला.

"हे बघ, पैसे हरवले ते सापडतात का तें बघ. धनगर फार पाठीला लागला, तर तुझ्या आजोळीं असलेलं माझं घर वीक. त्याचे येतील चारपाचशे रुपये. आणि देऊन टाक. आहे काय एवढं काळजी करण्यासारखं?"

आईच्या या बोलण्याने मला धीर आला. कुणीतरी आपल्या पाठीशी आहे, तशीच जरुरी पडली तर रामाचे पैसे मी भरू शकेन, अशी शक्यता निर्माण झाली. आणि झाली गोष्ट रात्रीच्या सभेमध्ये गावापुढे मांडावी असा निश्चय मी मनाशी केला. पण अजूनही या दोन्ही गोष्टी मला अवघड वाटत होत्या. आईचे घर विकणेही मला नको होतें आणि पैसे हरवले असे रामाला सांगणेही मला नको होतें. चापात अडकल्यासारखी ही अवस्था अशीच राहिली आणि वरवर निष्काळजी असल्याचे आईला भासवून मी सोमवारी पहाटे बनगरवाडीची वाट धरली.

सोमवारची शाळा सोडून मी माझ्या खोलीवर आलो. रात्री शाळेपाशी मंडळी जमतील, तेव्हा तिथे चोरीबद्दलची वर्दी द्यायची असे मी ठरवून टाकले. हे सगळे करण्यापूर्वी एकवार कारभाऱ्याचा सल्ला घ्यावा, या हेतूने मी आयबूला म्हाताऱ्याकडे पाठवून दिले. 'थोडा वेळ येऊन जा. मास्तरांचे जरुरीचे काम आहे—' असा निरोप त्याच्या हाती पाठवला. आयबू निघून गेला आणि झाली गोष्ट पटेल अशा रीतीने म्हाताऱ्याला कशी सांगावी याचा विचार करीत मी बसून राहिलो. एवढे सगळे झाले तरी मला मनात कुठे तरी सारखे वाटत होते की हे प्रकरण काही आपल्या अंगावर शेकणार नाही. काही-विशेष न घडता, सहजासहजी गुंता सुटेल. आपण



उगाच बाऊ करतो आहोत. पैसे चोरीला गेले नाहीत, फक्त ते कुठे तरी चुकून राहिलेत, हरवलेत...

असे मला का वाटत होते हे काही सांगता येणार नाही, पण वाटत होते हे खरे. यात कोठे मोठा धोका आहे असे काही भासत नव्हते खरे.

आयबू म्हाताऱ्याकडून जाऊन आला तो नाखूष असा. तो नाखूष झाला की त्याच्या कपाळावर आठ्या पडत, गाल वुप होत आणि दोन्ही हातांची घडी छातीवर येई. तो दारातून येत होता तेवढ्यातच मी विचारले,

"का, म्हातारा भेटला नाही?"

"भेटला की. न भेटायला तो काय पंतसरकार काय?"

"मग काय म्हणाला?"

"येत नाही म्हणाला. जाऊन सांग तुज्या मास्तरला, मला सवड न्हाई. सवड मिळल त्या दिवशी येईन!"

मी क्षणभर थंड झालो. कारभाऱ्याकडून असे काही उत्तर कधीकाळीं मला मिळेल याची पुसट कल्पनाही मला नव्हती. नेहमी "मास्तर-मास्तर" करणारा, अत्यंत समजूतदारपणे वागणारा हा प्रेमळ म्हातारा असा तिरसटासारखा उलट जबाव पाठवणार नाही. मी आयबूला विचारले,

"चेष्टेनं म्हणाला का खरंच?"

"त्यात कशाची चेष्टा? चांगला कावून बोलला!" आयबूच्या नाकपुड्या रागाने फुगत होत्या. मास्तराच्या बोलण्याला धनगराने असे उत्तर द्यावे ही गोष्ट त्याच्या अगदी जिव्हारी लागली होती. थांबून तो पुन्हा म्हणाला, "तुमच्यावर पार बिगडलेला दिसला तो!"

मला काही कळेना. म्हातारा कशासाठी बिघडला? माझ्या हातून काय अपराध घडला?

टोपी घालून मी तडक म्हाताऱ्याच्या घरी गेलो.

चुलीपाशी ठेवलेल्या पणतीचा अपुरा उजेड घरात होता. चुलीतल्या धुराने घर भरले होते. अंजी संध्याकाळच्या भाकऱ्या बडवीत होती. मी येताच तिने चोरून माझ्याकडे बघितले. त्या बघण्याचा अर्थ असा होता, की मी चोळी शिवली हे म्हाताऱ्याला सांगू नका. भिंतीला पाठीचा रेटा देऊन गुडघे उभे करून कारभारी बसला होता. मी येताच त्याने 'या'ही म्हटले नाही.

त्या बुटक्या घरात उभे राहून मी म्हटले,

"काय बाबा, निवांत बसलाय ?"

म्हातारा केवळ 'हूं' म्हणाला, आणि गप्पच बसला.

मला मोठे चोरट्यासारखे झाले. धुरानें काळवंडलेल्या वरच्या छपराकडे बघत मी उभा राहिलो. अंजीलाही चमत्कारिक झाले. एकदोन वेळा, आळीपाळीनें तिनें माझ्याकडे आणि म्हाताऱ्याकडे बघितले. तिचा चेहरा गोंधळला होता. म्हाताऱ्याच्या वागण्यातला अर्थ तिलाही लागत नसावा. चुलीसाठी बाहेरच्या काटक्या मोडून आणण्याचे निमित्त करून ती बाहेर पडली. मी आणि म्हातारा दोघे राहिलो. तो तसा आखडून बसलेला आणि मी आता काय करावे अशा अवस्थेत उभा राहिलेला.

चुलीतला जाळ विझला होता आणि धूर जास्त निघू लागला होता. वर गाडग्यात शिजत असलेल्या कालवणाचा वास वाफेतून बाहेर येत होता. रटरट आवाज होत होता. दारातून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकीनें पणतीची ज्योत डुलत होती. भिंतीवर पडलेल्या काळ्या सावल्या हलत होत्या.

मला काही बोलणे सुचेना. उगीच मी उभा राहिलो आणि हळू आवाजात म्हणालो,

"मला तुमच्याशी थोडं बोलायचं होतं बाबा. एक जरुरीची गोष्ट सांगायची होती."

म्हाताऱ्यानें मुळीच लक्ष दिले नाही.

अंजी काटक्यांची जुडी हातात घेऊन आत आली. वाकून चूल फुंकू लागली. म्हातारा खणखणीत शब्दात म्हणाला,

"तू जा आपला. मला काय सांगू नकंस. मी काय ऐकनार न्हाई !"

आणि जागचा उठून तो मला डावलून दारातून बाहेर पडला. अंधारात दिसेनासा झाला.

त्या अपमानाने माझा चेहरा गोरामोरा झाला. कानशिलं तापली. घुटका गिळून मी बाहेर पडू लागलो, तेव्हा अंजी हलक्या आवाजात म्हणाली, "त्या भाड्या दाद्यानं कायतरी सांगटलंय म्हाताऱ्याला."

मी विचारले, "काय ?"

"कुनाला ठावं काय बकला ते. लई हाय आगलाव्या."

मी ऐकून घेतले. ही तरणीताठी मुलगी घरात एकटी असताना तिच्याशी बोलत उभे राहाणे बरोबर नाही असे वाटले आणि काहीही न बोलता मी बाहेर पडलो. अंधारातून ठेचा खात खोलीवर आलो. आयबू दिवा लावून बसला होता.

काही वेळ दोघेही एकमेकाशी बोललो नाही. पण ऐकली गोष्ट बोलल्याशिवाय मला राहावेना.

"दादू बालट्यानं कारभाऱ्याला काही तरी सांगितलंय, आयबू. त्यानं माझ्यावर बिघडला."

आयबूला एकाएकी कोडे उलगडल्यासारखे झाले.

"असं का?"

"होय. मला कळलं. आणि ते खरंही असेल."

"हायेच. बालट्या तुमच्यावर भारी जळतो, मास्तर!"

"पण जळण्याचं काही कारण नाही. मी त्याचं काय केलंय?"

"तुम्ही गावात आल्यापासनं त्याच्या टगेपनाला कुणी विचारंना."

"तो टग्या आहे का?"

"तर! तो जगतो कशावर? ह्याची टोपी त्याला घालायची, त्याची ह्याला घालायची. चांगला गोल टग्या हाय तो!"

एखाद्या कादंबरीत, नाटकात खलनायक असावा, तसा हा बालट्या माझ्या मागे का लागला होता, हे मला कळत नव्हते. मी त्याचे काही वाईट केले नव्हते, काही अपराध केला नव्हता. पण सुरुवातीपासूनच तो माझ्या डाई पडला होता. जणू त्याचे माझे वैर हे नैसर्गिकच होते. कावळ्या-घुबडाचे, सापा-मुंगसाचे असते तसेच. नाहीपेक्षा माझ्या गावात येण्याने त्याचे वजन कमी झाले, टग्या म्हणून त्याला कोणी विचारीनासे झाले, त्याचा सल्ला घेईनासे झाले, म्हणून तो माझा वैरी झाला असे मानावे, तर अगदी पहिल्या भेटीतच त्याने मला का फटकावले होते? कदाचित माझ्या अगोदर आलेल्या मास्तराने त्याचा काही अपराध केला असेल, आणि समस्त मास्तरजातीविषयी त्याला राग वाटत असेल. पण माझ्या इतक्या दिवसांच्या वागणुकीने तो जायला हरकत नव्हती.

आयबू उठला आणि भाकरी आणण्यासाठी बाहेर निघून गेला. अगोदरच रामा बनगराच्या पैशाने माझी झोप उडवली होती. त्यात बालट्याचे हे जुने दुखणे पुन्हा उमटले. सुरुवातीपासून माझ्या मागे असणारा, एकच एक असा गावातला वजनदार माणूस, कारभारी, तोही वाकडा झाला. अलिकडे मला थोडा विश्वास उत्पन्न झाला होता. गावात आपण काही चांगले काम करू, खात्याकडून शाबासकी मिळवू, अशी उमेद निर्माण झाली होती, तोवर या घटना घडल्या.

माझे मन उदास झाले. उठून चूल भरली. घरून बांधून आणलेल्या भाकरी सोडल्या. एकटाच खात बसलो. त्या खाण्याचा आवाजही मला मोठा वाटू लागला.

आणि मग आनंदा रामोशी आला. दाराबाहेरच उभा राहून म्हणाला,

"एकलेच हाय का मास्तर?"

"होय, एकटाच आहे. जेवतोय. का रे आनंद?"

"जेवा. मी येतो माघारी."

"झालं जेवण. काही काम आहे का?"

मी भाकरी गुंडाळून ठेवल्या. हात धुतले. आणि आनंदा आत येऊन बसला. खोलीचे दार त्यानें लावून घेतले.

हलक्या आवाजात त्यानें विचारले,

"तुमचे काय पैसे गेलेत का खोलीतनं ?"

मला एकाएकी धक्का बसला. या कानाची त्या कानाला ठाऊक नसलेली ही गोष्ट या रामोशाला कळली कशी, सांगितली कुणी ? ज्या अर्थी पैसे गेलेले याला माहीत आहेत त्या अर्थी ते कुणी, कशासाठी दिले होते, हेही याला कळले असेल. म्हणजे इतके दिवस अब्रूला जपण्याची जी खटपट मी केली ती सगळी व्यर्थच गेली. रामानें मोडण्यासाठी दिलेले पैसे मी खाऊन बसलो ही गोष्ट जगजाहीर झाली. आता याला खरी गोष्ट सांगावी का टाळाटाळ करावी, उडवाउडवीची उत्तरे द्यावी ? मी चांगलाच गोंधळून गेलो आणि माझ्या तोंडून शब्दही गेले—

"हो. तुला कुणी सांगितलं ?"

"मला ठाऊक हाय."

"पण कसं ?"

आनंदा शांतपणे म्हणाला, "मीच ते नेले होते."

माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना. मोठ्या डोळ्यांनी आणि उघडल्या तोंडाने मी नुसता बघत राहिलो.

आनंदानें बरोबर आणलेले धोतराचे गाठोडे सोडले आणि त्याने बंदोबस्ताने ठेवलेले पैसे काढून माझ्यापुढे ठेवीत तो म्हणाला, "जसं नेलं तसं परत आणलं. ही घ्या जोखीम !"

मी पैशांवर झडप घातली. ते आपल्या ताब्यात घेतले. मनावरचे प्रचंड ओझे कमी झाले. हा आनंदा रामोशी परमेश्वरासारखा माझ्या संकटाच्या वेळी उभा राहिला असे मला वाटले.

मग आनंदा म्हणाला,

"मोजून बगा. मी तीन रुपये धा आने खाऊन बसलोय. ते काय माघारी देनार न्हाई. पर बाकी तुमचं सगळं रुपयं तसंच हायेत !"

त्या रामोशाचा मला राग आला आणि त्याच्याविषयी लोभही वाटला.

"आनंदा, रुपये नेलेस कशाबद्दल ? तुला हे मिळाले कुठं ?"

आनंदा म्हणाला,

"खंडोबाची आण मास्तर, न्यावं म्हणून मी रुपयं नेलं न्हाईत. तुमापाशी भाकरी मागावी म्हणून आलो, तर तुमाला झोप लागलेली. निजलेल्याला जागं कसं करावं ? तुमी आणलेलं भाकरीचं गट्ठुळं तिथंच दिसलं, घमाघमा वास येऊ लागला. म्हटलं, जावं घेऊन भाकरी. झालं मास्तर जागं तर त्येना वाटंल नेल्या कुत्र्यानं. असा इचार केला आन् मुकाट्यानं गट्ठुळं घेऊन घरी गेलो. गठुळं सोडलं

तर त्यात भाकरी होत्या, आन् मुठ्ठभर रुपयं बी होतं. तें बघताच वासना झाली."

"ठीक. पण माझा इकडं गळा गुंतला होता."

"तो कसा गुंतला? पांडुरंग तुमच्या पाठीशी हाय, मास्तर. मी जातीचा बेरड. एवढं रुपयं पचवायला काय जड नव्हतं. पर आठ दिवस रुपयं जवळ ठेवलं आन् सारकं मनात याला लागलं—लेका आनंद्या, मास्तरचा पैका का रं घेतलास? मास्तर काय जहागीरदार का सावकार! त्याला हा धोका कशापायी? कायम बैठकीत बसून हा असा दगा देनं खरं न्हाई. आन् मास्तर आज हे रुपये पायापाशी आनल्यात तुमच्या. आता फिर्याद करा, तुरुंगात डांबा, न्हाई तर मोकळं सोडा."

ही सगळी हकीकत आनंदाने इतक्या सहज, इतक्या मोकळेपणाने सांगितली की त्याला काय बोलावे हे मला सुचेना. लहानसान चोऱ्या करणाऱ्या या रामोशाने मोठीच मजल गाठली होती. पण आपणहून त्याने रक्कम माघारीही केली होती. बरे, चोरी करावी म्हणून तो माझ्या घरात शिरला होता, पण ती भाकरीची. रुपये नेण्याचा त्याचा बिल्कूल इरादा नव्हता. तेच त्याच्याबरोबर गेले. आता तो सांगत होता की माझी कणव घेऊन त्याने ते माघारी केले. पण खरी गोष्ट ही नसणारा चोरी आज ना उद्या उघडकीला नक्की येणार, या विचाराने आनंदा सज्जन झाला. लहानसान चोऱ्या करूनसुद्धा आठपंधरा दिवसांनी तो त्या मालकांपाशी कबूल करीत असे. गेलेला माल इतका मामुली असे की चार शिव्या हासडण्यापलिकडे कोणी त्याला काही करत नसे. कारण आनंदा म्हणे : मागून कोणी देत नाही म्हणून मुकाट्याने न्यावे लागते. आणि मी जास्त कुठे नेतो? पोटाला लागेल तेवढेच मला पाहिजे असते. गुरे खातात, पाखरे खातात, कीडवाळवी खाते, तसे आनंदाने खाल्ले म्हणा आणि हळहळू नका.

मांडी ठोकून आनंदा माझ्यापुढे बसला होता आणि मी काय बोलतो याच्याकडे त्याचे ध्यान होते.

मला संतापच आला. या माणसाचे पुन्हा तोंडही बघू नये असे वाटले. त्याच्या या मूर्खपणामुळे मला किती यातना भोगाव्या लागल्या होत्या! गेले आठ दिवस माझा जीव कसा झाला होता!

मोठ्याने ओरडून मी म्हणालो, "शहाणा आहेस. जा. तुझं थोबाडसुद्धा मला पुन्हा बघायचं नाही."

आनंदा काही बोलला नाही. कानावर ठेवलेली अर्धी विडी काढून त्याने दिव्यावर पेटवली आणि तो निघून गेला.

मी उठलो आणि तडक रामाच्या घरी गेलो. त्याचे पैसे त्याच्या हवाली केले, आणि सुटकेचा श्वास सोडला.

रामा म्हणाला, "काय घाई व्हती मास्तर? पैसे तुमच्या घरी व्हतं म्हणजे माझ्या घरी व्हतं."

मी म्हणालो, "खरं आहे!"

मध्यंतरीच्या काळात काय घडामोडी झाल्या याची त्याला काहीच कल्पना नव्हती. शेवटी परत येताना मी आवर्जून रामाला सांगितले, "पैसे घरात ठेवू नका. गुंतवून टाका. जमीन घ्या, आणखी मेंढरं घ्या, पण जोखीम अशी घरात ठेवू नका. वेळ सांगून येत नाही."

पुढे काही दिवसांनी रामाने त्या पैशाची मेंढरे घेतली. त्याचे खांड खूप मोठे झाले.

## १२

जिराइतातील बाजरी हळूहळू वाढली. पोटरीतून लांब दांड्यांची शेलाटी कणसे बाहेर पडली. हिरव्या ताटांवर तपकिरी रंगाची कणसे सर्वत्र डुलू लागली आणि लवकरच जांभळ्या फुलोऱ्यांनी फुलून गेली. तो नाजूक फुलोरा डवरला आणि लहान मुंग्या कणसांवर चढू लागल्या. मधमाश्या कणसांभोवती फिरू लागल्या. पिवळ्या रंगाची लहान फुलपाखरे जोडीजोडीनें तरंगत येऊन बसू लागली. कधी धिंगाणा घालणाऱ्या वाऱ्यावर फुलोरा उडू लागला आणि कणसे उघडी पडू लागली. बाजरीच्या बरोबरीनें, आत टाकलेले कडधान्याचे वेल पसरू लागले. मटकीच्या शेंगांचे झुपके कुठेकुठे दिसू लागले. हुलग्याला जोम आला. तुरीच्या उभार झाडांवर सावळ्या शेंगा दाण्यांनी भरू लागल्या. भुईमुगाच्या मुळ्या अंडी धरू लागल्या. बांधाबांधावर उगवलेले कुर्डूचे पांढरे-जांभळे तुरे लागले. आणि लवकरच फुलोऱ्यांनी डवरलेली कणसे बाजरीच्या चमकदार दाण्यांनी टचटचली. चिवळांचे थवे भरारत येऊन ते दुधाने भरलेले दाणे खाऊ लागले.

ज्यांची रानें होती ते लोक भल्या पहाटे उठून राखणीसाठी रानात जाऊ लागले. बनगरवाडीतील बायकापोरे रोजगाराला शेजारच्या गावातील रानावर जाऊ लागली.

हिरवेहिरवे खाऊन मेंढरे गुबगुबीत दिसू लागली. त्यांच्या अंगावर चरबी वाढली. नडीअडचणीला धनगर बाजार दाखवू लागला, तेव्हा त्या गुबगुबीत मेंढरांना भाव चांगला येऊ लागला.

बाजरी चांगली तयार झाली. पोरेठोरे लिंबूर खाऊन तयारी धरू लागली. दसरा आला. शिलंगणाच्या सोन्याबरोबर बाजरीची नवी कणसेही लोकांनी वाटली आणि मग काढणीची गडबड सुरू झाली. पाच महिनें वाढलेली बाजरीची जोमदार धाटे विळ्याच्या तडाख्यांनी आडवी झाली. ती तशीच जमिनीवर पडू दिली तर भुरळुका

चिमण्या कणसे खातील म्हणून लगोलग पेंढ्या एकत्र उभ्या करून झोपडीच्या आकाराच्या बुचड्या घातल्या गेल्या. त्या दडप्यामुळे, उबेमुळे, बाहेर न आलेले दाणे कणसाबाहेर पडले. आणि मग दुसऱ्यातिसऱ्या दिवशी बुचड्या उलगडून लहानसहान कोथळ्या घातल्या गेल्या. एकमेकांना लावून उभ्या केलेल्या त्या पेंढ्या सूर्याचे ऊन घेऊ लागल्या. ओले दाणे वाळू लागले. सकाळ-संध्याकाळ होले, चिमण्या त्यांच्यावर गर्दी करू लागल्या.

ज्याला नड होती त्याने मोडणी करून कणसे बडवली. घरची जनावरे कुरकुरीत सरमाड खाऊ लागली. घरची माणसे बाजरीच्या हिरव्यागार भाकरी खाऊ लागली. ज्यांच्या घरी चंदी होती त्यांनी घाई केली नाही. बाकीची कामे करण्यासाठी बाजरी काढण्याची चालढकल चालविली. पण आज ना उद्या त्यांनाही कोथळ्या उलगडणे भाग होते.

हळूहळू कडधान्यही निघाले. हुलग्याच्या शेंगांचे खुळखुळे वाजू लागले, तेव्हा हुलगा निघाला, भुईमूग निघाला, तूर निघाली, मटकी निघाली. मोकळ्या झालेल्या रानातून जनावरे हिंडू लागली. मेंढरे चगळचोथा खाऊ लागली. बाजरीची बरड, तांबडी राने उजाड दिसू लागली.

कडक थंडी पडू लागली. रात्री सकाळी चगळचोथा जमवून लोक शेकटा घेऊ लागले. त्यांचे ओठ, तोंडे थंडीने तडकली. धनगरांची काळी अंगे काळ्या घोंगडीतून निघेनात. निवळशंख ओढ्याच्या पाण्यावर, विहिरीवर सकाळच्या प्रहरी वाफा दिसू लागल्या.

दरम्यान श्रावणमासी पेरलेली ज्वारी वळावली. काळ्या रानातून ज्वारीची धाटे गुडघ्या-मांडीला आली. कमरेला लागू लागली. मधून टाकलेल्या करड्याचे पट्टे काट्याला आले. हरबऱ्याला लहान जांभळी फुले आली. बघता बघता ज्वारीची कणसे दिसू लागली. करड्याला सुरेख पिवळी फुले आली. हरबऱ्याला पोचट घाटे लोंबू लागले. हिरवे बाटूक खाऊन जनावरे गोटीसारखी गोलगरगरीत झाली. पांढरीफेक दिसू लागली. शिंगाने माती उकरू लागली. वांडा धाटाचा ऊस आणि ओला हरबरा खाण्यासाठी पोरे चोऱ्या करू लागली. राखणाराची नजर चुकवून शेरडे-करडे ज्वारीची धाटे ओरबडू लागली. चिकट हातांनी आणि पांढरे फरकाटे उठलेल्या तोंडांनी पोरे रानात हुंदडू लागली.

हुरड्याच्या आगट्या ठिकठिकाणी पडल्या. भल्या सकाळी रानारानात पेटलेल्या आगट्यांचा धूर आभाळात चढू लागला. तरण्या पोरांनी हुरड्याचा खुराक सुरू केला. म्हातारेकोतारेसुद्धा खलबत्त्यात कुटून हुरड्याची चव घेऊ लागले. बायकापोरी सवड काढून चार दाणे तोंडात टाकू लागल्या.

दरसाल या वेळी येणारी परदेशी पाखरे बातमी पोचल्यासारखी आली. सूर्य उगवतो न उगवतो तोच दूरवरून 'ट्रॅवट्रॅव' आवाज ऐकू येऊ लागला. निळ्या-

स्वच्छ आभाळातून त्यांचे शेकडो पाखरे असलेले थवे उडू लागले. उडता उडता त्यांच्या लांबलचक ओळी वेगवेगळे आकार घेऊ लागल्या. अंगणात, रानात उभी राहून, तोंडे वर करून पोरे ओरडू लागली. तालात म्हणू लागली—

"कांड्याकरकोच्या, बारा बैलांचा, नांगर धर, नांगर धर !"

ही पाखरांची धाड पडू नये आणि कणसे ओरबाडून त्यांनी पिकाची नासाडी करू नये म्हणून आभाळात पटके फेकून शेतकरी त्यांना बुजवू लागले. आरडाओरड करू लागले. तरी उंचउंच पायांची ती पाखरे गोल फिरत पिकांवर पडू लागली आणि आरडाओरड करीत ज्वारीची कणसे ओरबाडू लागली.

तीन कोंबड्यांच्या बरोबरीने वजनाला असलेली, चरबीने भरलेली ही पाखरे बघून रामोशांच्या तोंडांना पाणी सुटले. ठासणीची बंदूक, गोफणी घेऊन त्यांची उमेदवार पोरे रानामाळातून कांड्याकरकोच्यामागे धावू लागली. चुकूनमाकून चारदोन पाखरे पडू लागली. बऱ्याच दिवसांनी रामोशांच्या झोपड्यातून शिजल्या मासाचा वास घमघमू लागला.

फुललेल्या करड्याच्या फुलांवरील मध गोळा करून अडचणीच्या जागी मध-माश्यांनी पोवळी केली. डहाळे पाडण्याच्या कुऱ्हाडी घेऊन धनगरारामोशांची पोरे रानातून हिंडू लागली. नेपतीच्या झुडपांतून घातलेली पोवळी शोधून गोड मध खाऊ लागली.

मग ज्वारीची पिके निघाली. करडा निघाला. हरबरा निघाला. खळ्यांची धमाल सुरू झाली. लोकांनी खळी शिपली. मोडणी झाली. मोगलीचे घाव कणसांवर पडले. उपणणी झाली. वाऱ्याच्या झुळकीवर भुस्सा बाजूला गेला आणि मोत्यासारख्या ज्वारीची रास पडली. बारक्या-चलुत्याची झिम्मड उडाली. राशी मोजल्या गेल्या. पाखरांनी, गुरांनी, चोरांनी नेऊन उरले ते धान्य शेतकऱ्यांच्या घरी आले.

मोकळ्या झालेल्या शेंगांच्या, हरबऱ्याच्या, खपलीच्या रानांतून हिंडून गोरगरिबांनी सरवा वेचला. दाणादाणा वेचून घरी आणला. त्यांच्या नजरेतून सुटलेले दाणे पाखरांनी टिपले. मुंग्यांनी नेले. त्यातूनही राहिले ते जमिनीतून पडून राहिले, पावसाची वाट बघू लागले.

दहा महिन्यांनी हिरवी राने पुन्हा काळीकरडी दिसू लागली. सुगी संपली. पाखरे पांगली. दाढेला तमाखू धरून लोक घटकाघटका निवांत बसू लागले.

कोल्हाटी येऊन उड्या मारू लागले. दरवेशी येऊन अस्वल खेळवू लागले, गारुडी हातचलाखी दाखवू लागले. हे खेळ बघून लोक मन रिझवू लागले, हसू लागले. खूष होऊन शेर-पायली धान्य गारुड्याला, कोल्हाट्याला, दरवेशाला देऊ लागले.

धनगरांची कसबी पोरे गोळा होऊन गजी नाचू लागली. भिंगे लावलेल्या, पांढऱ्या दोऱ्यांनी मोर-बैलाची चित्रे काढलेल्या काळ्या छाटणी त्यांनी अंगात घातल्या. हातात रंगीबेरंगी रुमाल घेऊन फेर धरला. भलामोठा ढोल घेतलेला ढोल्या 'इडिबांग-डीपांग'



करू लागला. झांजवाला झांज पिटू लागला. हिरवे-तांबडे रुमाल उडवीत धनगर मागेपुढे पाय टाकू लागले. गजगतीने नाच सुरू झाला. हलके हलके गती वाढली. पाय भराभर पडू लागले. निळे-जांभळे रुमाल उडू लागले. ढोल घुमू लागला. बघताबघता ते पंचवीसतीस धनगर, तो ढोल्या हे सगळे एकत्र झाले. चपळ असा एकच कसबी माणूस धुंद होऊन नाचतो आहे असे वाटू लागले.

घोंगडी खाली घेऊन बसलेले धनगर, दारात उभ्या राहून बघणाऱ्या बायका, पोरे देहभान विसरली. तो ताल त्यांच्याही अंगात भरला. ती गती त्यांनाही आली. सगळी बनगरवाडी नाचू लागली. 'इडिबांग-डीपांग—डिचीबाडी—डीपांग—डीबाडी-डीपांग—डीपांग—डीपांग...'

## १३

एकाएकी बिथरलेला कारभारी बरेच दिवस माझ्याशी बोलला नाही. कधी शाळेत येऊन बसला नाही. कधी खोलीवर आला नाही. माझी वास्तपूस करण्याचे त्याने सोडून दिले. प्रथमप्रथम मला या गोष्टीची चुटपूट लागली, पण पुढे मीही ते विसरलो. थोडासा अहंकार माझ्यापाशीही आला. माझी काही चूक नसताना एकाएकी हा म्हातारा माझ्यावर बिघडतो, त्या बालट्याचा कानमंत्र घेऊन माझ्याशी भाषा करण्याचेही बंद करतो, हे नाही म्हटले तरी मलाही लागले. आपणहून म्हाताऱ्याशी बोलण्याचा प्रयत्न करण्याचे मी सोडून दिले.

शाळेचा व्याप बरा वाढला होता. मुले बरी येत होती. त्यांच्या परीक्षा, अभ्यास, उपस्थिती याकडे मला आता जास्त लक्ष द्यावे लागत होते. कारण वरचे अधिकारी येऊन जात होते. खेड्यापाड्यांतून शाळा काढल्या, आता त्यांचे यशापयश पाहिले पाहिजे, ही जाणीव शिक्षणखात्याला झाली होती. वरून निरनिराळ्या सूचना येत होत्या. हुकूम निघत होते. सुगीच्या सुटीत पांगलेली पोरे गोळा करून त्यांना पुन्हा नियमित शाळेला आणण्याचे कठीण काम आयबू करत होता,

रामा धनगर करत होता, आनंदा रामोशी करत होता, आणि गावही आता मी बोलला शब्द मोडीत नव्हते. शाळा आणि मास्तर यांविषयी आपलेपणा निर्माण झाला होता.

एका सोमवारी मी शाळेत गेलो आणि पोरांनी बातमी सांगितली की, तिसऱ्या इयत्तेत पहिला नंबर असलेल्या सतानें एकट्यानें लांडगा मारला. मला मोठे नवल वाटले.

"कसा रे मारला ?"

"बाभळ सवळायच्या कुऱ्हाडीनं तोडला, मास्तर. त्येचं कातडं वस्तीवर टांगलंय त्येच्या."

"कुठाय सता ? शाळेत नाही का आला ?"

"आता त्यो शाळेला येणार न्हाई, मास्तर. त्येच्या बानं त्याला मेंढरांमागं लावलाय."

रात्री शाळेपुढे लोक जमले, तेव्हा सताने लांडगा मारल्याची हकीकत खरी का, ही गोष्ट मी विचारली, आणि ती सविस्तर हकीकत लोकांनी सांगितली.

वाडीच्या आसपासच्या रानात एकदोन लांडगे नेहमी असत. एकटेदुकटे खांड बघून ते मेंढरू धरीत आणि पळवीत. नेटके असले तर मेंढका पाठलाग करी. लांडग्याला तोंडातला घास टाकायला लावी. नरडे फोडलेले ते मेंढरू म्हरल, महार थोड्या किमतीला विकत घेऊन खात. पण पुष्कळ वेळा लांडगा मेंढरू घेऊन जाई आणि मेंढका परत येई. असे प्रकार वरचेवर होत. फार त्रास होऊ लागला म्हणजे एखादे दिवशी गावातली पाचपंचवीस पोरे काठ्या-कुऱ्हाडी घेऊन बाहेर पडत. रखरखत्या उन्हातान्हातून माळ तुडवत, फरा काढून लांडगा उठवायची खटपट करत; पण बेरकी लांडगा त्यांना सापडत नसे. दिवसभर वणवण फिरून, कुणाच्याही रानातला हरभरा, भुईमूग उपटून खात ही शिकारी मंडळी हात हलवीत परत येत. पुन्हा चारआठ दिवसांनी एखादे मेंढरू मारल्याची वर्दी येई. इतका त्रास होऊनही लांडगा मारण्याची विशेष खटपट कुणी करत नसे. खायचे सावज नसल्यामुळे रामोशी या शिकारीविषयी उदासीन असत. आणि मेंढक्यांची अशी समजूत होती की, खांडातले मेंढरू लांडग्याने धरले, म्हणजे मेंढरांना साथीचा रोग होत नाही. या समजुतीमुळे लांडगे चांगले धट होत, आणि दिवसाउजेडी रानातून हिंडत. माणूस बघून माती उकरत.

बिरा धनगराला काही काम परगावी निघाले, म्हणून त्याने पोराला मेंढरांमागे पाठविले होते. डहाळे-कुऱ्हाड घेऊन सता माळावर मेंढरे चारीत होता आणि संध्याकाळच्या सुमारास लांडग्याने रानाच्या ढेपणीवर चढून खांड हेरले. तरवडा-नेपतीच्या झुडपाचा आडोसा घेत वगळीवगळीने तो खांडाजवळ आला, तरी सताला पत्ता नव्हता. शेवटी खांडातून बाजूला आलेले एक बांडगे हेरून लांडग्याने झडप

घातली. त्याचे नरडे धरून तो पळू लागला. सताचा धनगरी कुत्रा चवताळून भुंकत धावला, तेव्हा सताचे लक्ष गेले. लांडगा वगळ धरून सुसाट पळत होता.

मोठमोठ्या शिव्या देत सता मागून धावला. कुत्राही धावला. हा हा म्हणता कुत्रा लांडग्याला भिडला आणि उडी घेऊन त्याने लांडग्याच्या मागच्या फऱ्याला धरले. ती कळ येताच तोंडातले मेंढरू टाकून लांडगा मागे वळला. दात विचकून कुत्र्याची मानगूट धरायला बघू लागला. फरा सोडविण्यासाठी धडपडू लागला. पण लांडगा वळत होता तसा कुत्राही वळत होता. तोंडात धरलेल्या फऱ्याशी ओढ घेऊन सरकत होता आणि दोन्ही अंगांना सारखे वळूनही लांडग्याला त्याची मान सापडत नव्हती. दोघांची चांगली झटपट झाली. धुरोळा उडाला. कुत्र्यापेक्षा लांडगा ताकदीने भारी असल्यामुळे त्याने कुत्र्याला दरारा ओढले, झिंजाडले. दाताची पकड सुटून कुत्रा मुंडीवर कुचून उलटा झाला आणि चवताळलेल्या लांडग्याने उडी घेऊन त्याचे नरडे फोडले. कुत्रा विलक्षण केकाटला. दरम्यान सता तिथे पोचला आणि कुत्र्याच्या उरावर बसलेल्या लांडग्याच्या मानेवर त्याने कुऱ्हाड हाणली. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. लांडगा उलटा होऊन पाय झाडू लागला आणि रागाला गेलेला सता कचाकच घाव घालत राहिला.

लांडगा मेला. कुत्रेही मेले. वगळीतल्या वाळूत खड्डा उकरून सताने कुत्रे पुरले. डोळे पुसले. ते मेले मेंढरू खांद्यावर टाकून, लांडग्याच्या पायाला दोरी बांधून त्याला ओढत दिवेलागणीच्या सुमारास सता वाडीत माघारी आला. आणि झाली हकीकत आईला सांगताना धसमसून रडला. कुत्रा गमावला, मेंढरू गमावले, म्हणून रडला. स्वतः रडतरडत आईने त्याला समजावले. पोटाशी धरून म्हटले,

"जाऊ दे. कुत्रा मेला, त्यो लांडग्याचं रगत घेऊन मेला. मेंढरू त्याच्यावरनं वचाळून टाकलं मी. रडतोस कशापायी?"

ही हकीकत ऐकल्यावर सता शाळेत येतो कधी, आणि त्याला मी शाबासकी देतो कधी, असे मला झाले. पण चारसहा दिवस झाले तरी तो शाळेत आला नाही. निरोप पाठवले तर सांगावा आला की, तो मेंढरांमागे जातोय, शाळेत येणार नाही.

मग सवड काढून मी मुद्दाम त्याच्या रानातल्या वस्तीवर गेलो.

दिवस मावळून गेला होता आणि फिक्कट चांदणे पडले होते. वस्ती जवळ आली तशी कुत्रे अंगावर येईल म्हणून सताला हाक मारावी असा विचार मनात आला आणि मी मोठ्याने हाक मारली,

"ओ सता—"

वस्तीकडून हाक आली.

"कोन हाय?"

"मी मास्तर. कुत्रं धर रे. अंगावर येईल."

सताचा आवाज एकदम खाली आला,

"कुत्रं न्हाई, मास्तर. या."

आणि माझ्या एकदम ध्यानी आले की, सताचे कुत्रे तर परवाच लांडग्याच्या झटापटीत मेले. मला अपराध्यासारखे झाले.

वस्तीपुढे छान सारवलेले अंगण होते. मातीचे ओबडधोबड वृंदावन होते. त्यात डेरेदार तुळस होती. त्या कट्ट्यावर घोंगडे टाकून सता म्हणाला,

"बसा."

फिकट चांदण्याच्या प्रकाशात गुरेढोरे सटक्याने चारा खाताना दिसत होती. सताचा बाप बिरा शेरडाची धार काढत होता. बाहेरच्या वाड्यात मेंढरे कोंडली होती. गुरांच्या गळ्यांतल्या घंटा किणकिणत होत्या. चिपाडे मोडल्याचा खसपसाट येत होता.

"मोठी बहादुरी केलीस गड्या तू. मला कळलं सगळं."

सता म्हणाला,

"पर लांडग्यानं कुत्रा मारला, मास्तर."

"हो, समजलं मला."

मग क्षणभर मी गप्प झालो. सताही झाला. दुधाची चरवी घेऊन बिरा माझ्यापुढे आला.

"धार काढत हुतो. रात करून आला?"

मी म्हणालो,

"आलो फिरत."

"बसा. आमच्यात काय च्या न्हाई, काय न्हाई. दूध पेता का?"

"नको. काही जरूर नाही चहादुधाची."

"तसं कसं म्हणून भागतं? घ्या की. उलिसं आमचा मान म्हणून. जा रं पोरा, पेला आन आतनं."

बिरा माझ्यापाशीच कट्ट्यावर टेकला.

मी विचारले,

"शाळेत का नाही आला सता चार दिवस?"

"न्हाई आला. मीच म्हनलं, जा मेंढरांमागं."

"मग नड संपली असली तर आता पाठवा उद्यापासून."

बिरा थोडासा हसला. पेल्यात ओतून त्याने दूध माझ्यापुढे ठेवले आणि सताला चरवी आत न्यायला सांगितले.

ते चविष्ट दूध मी चाखतचाखत पिऊन टाकले. शेरडाच्या दुधाला थोडासा वास येतो, पण तो सवयीने येईनासा झाला होता.

मग सावकाशपणे बिरा म्हणाला,

"सता आता शाळंला न्हाइ याचा मास्तर-म्हणजे का, तर मीच नको म्हनून सांगटलंय. बास झाली शाळा. आता आपलं आपल्या उद्देगाला लागा."

"पण एकाएकी असा का काढता त्याला? शिकू द्या की सातवीपर्यंत."

मानेला झोका देऊन बिरा म्हणाला,

"का करायचं हाय? अवं त्याचा आता चांगला नेटका गडी झाला. एकऱ्यानं लांडगा तोडला त्येनं. पोरठोर न्हाई राह्यला त्यो. मग आता शाळा कशाला अन पाटी कशाला? लागू द्या आपल्या उद्देगाला!"

मी पुष्कळ सांगून बघितले, पण पोराची आणखी चार वर्षे वाया घालवायला बिरा तयार झाला नाही. पुन्हापुन्हा त्याने निश्चयपूर्वक सांगितले की, 'आता मी पोराला शाळेत पाठवणार नाही. माझ्या संगतीला आणखी एक गडी झाला. तेवढाच माझा कामधंदा लवकर उरकल. तुम्ही आग्रह धरू नका.' आणि शाळेत येण्यासंबंधी सतानेही विशेष हट्ट धरला नाही. तास-अर्धा-तास वाद घालून मी उठलो आणि उघड्या रानातला गार वारा घेत गावाकडे चालू लागलो. माझे मन उदास झाले.

दुपारची शाळा सोडून एकदा मी गावाबाहेर विहिरीकडे अंघोळीला निघालो असताना म्हातारा कारभारी माझ्या मागोमाग येऊ लागला. एकदोन वार मी मागे वळून बघितले, तरी तो येतच होता. दुपारचे उन्ह नांगरलेल्या जमिनीवर झळ्या मारीत होते, आणि अंगात काही नसलेला, धोतराचा खोचा मारलेला कारभारी बांधाबांधाने माझ्या पाठोपाठ येत होता. प्रथम मला वाटले, कामासाठी कुठे तरी निघाला असेल. पण मी बांध सोडून ढेकळे तुडवीत विहिरीकडे जाऊ लागलो तेव्हा त्यानेही बांध सोडला. ढेकळे तुडवीत तोही विहिरीच्या बाजूनें येऊ लागला. अंघोळ करण्यासाठी आला म्हणावे तर जवळ धोतर-तांब्या काही नव्हते. उगीचच माझ्या छातीत धाकधुक होऊ लागले. परत मागे न बघता विहिरीपाशी गेलो. कपडे काढून ठेवले आणि लंगोट लावून आत उतरलो. पाण्यात पडलो. थोडा वेळ डुबक्या मारून वर येऊन बसलो, आणि अंग घासू लागलो.

म्हातारा कारभारीही पायऱ्या उतरून आत आला आणि मी बसलो होतो तिथून वर दोन पायऱ्या सोडून बसला. थोडा वेळ थांबून म्हणाला,

"एका गावात राहून एकमेकाशी भाषा करायची न्हाई हे बरं न्हाई, मास्तर!"

हा आपणहून कसा बोलला याचे मला आश्चर्य वाटले. मी म्हणालो,

"बोलणं बंद केलं तुम्ही बाबा, मी नाही."

"अरं पर का बोलत न्हाई, कशापायी बोलत न्हाई, हे कधी तू मला इचारलंस का?"

"कशाला विचारू?"

"का, कमीपणा वाटला व्हय तुला त्यात? अरं, मानपान आमी थोरल्यांनी



बघायचं, का तुमी कालच्या लेकरांनी, आं ?"

या बोलण्याने मी थोडासा हललो. मीही इतके आखडून वागायला नको होते. समजूतदारपणे पुन्हा म्हाताऱ्याशी बोललो असतो तर त्याने कारण खचीत सांगितले असते. मग म्हाताराच बोलू लागला,

"मला बाळ्यानं सांगितलं, आमच्या अंजीला तू चोळी दिलीस. गोष्ट खरी का ?"

माझा चेहरा गोरामोरा झाला. क्षणभर काय उत्तर द्यावे हे मला सुचेना. म्हातारा असे काही विचारील, त्याच्या न बोलण्यामागे असे काही कारण असेल, याची अंधुकशी कल्पनाही मला नव्हती. अंजीला कधीकाळी मी चोळी आणून दिली होती, ही गोष्ट मी विसरून गेलो होतो. मी काही बोलत नाही हे बघून म्हातारा पुन्हा म्हणाला,

"त्यानं मारुतीची पायरी शिवली. तू चोळी देताना, आन् अंजीनं ती हसत हसत घेताना त्यानं बघितलं. हे कळताच माझं डोस्कं गेलं. पोरीला मी मारमार मारली अन् तुझ्याशी बोलणं सोडलं. पर तुझ्यावर माजी पाळत व्हती. त्यावर आजपतूर मला काय वाईटवकटं दिसलं न्हाई. मग म्हनलं, एकवार खरंखोटं करावं."

"खोटं आहे, साफ खोटं आहे. बाळ्या नालायक माणूस आहे. तुमची-माझी घसट त्याला बघवेना, म्हणून त्यानं हे माझ्यावर कुभांड रचलं."

माझा श्वास जोराने होऊ लागला. काळजाचे ठोके जलद पडू लागले.

म्हाताऱ्याने पुन्हा म्हटले,

"मग चोळी दिली ही गोष्ट खोटीच म्हन की !"

"मी चोळी दिली पण ती मोफत नाही. अंजीनं खण माझ्यापाशी दिला आणि चोळी तालुक्याहून शिवून आणायला सांगितली. मी तुमच्याशी बोललो नाही. कारण तिनं मला सांगितलं होतं—चोळी मी चोरून शिवतेय, म्हाताऱ्याला सांगू

नका. पाहिजे तर तिची-माझी रुजवात घाला. असा नालायक माणूस नाही मी. कुणी काहीही सांगितलं तरी मी मुकाट ते करतो, सर्वांच्या उपयोगी पडतो, याचे उपकार तुम्ही लोक असे फेडाल याची मला कल्पना नव्हती. मला काही जरुरी नाही. नुसती शाळा बघून मला राहाता येईल. पोरांना चार अक्षरं शिकवून जाता येईल."

हे मी इतके भरभर, तुटकपणे बोललो की म्हाताराही गडबडून गेला.

"हे बघ, मला खरं वाटलं म्हणून मी तुला तसं बोललो का? तुला काय केलं का? आता माजी मलाच ती गोष्ट खरी वाटंना, त्यात तू आज खुलासा केलास. बालट्या अगुदरच तुज्या वाइटावर हाय. त्यानं लेकानं बळंच कास्याचा नायटा केला. असू, तुझ्या मनात पाप न्हाई न्हवं?"

मी अजूनही जोरात होतो. त्यात म्हाताऱ्याकडेच बाजू उलटली हे त्याच्या बोलण्यात, तोंडावर उमटले. तेव्हा मला जास्तीच चेव आला.

"हां, अजून मला विचारा पाप आहे म्हणून! शहाण्या माणसानं तुमच्या गावात राहणं हे पाप आहे. तुम्ही लोक भल्याला गाढव कराल. बस, झाली एवढी नोकरी पुरे झाली. मी वर अर्ज करतो आणि बदली करून घेतो दुसऱ्या गावी."

असे शेवटचे बोलून मी वर आलो. कपडे घालून घराकडे आलो. म्हातारा पायरीवर किती वेळ बसला होता आणि परत उठून कधी आला ते मला कळले नाही.

त्या दिवशी सर्व दिवसभर माझा राग विझला नाही. कितीही विवेक केला तरी बालम्याचा सूड घ्यावा ही बुद्धी गेली नाही. भरगावात त्याला धरून मारावे, असे मला वाटू लागले. पण माझ्यासारख्या दुबळ्या माणसाला ते शक्य नव्हते. काहीतरी कुभांड घालून त्याला तुरुंगात डांबावे, निदान ओळखीच्या फौजदाराकडून थोडा चोप आणि चांगला भरपूर दम द्यावा, असे वाटू लागले. मी मनाने फारच खाली गेलो.

माझी ती वृत्ती आयबूने ओळखली. काय झाले असावे याचा त्याला अंदाज बांधता येईना, मला विचारायला मन धजेना आणि मी आपणहून काही बोलेना. तो सारखा माझ्या भोवती भोवती करत होता. आणि मी काही बोलत नव्हतो. अखेर रात्री अंधारात पडल्यापडल्याच मी आयबूला म्हणालो,

"आयबू, बालम्यानं फार डाळ नासली गड्या!"

दारापाशी आयबू चादर घेऊन पडला होता. तो म्हणाला,

"त्याला एकवार चांगला धडा द्या मास्तर!"

"धडा देणं कठीण नाही रे, पण उगाच गावचा वाईटपणा यायचा. आजपर्यंत चांगुलपणानं दिवस काढले. कुणाकडून हूं म्हणून घेतलं नाही."

आयबूलाही ते पटले. थोडेसे समजावून सांगितले की ते त्याला चटकन पटत असे. निदान पटल्याचे तो चेहऱ्यावरून दाखवत असे. तोंडानेही बोलत असे.

"आज काय केलं मास्तर त्यानं तुमचं?"

"तो काय करणार लावालावीवाचून? कारभारी बोलत नव्हता त्याचं कारण बाळ्या होता."

"ते मी तुमच्याशी बोललोच होतो."

"मास्तरचा आणि अंजीचा वाईट संबंध आहे, असं सांगितलं म्हणे बाळ्यानं म्हाताऱ्याला!"

या अनपेक्षित बातमीनें आयबूच्या तोंडून एक झकास शिवी बाहेर पडली. बाळ्याने खोटे-नाटे असे दुसरे काहीही सांगितले असेल, पण त्याने मास्तरचा आणि अंजीचा संबंध जोडून कारभाऱ्याला सांगावे या गोष्टीचे आयबूला नवल वाटले, आणि मग रागही आला. तो म्हणाला,

"बाळ्या इतका लांब पोचंल असं वाटलं न्हाई."

मी म्हणालो, "गावात कुणीही माझ्या वाइटावर नाही, पण बाळ्या मात्र सुरुवातीपासून सापासारखा माझ्यावर डूख धरून आहे. काय करावं काही कळत नाही. बरं, तो समोरासमोर येऊन दोन हातही करीत नाही. आडून गोळ्या मारतो."

बोलता बोलता मला पूर्वी मी प्रथम आलो तेव्हा बाळ्याने या खोलीत येऊन मला दम कसा भरला होता ते आठवले, आणि अंजीप्रकरणावरून गावाला पेटवून हा माणूस केव्हातरी मला धोपटील असे वाटले. बराच वेळ मला झोप आली नाही. आयबू घोरू लागला.

त्यानंतर तिसरेचौथे दिवशी रात्री बराच वेळ चावडीसमोर बसून मी परत आलो. दार उघडले तेव्हा आयबू झोपला होता. काडी पेटवून मी अंथरूण बघितले आणि पडलो. झोपून गेलो.

पहिली झोप होते न होते तोच कसल्यातरी गलबल्याने मी जागा झालो. प्रथम काही कळेना. नंतर वाटले की चावडीकडे काहीतरी गोंधळ चालला आहे.

अंधारातच उठून बसून मी कान दिला. केवळ गलक्याखेरीज काही ऐकू येईना. लांडगा आला असावा किंवा कुठे साप निघाला असावा असे मला वाटले. आणि आयबूचा अंदाज काय आहे हे बघण्यासाठी म्हणालो,

"आयबू, गोंधळ कसला रे?"

आयबू लवकर जागा झाला नाही. तेव्हा अंधारातच त्याला हलवून जागे केले. तो बावरला आणि उठून बसून "काय काय, कोण हाय" असे करू लागला. थोडा सावध झाला तेव्हा मी विचारले,

"तुला गलगा ऐकू येतो का? चावडीपुढं माणसं जमलीत."

त्यानेही कान देऊन ऐकले.

"कायतरी गोंधळ झालाय चावडीपुढं. बघून येऊ का?"

मी म्हणालो, "चल, मीही येतो."

पांघरुणाच्या खोळी मारून आम्ही दोघेही बाहेर पडलो. काळोख किट्ट होता, त्यातून सरावाने भराभरा गेलो. चावडीपाशी पोचलो. प्रथम दिसला त्या माणसाला मी विचारले,

"काय झालं ? गोंधळ कसला ?"

तो म्हणाला,

"दादू बाळ्याला कुनीतरी हानलं."

"कुणी ?"

"कोन हुता तो अंधारात दिसला नाही."

गर्दीतून घुसून मी पुढे झालो. दिवा घेऊन बाळ्याची म्हातारी बसली होती. "अग बया, आता काय करू ?" अशी ओरडत होती. आणि दादू बाळ्या धुळीत पालथा पडला होता. त्याचा पटका उडाला होता. अंगरखा फाटला होता. बाळ्या बेदम मार खाल्लेल्या कुत्र्यासारखा जीभ काढून धापा टाकीत होता. कारभारी, रामा बनगर दोन पायांवर बसून राहिले होते. सारखे म्हणत होते,

"अरं, तू उठूनतरी बैस दादू. झालं काय ? मारलं कुनी ?"

आणि बाळ्या डोळे मिटून नुसतीच मान हलवीत होता. त्याला उठायला येत नव्हते, बोलायला येत नव्हते.

मी म्हणालो,

"त्याला असा धुळीत काय टाकलाय तुम्ही लोकांनी ? उचलून घरात न्या."

सर्वांनी माझे म्हणणे उचलून धरले, पण कोणी पुढे होऊन त्याला उचलीना. मग आनंदा रामोशी पुढे आला आणि मेलेले बकरे उचलावे तसे त्याने बाळ्याला उचलले. घराकडे चालवले.

पंधरावीस माणसांचा घोळका खाकरतखोकरत, काय झाले ते परस्परांना सांगत, विचारत त्याच्यामागून निघाला.

बाळ्याच्या घरात पोचताच घोंगडे टाकून त्यावर बाळ्याला घातले. त्याची म्हातारी रडतभेकत होती. तिच्यावर डाफरून कारभारी म्हणाला, "तू गप सुद्रा काय कळतंय का न्हाई ! त्यो काय मेलाय व्हय गहिवर घालायला ?"

घरात, घराबाहेर दाटीने लोक उभे राहिले. तोंडावर पाणी शिंपडले, वारा घातला, तेव्हा बाळ्या धापा टाकायचा थोडा गप झाला. डोळे फिरवून आजूबाजूला बघू लागला.

मी म्हणालो,

"मला ओळखलं का ?"

तेव्हा त्याने काही न बोलता तोंड दुसऱ्या बाजूला फिरवले. त्याच्या तोंडापाशी तोंड नेऊन कारभारी म्हणाला,

"भानावर आलास का दादू ? मी कोन हाय ?"

तेव्हा दादूने घुटका गिळला आणि म्हाताऱ्याचा हात आपल्या हातांनी गच धरला.

"भिऊ नकोस. तुला काय होनार न्हाई."

असे म्हणून म्हातारा त्याचे हातपाय रगडू लागला. कुणीतरी म्हणाले,

"'मेलो मेलो—मला मारलं गा—' म्हणून आरडला तवा मी पळत घरातनं भायेर आलो. अंधारात काय दिसंना. पुढं होऊन बघतो तर कुनी तरी खाली पडून इवळतंय. मी इचारलं, 'काय झालं, कोन हाय गा!' तर ह्यो बोल्ला 'मी दादू—मला मारलं!'"

रामा म्हणाला, "अरं, पर कुनी, काय, कशापायी—का आपलं मारलं म्हटलं की भागलं!"

सांगणारा म्हणाला, "देवाला डोळं. त्यो काय मग बोलंनाच, तर कळावं कसं?"

"तू कुणी पळताना, ल्पताना न्हाई बघितलंस!"

"न्हाई बा. आईची आन न्हाई. ल्बाड कशापायी सांगू?"

"मग मारलं म्हणावं कुनी?"

कुणीसे बाहेरून म्हणाले, "ह्यो काय तरी भानामतीचा खेळ हाय!"

"अरं, मग पाटलाच्या वाडीला जावा की कुनीतरी पळत आन त्या व्हल्राला घेऊन या. चांगला देवरुषी हाय म्हनं त्यो."

कोणी जायला तयार होईना. मी–तू, मी–तू सुरू झाले. मला काही हे पटेना. थोडा आवाज चढवून मी म्हणालो,

"भानामती नाही, काही नाही. त्याला थोडा दम खाऊ द्या, उठून बसू द्या. म्हणजे काय झालं ते कळेल."

पण पहिला कोंबडा आरवला तरी बाळ्या उठून बसेना. हळूहळू गर्दी कमी झाली. लोक निघून गेले. मी, कारभारी, आयबू, रामा आणि गावातले दोघेचौघे जण मात्र बसून राहिलो. फटफटीत होऊन उजाडायच्या वेळेला बाळ्याने डोळे नीट उघडले. पाणी मागितले. ते दिले. गरम चहा करून पाजला, तेव्हा त्याला अधिक हुशारी आली.

रामाने विचारले, "बरं वाटतं का दादू?"

बाळ्या क्षीण आवाजात म्हणाला, "व्हय."

"तुला मारलं कुनी?"

दम घेऊन दादू म्हणाला, "मला मारनारं दिसलं नाहीत."

"किती जन होतं?"

"काय कळलं न्हाई. अंधारात एकदम घोंगडी अंगावर टाकली, तोंडात बोळा कोंबला आन् काठ्या घातल्या. गुरावानी मारलं रं रामा, भडव्यांनी मला!"

"तुजा कुनावर वहीम हाय का?"

बाळ्याने नकारार्थी मान हलवली आणि माझ्याकडे बघितले.

उजाडून उन्हे आली, तेव्हा "बरं, पड आता" असे सांगून कारभारी उठला. आम्ही उठलो. बाहेर पडलो.

रामा म्हणाला,

"या भडव्याच्या हजार भानगडी. कुनी परगावच्या मानसांनी मारलं असलं तर काय पत्त्या लागनार ?"

आयबू म्हणाला,

"त्यो बोलत न्हाई, पर मारनारं कोन हे त्याला पक्कं माहीत हाय!" कारभारी म्हणाला,

"असनारच. चोराच्या वाटा चोराला ठाव्या. वरंच्या बरं, नुसता मारून सोडला. जीव घेतला असता तर कुठं बचायचं होतं?"

घरी येताच मी आयबूला म्हटले,

"आयबू, बालस्याचं आणि माझंच वाकडं होतं. उद्या त्यानं वहीम धरला तर ?"

आयबू तुच्छपणे बोलला,

"त्यो काय नरपुडा करतोय. बेगमी झालीय बघा त्याची. सहा महिने घोंगडं सोडत न्हाई आता तो!"

आणि झालेही तसेच. आठपंधरा दिवस झाले तरी बालस्या हिंडूफिरू लागला नाही. लवकर लागेल अशी चिन्हंही दिसली नाहीत. दिवसभर तो अंथरुणात विव्हळत पडे. कुणी गेले तर काही बोलत नसे. ते बघूनबघून सगळे गाव बोलू लागले,

"बालस्याला भुतानं घोळसला. आता ह्यातनं तो जगत नाही!"

## १४

एकदा सहज माझ्या मनात विचार आला की या एवढ्याशा गावात खंबीर अशी बांधलेली एखादी इमारत असावी. असावी हे ठीक होते, पण ती बांधली पाहिजे गावच्याच खर्चाने. असा खर्च द्यायला ही वेडी धनगरे कबूल होतील का ? तिकडे एक म्हण होती, 'धनगरी वेड सहा महिने जाणार नाही!' धनगरांच्या आडमुठ्या वृत्तीवरून ती पडली असावी. गावात इमारत असावी हे कुणाला पटले नसते. शाळा बांधावी तर शाळेसाठी जागा होती, आणि ती अपुरी पडेल असा काळ येणे नजीकच्या भविष्यात तरी शक्य दिसत नव्हते. मग इमारत कशाची ? सहजच सुचले की, तालीम बांधावी. पोरांना खेळण्यासाठी, वेळप्रसंगी गावकऱ्यांना एकत्र येऊन बसण्यासाठी प्रशस्त अशी तालमीची इमारत बांधावी. संस्थानच्या राजेसाहेबांना

व्यायामाची आवड होती. या कारणामुळे शिक्षणखात्यातून किंवा खाजगीतून काही मदत होईल. या गावात मी शाळामास्तर होतो याची आठवणही राहील.

रात्री घरोघरी रामोशी पाठवून मी गाव जमविले. भाकरी खाऊन तमाखू दाढेला धरलेली मंडळी घोंगड्या पांघरून जमली आणि शाळेपुढच्या पटांगणात बसली. मी जोत्यावर होतो. माझ्यापुढे कारभारी होता. रामा बनगर होता. शेकू होता. तातूबा होता. रानात काही कामधाम नसल्यामुळे सर्वजण आवर्जून आले होते.

सुरुवातीला उगीचच इकडचीतिकडची चौकशी झाली. त्यात बाळ्याला अजूनही जागचे हालता येत नाही, सगळ्या अंगातून सारख्या कळा येतात, असे कळले. कुणीतरी त्याला फौजदारी करायला सुचवले होते. तेव्हा तो म्हणाला होता,

"फौजदारी केली आणि मारणारे मिळाले तरी माझा मार काही भरून निघत नाही."

गोष्ट खरीच होती.

मग मी मुद्द्याचा विचार सांगितला. म्हणालो,

"माझी अशी इच्छा आहे की गावात एक चांगली इमारत असावी. खोपटे, आपल्या माळ्या, यापेक्षा मजबूत अशी जागा असावी. रोज आपण सर्वजण धुळीत बसतो. पाऊसपाणी असले, फार गारठा असला, म्हणजे कोणी इथं बसायला येत नाही. कुणी शाळेचा अधिकारी आला, फौजदार शिपाई आला, की त्याला उतरायची पंचाईत होते. महारवाड्यातसुद्धा तक्क्याची इमारत असते, मग आपल्या गावात का असू नये? म्हणून माझ्या मनात आलं आहे की एक तालीम गावात बांधावी. तुमचं म्हणणं काय आहे?"

लोकांत कुजबूज झाली. मास्तराने हे काहीतरी वेड घेतले आहे, अशी त्यांची समजूत झाली असावी. आपसातच बोलू लागले, तेव्हा मी ओरडून म्हणालो,

"आपसात बोलू नका तुम्ही. मला गाढव म्हटलं तरी चालेल, पण ते स्पष्ट म्हणा. माझ्यापाशी म्हणा."

बाळा बनगर चावतचावत म्हणाला,

"तालीम बांधायला कुटं पहिल्वान हायेत गावात!"

"शाळा सुरू करतानाही तुम्ही म्हणाला होता, कुटं पोरं आहेत गावात? पण आता पोरं येतातच ना? पाचपंधरा मुलं उद्या तालुक्याच्या शाळेत जातील. सातवी पास होतील!"

कुणी म्हणाले,

"कशाची होत्यात? जरा नेटक झाली की मेंढरांमागं जातील. सातवी पास होऊन तुमावाणी मास्तर थोडीच होणार ती? आमच्यातला कुणी शिकून अंमलदार झालेला हाय का तालुक्यात?"

म्हातारा कारभारी समजुतीने म्हणाला,

"अरं, आज पहिल्वान नसला कुणी, तरी पोरं खेळू लागतील. खेळताखेळता एखादं निवडलं त्यांतलं !"

मी म्हणालो,

"आणि समजा, नाही निवडलं तरी गावाला उपयोग नाही का इमारतीचा? तुम्ही गजी नाचता. त्याचं सामान दाही दिशांना असतं. ढोल एकीकडे, झांजा एकीकडे. लेझीम, बोथाटी, दांडपट्टा कुणी ना कुणी खेळतं. ते सगळं सामान तालमीत राहिलं, मोकळ्या वेळी ज्याला चांगली माहिती आहे त्यानं पोरांनाही हात शिकवले, तर काही वावगं होईल का?"

"पर तालीम बांधायची म्हंजे बक्कळ पैसा लागल. तो कुनी द्याचा?"

"गावानं वर्गणी करावी. घरटी दहावीस रुपये द्यावेत!"

"हं, हायेत कुणापाशी?"

"पुष्कळांच्यापाशी आहेत. मला ठाऊक आहे. त्यांच्यापाशी नसतील तर त्यांनी रोजगार द्यावा. गाडीबैलं द्यावीत. आपल्या रानांतील झाडं द्यावीत. जर सगळ्या वाडीनं मनावर घेतलं तर एक दहाखणी इमारत बोलबोल म्हणता होईल."

मी बोललो, पण हा विचार काही कुणाला फारसा पटला नाही. उघड विरोध करणे कुणाला जमले नाही. इमारत अर्धी राहील, उगीच सोंग होईल, असेच बहुतेकांचे मत पडले. पण मी गप्प राहिलो नाही. नाना परींनी ही गोष्ट त्यांना सांगत राहिलो.

गावातले वृद्ध लोक मी पुन्हा जमवले आणि त्यांच्याशी विचारविनिमय केला. ठिकठिकाणच्या गावांनी शाळा कशा बांधल्या आहेत, सरकारने त्यांची वाहवा कशी केली आहे, त्या गावांची नावे किती पुढे आली आहेत, हे सर्व मी त्यांना सांगितले आणि त्यांच्याकडून होकार घेतला.

ही माणसे तयार झाली तेव्हा साहजिकच गाव तयार झाले. एकाने करू या म्हणताच सर्वांनी करू या म्हटले. घरटी दहादहा रुपये देण्याचे लोकांनी मानले. ज्यांची बैले होती, गाड्या होत्या, त्यांनी श्रम देण्याचे पत्करले. या चारसहा महिन्यांत इमारत उभी करायची, राजेसाहेबांना आणून तिचे उद्‌घाटन करायचे, हे पक्के झाले. कधीही न आलेला राजा मास्तराच्या करामतीमुळे आणि गावच्या एकजुटीने या धनगराच्या गावी येणार ही कल्पनाच लोकांना फार उत्साही करू लागली. आपल्या गावात तालीम होणार आहे आणि राजा येणार आहे हा विषय घरोघरी झाला. कित्येक दिवस सांगण्यासारखे, चघळण्यासारखे असे काही घडले नव्हते, ते लवकरच घडणार होते. लोकांनी तत्परतेने म्हाताऱ्या कारभाऱ्यापाशी आपल्यावर बसलेली वर्गणी आणून दिली. मी मदतीसाठी सरकारात अर्ज केला. गवंडी, सुतार बनण्याचे काम सुरू झाले. कारण असले कारागीर वाडीत नव्हते. ते परगावाहून म्हणतील तो रोजगार देऊन आणणे भाग होते. लाकडाची जरुरी होती.

दूर असलेल्या डोंगरातून दगड आणावे लागणार होते. त्यासाठी वडार ठरवायचे, त्यांनी तिथे दगड पाडायचे, ते गावात आपण गाड्या जुंपून आणायचे, मग गवंड्यांनी ते घडवायचे! 'घर बघावं बांधून' म्हणतात ते काही खोटे नाही. खेड्यात साध्या गोष्टीने अडते. इतके क्षुल्लक कारण बांधकाम लांबायला पुरते की विचारून सोय नाही.

अशी जय्यत तयारी सुरू झाली, आणि मग जागा निश्चित करावी असे वाटले. माझी कल्पना होती की जागा काय, कुठेही मिळेल. पण प्रत्यक्ष बघायला गेलो तेव्हा तालमीला योग्य अशी जागा आढळेना. गावात पण सर्वांना सोयीची पडेल अशी एकच जागा मला आढळली. पण त्या जागी पडझड झालेले एक चारखणी घर होते, आणि त्याला कुलूप होते. मनोमनी ती जागा मी नक्की केली आणि रात्री मंडळीला सांगितली.

कारभारी म्हणाला,

"पर ते घर दुसऱ्याचं हाय गा!"

"कुणाचं?"

"वाणी हुता एक परगावचा आलेला. त्यो ऱ्हात होता हितं. त्यानंच हे घर बांधलं?"

"तो आता आहे कुठं? विकत मागू त्याला आपण जागा."

माझ्या या बोलण्यावर लोक हसले. कुणीसा खुलासा केला.

"वाणी मेला. च्या-बिडीपायी वंस खंड झाला!"

आणि मग मला त्या जागेच्या मालकाची हकीकत लोकांनी सांगितली. खरोखरच सद्या वाणी चहा-विडीपायी मेला होता! दारूपायी, बाईपायी, जुगारापायी घरादाराचा सत्यानाश झाल्याची उदाहरणे आहेत. पण चहा-विडीसारखे मामुली व्यसन करून सद्या वाणी कसा मेला? त्याचे कसे वाटोळे झाले? हा वाणी जेवतखात नसेच म्हणे. तो आपला सारखा कडक चहा करून घेई. सारखा विड्या ओढी. घरात त्याची म्हातारी होती. तिने पुष्कळ सांगून पाहिले पण पोराने ऐकले नाही. उद्योगधंदा, काहीही न करता तो तासातासाला चहा घेई आणि पाचपाच मिनिटाला विडी ओढी. बरे, हेही एकटाच बसून करी असे नाही. आसपासच्या लोकांना तो आग्रहाने बोलावून आणी. दहावीस माणसे गोळा झाली म्हणजे हंडाभर चहा करी आणि तांब्या-पितळीतून त्यांना प्यायला लावी. विड्यांची बंडले त्यांच्यापुढे फेकी. लोकांना काय, फुकट मिळाले तर ते विषसुद्धा घेतील. सद्या बोलवायचा, लोक जायचे. चहा पिऊन, विड्या ओढून मागे त्याच्याविषयी बोलायचे,

"निव्वळ भंपक हाय वाणी. अशानं भिकारी होऊन बसंल!"

पण सद्याला त्याचे कधी काही वाटले नाही. तो दानशूरच झाला होता.

वर्षानुवर्षे असा कार्यक्रम चालू होता. हळूहळू जवळची, बापजाद्यांनी ठेवलेली पुंजी संपली. मग सद्याने दावणीच्या सुरेख गाई मोडल्या, जमिनीतला तुकडा विकला. हळूहळू त्याचे जवळचे मोडून चहा प्यायला सुरुवात केली आणि एके दिवशी विकण्यासारखे त्याच्यापाशी काहीएक राहिले नाही. पूर्वी चांगला तालीमबाज, सशक्त असलेला वाणी पाप्याच्या पितरासारखा झाला. धुराधुराने त्याच्या छातीचे सहाणे झाले. चहाचहाने भूक मेली. खोकला, दमा झाला. म्हातारी मरून गेली. सद्या एकटा उरला. काम करून काही मिळविण्याचे त्राण त्याच्यापाशी राहिले नाही. घराच्या पडवीत तो उगीच बसून राही आणि येणाऱ्याजाणाऱ्याला हाक मारून त्याच्याकडून विडी मागून घेई. गावातल्या म्हाताऱ्या बायका कणव येऊन त्याला गुळाचा चहा पाजत. अशा अवस्थेत सद्या काही दिवस जगला आणि एके दिवशी लूतभऱ्या कुत्र्यासारखा मरून गेला !

सद्याची ही विलक्षण हकीकत मी ऐकून घेतली आणि म्हटले,

"म्हणजे या जागेला आता कोणी वारस उरलेला नाही. मग तालमीसाठी ती घ्यायला गावाला काहीच हरकत नाही !"

पण याही गोष्टीला कोणी तयार होईना. वाण्याची जागा कशी घ्यावी म्हणून जो तो गप राहू लागला. मी पुन्हापुन्हा सांगून पाहिले; ती जागा पाडून साफ केली म्हणजे आखणी करायला बरे पडेल असे म्हणून पाहिले, पण कुणी लक्ष देईना. मग मीच एक दिवस शाळेच्या पोरांसहित गेलो आणि त्या घराच्या ढासळत्या भिंती उलगडायला सुरुवात केली. वानरसेना कामाला लागली. कुदळफावडी गोळा करून पोरे वाण्याचे पडके घर हलवू लागली. मास्तर हातात कुदळ घेऊन घर पाडू लागताच मग गावातील लोकही आले. पहिली कुदळ मारल्यावर सगळे पाप माझ्या माथी आले होते. पापाचा धनी मी झालो होतो, इतरांना आता धोका नव्हता. गावातली बरीच माणसे गोळा झाली आणि घर साफ झाले. चारसहा दिवस गेले आणि त्या जागी वाण्याचे घर होते याचा मागमूसही उरला नाही.

मग झाडे गोळा करण्याची मोहीम सुरू झाली. गावातले दोनचार जबाबदार लोक बरोबर घेऊन मी शेतमळे हिंडू लागलो. ज्यांच्या-ज्यांच्या रानात इमारतीला योग्य असे लिंब होते त्यांनी ते, खळखळ करून का होईना, पण द्यायला सुरुवात केली. त्यात पुष्कळ वेळा चांगले नसलेले, आतून पोखरलेले झाडच मालक दाखवी, त्यावरून त्याच्याशी हुज्जत घालावी लागे. माझा जीव कावून जाई. मी काही माझ्या घरासाठी लाकूड मागत नव्हतो. तरीपण लोकांना झाडे सोडवत नव्हती. काही खुषीने देणारेही भेटले; नाही असे नाही; पण जिकीर झाली. झाड दिले की मग माणसं नेऊन ते पाडायचे, तोडायचे, कुणाचीतरी गाडी बघायची, कुणाचेतरी बैल आणायचे, ते लाकूड आणून शाळेपाशी टाकायचे, सुताराच्या ताब्यात द्यायचे, असे चालू झाले. वेळेवर माणसे मिळायची नाहीत, गाडीबैल मिळायचे नाहीत. त्यासाठी कावणे,

अजीजी करणे, दम भरणे, हेही करावे लागे. असे सगळे अर्ती झाले म्हणजे मी कारभाऱ्याला म्हणे,

"बाबा, पुरे झाली तालीम. मी जातो रजा काढून. तुमची तुम्ही बांधा, नाही तर नका बांधू. तुम्हा कुणाला जरुरी नाही, तर मी उगीच का रक्त आटवू?"

कारभारी माझी समजूत काढी,

"लेकरा, तू गेल्यावर कुठली रं इमारत! केला एवढा आटापिटा पाण्यात जाईल. लाकडं कुजतील, दगडं पाडली ती लोक उचलतील. अरं, इमारत बांधायची म्हणजे सोपं न्हाई. तरास हुयाचाच. धा जणांचं काम म्हणजे त्यात म्हारकी आलीच आता पत्करलंय ते कडंला नेऊ या!"

पण मी काय ते मध्येच सोडणार होतो? छे, शक्यच नव्हते. आता तालमीची इमारत म्हणजे माझ्या स्वतःच्या यशापयशाची बाब होऊन राहिली होती. बनगरवाडीच्या अब्रूची बाब होऊन राहिली होती. आसपासची लहान खेडी कौतुकाने या वाडीकडे बघत होती. ही धनगरे, वेडी मेंढरे, यांच्या हातून असले काम कसे पार पडायचे? मास्तर पुष्कळ हौशी आहे; पण नुसती हौस काय कामाची?—असे म्हणत होती. त्यांना दाखवायचे होते. आजूबाजूला दहापाच खेड्यांत नाही अशी सुरेख तालीम बनगरवाडीला बांधायची होती.

या झाडे गोळा करण्याच्या मोहिमेत मी एकदा बाळा बनगराच्या रानात गेलो. बरोबर आयबू आणि आनंदा होता. विशेष गोष्ट म्हणजे बाळाच्या रानातले हे झाड आम्हांला पाहिजेच होते. तुळईसाठी त्याचा नेमका उपयोग होणार होता. आनंदाने वाटेतच बाभळीवर बसलेला व्हला गलोरीने मारला. तो तडफडू लागताच आयबूने जाऊन धरला. व्हल्याने मान टाकली. आनंदा पुन्हा झाडे हेरू लागला, आणि आयबू चालताचालता त्या मेल्या पाखराची पिसे काढू लागला.

मी एकटाच त्यांच्यापुढे गेलो. दुपारी चार-साडेचारची वेळ होती. मी रानात पोचलो, तेव्हा एका जुन्या दाव्याला पड घालीत बाळा त्या लिंबाच्या सावलीला बसला होता. नुसत्या धोतराशिवाय त्याच्या अंगावर काही नव्हते. अरुंद कपाळ, पसरट नाक आणि सपाट हनुवटी असलेला बाळा एकाग्रचित्ताने तुटलेले दावे दुरुस्त करीत बसला होता.

मी कशासाठी आलो आहे हे त्याने जाणले. आगतस्वागत केले नाही. बसासुद्धा म्हटले नाही. केवळ काही तरी बोलायचे म्हणून तो म्हणाला,

"कुनीकडं दौड मास्तरसायेब?"

मी हसत म्हणालो, "तुम्हांकडेच आलो होतो आवर्जून." आणि खालची ढेकळे साफ करून बसलो. बाळा पुढे काहीच बोलला नाही. धीर करून मीच म्हणालो,

"मग झाड केव्हा देताय तालमीला?"

"कुठलं झाड?"

अशा उत्तराची मला आता सवय झाली होती. तरीपण कळ आली. ती चेहऱ्यावर दिसलीही असेल. वरच्या लिंबाकडे बघून मी म्हणालो,

"दुसरं कुठलं ? हे सावलीला बसलोय तेच द्या."

मान हलवून बाळा म्हणाला,

"हे मिळणार न्हाई !"

"का बरं ?"

"माझी मर्जी."

"असं म्हणून कसं चालेल ?"

"बघीन कसं न्हाई भागत ते. मनगटात नेट असेल तो झाड पाडील हे, आन न्हील."

"बळजबरीनं न्यायचा प्रश्नच नाही. हा खुषीचा मामला आहे."

"माजी खुषी न्हाई. मला गाव नको आन तालीम बी नको. एवढं एक झाड हाय सावलीला माझ्या रानात. माजी गुरंढोरं, मुलंमाणसं सावलीला बसत्यात घटकाभर, ते तुमी नेता ? मी देणार न्हाई. झाडावर कुऱ्हाड घालायच्या अगुदर माझ्या नरड्यावर घाला अन मग खुशाल न्या."

"बराय !"

एवढेच म्हणून मी उठलो आणि गावाकडे चालू लागलो. वाटेत आयबू नि आनंदा भेटले.

"मिळालं का झाड मास्तर बाळाचं ?"

मी म्हणालो,

"नाही. तो म्हणतो, आधी कुऱ्हाड माझ्या गळ्यावर चालवा आणि मग झाडावर !"

त्यानंतर कारभारी, रामा, आणखी चारचौघेजण मिळून आम्ही बाळाकडे गेलो, तेव्हाही तो तुटक्या दाव्याला पड घालीत लिंबाच्या सावलीला बसला होता. त्याची शेरडे आजूबाजूला कान हलवीत बसली होती. बायको-पोरे बसली होती. त्याच लिंबाच्या सावलीत त्याने आपले दोन्ही बैल बांधले होते. त्याचा धनगरी कुत्राही अंगाचे वेटोळे करून बसला होता. आम्ही जाताच कुऱ्हाड घेऊन बाळा उठला. आम्ही जागच्या जागी थांबलो. हा महाकाय माणूस थेट मारामारीवर येतो काय, या शंकेने मी सर्द झालो. आणि बाळा कुऱ्हाड घेऊन आमच्याकडे आला. त्याला तसे येताना पाहून कारभारी पुढे झाला. बाकी कुणाचा पाय जागचा हलला नाही; पण वयाच्या उताराला लागलेला कारभारी जोडा ओढीत पुढे झाला आणि बाळाने जवळची कुऱ्हाड त्याच्या हातात देऊन म्हटले,

"काल मास्तराला सांगतलं होतं, झाड तोडन्याअगुदर माजी मान तोड. आता तुमाला सांगतो—"



एवढेच बोलून तो वळला आणि लिंबाखाली बसलेल्या आपल्या परिवाराकडे बोट करून म्हणाला, "ह्या इतक्या जनावरांच्या, मानसांच्या माना तोडा आन मग झाड तोडा!"

त्याच्या हाताला धरून कारभाऱ्याने त्याला सावलीत नेले, खाली बसवले. म्हणाला, "बाळा, गप बैस आन माजं ऐकून घे."

म्हाताऱ्याच्या हाताला हिसका मारून बाळा उठून उभा राहिला आणि हातवारे करून म्हणाला,

"मी कुणाचं ऐकणार न्हाई. तुम्ही लोक मला मातीत घालाल. मी तालमीला बळ देणार न्हाई, झाड देणार न्हाई. मग काय होणार ते होईल!"

कारभारी अजूनही शांत होता. "तू उगीच उतू जाऊ नगस बाळा. गावासाटनं एक झाड दिल्यानं तुझं घर बुडायचं न्हाई."

"बुडू ना बुडू, पर मी झाड देणार न्हाई."

"हे पक्कं का?"

"हां, पक्कं. पंतसरकार आला तरी मी झाड देणार न्हाई, इंग्रजसाहेब आला तरी देणार न्हाई. काय कोन मला फासावर देणार हाय ते दिऊ दे!"

एवढे ऐकल्यावर कारभार म्हातारा परत फिरला आणि हात करून म्हणाला, "हां, चला माघारी!"

सगळेच जण बाळाच्या उर्मटपणाने तापले, त्याच्या रानात लावलीसाठी एवढे एकच झाड होते ही गोष्ट तितकीशी खरी नव्हती. बांधावर लहानलहान लिंबाची झाडे होती. त्याला अगदीच उन्हात बसायला लागणार नव्हते.

कारभारी चला म्हणाला तरी रामा बनगर हलला नाही. तो जोराला येऊन म्हणाला,

"बाळा, हे बरं न्हवं. तू पांढरीला डावलतोयस!"

बाळा ओरडून म्हणाला,

"मला पांढरीची जरूर न्हाई. आज आठ साल मी माज्या जमिनीत ऱ्हातोय. हितनं फुढं ऱ्हाईन. मला पांढरीचा धाक कशाला दाखवतोस! बोडकीला बावाचा धाक काय रं राम्या?"

हे ऐकून रामा, आनंदा चवताळून बाळाच्या अंगावर जाऊ लागले, तेव्हा कारभाऱ्याने हातातले दांडके हाणून त्यांना मागे ढकलले. करारी आवाजानें तो बाळाला म्हणाला,

"बाळा, बोललास हे कडंपतूर ने. पांढरीपाशी कदी येऊ नकस."

आणि एकमेकाशी काहीही न बोलता आम्ही सर्वजण रानातून गावात आलो.

गावापाशी येताच म्हातारा म्हणाला, "या बाळ्याला कुनी इच्यारू नका, त्येची जनावरं आपल्या रानातून जाऊं दिऊ नका. त्येची नड-अडचण जाणू नका. बगू दे मला किती कड काढतो तो!"

लवकरच ही बातमी सगळ्या वाडीत झाली. बाळा बनगराला वाळीत टाकले, ही बातमी पोराटोरांनासुद्धा समजली, आणि ती लगोलग अमलातही आणली गेली. बाळाचा पोरगा बकरे कापण्यासाठी आयबूला बोलवायला आला, तेव्हा आयबूनें साफ सांगितले,

"मी येणार नाही. तुझं घर गावानं वाळीत टाकलंय."

"पर तुजा आन गावाचा काय संबंध! तू बाहेरचा—दिल्या टुकड्यावर काम करनारा. मी फुकट काम कर म्हणत न्हाई तुला. शेरपायली मागून घे."

"तुज्या शेरपायलीची मला गरज नाही. तू जा!"

ही गोष्ट जेव्हा बाळाला समजली तेव्हा तो पोरावरच डाफरला. पोराला त्याने सहा कोसांवरच्या तालुक्याला धाडले आणि तिथनं मुलाणी आणून बकरे कापले.

रानात काम करायला रोजगाराने वाडीतले कोणी येईना. तेव्हा जास्त रोजगार देऊन त्याने परगावचे रोजगारी आणले. त्याच्या विहिरीला खारट पाणी होते. म्हणून बायको दोन केळ्या पाणी वाडीच्या विहिरीला न्यायची. तिला लोकांनी बंदी केली. तेव्हा बाळा रोज तीन मैलांवर जाऊन तिथल्या विहिरीचे गोडे पाणी प्यायला आणू लागला. त्यानें गुरे दुसऱ्याच्या रानातून न्यायचे बंद केले. त्याची पोरे शाळेत, गावात येईनाशी झाली. बाळा बनगरानें पांढरीपुढे नमते घ्यायचे साफ नाकारले! तो चिवट माणूस आपला हेका चालवीत राहिला आणि वाडी तो किती कट काढतो याची वाट बघत राहिली!

## १५

माझा अंदाज साफ चुकला आणि तडाख्याने हाती घेतलेले तालमीचे काम मुंगीच्या गतीने पुढे सरकू लागले. इमारतीला लागणारे लाकूड जमविण्यात फार काळ गेला. खाणीतून काढून वडारांनी दगड दिले, पण ते गावात आणण्यासाठी फार आटापिटा करावा लागला. बांधकामासाठी लागणारा चुना तालुक्याहून आणणे, त्याची घाणी

काढणे, खिळेमोळे जमवणे—या बारीकसारीक गोष्टींनी उगीचच वेळ खाल्ला. मला कसलाच अनुभव नव्हता, त्यामुळे हा वेळ उगीच जातो आहे असे वाटून मी काम करणाऱ्या लोकांवर ओरडे; पण वाडीच्या लोकांना या गोष्टी नित्याच्या होत्या. इमारतीचे, विहिरीचे काम खेड्यात काढले की ते पुरे होणे हीच घटना महत्त्वाची. नाहीपेक्षा धडाडीने सुरू केलेली असली कामे वेळ घेऊनही अपुरी राहातात. घर बांधले जाते आणि दरवाजा राहातो. कधी खुंट्या राहातात, कधी जोते राहाते. विहीर पुरी होते, पण कडे अर्धवटच राहते, दोन माचाडांपैकी एकच सुरू होते. मग बांधणाराही जरुरीपुरते झाले, आता काही अडत नाही, उरले काम पुन्हा करू, अशा विचाराने सैल पडतो. अर्धे काम पुढे कधीच पुरे होत नाही. अशी अर्धीमुर्धी कामे हरेक खेड्यात किती तरी आढळतात. वाडीच्या लोकांना हे ठाऊक होते. त्यामुळे काम झपाट्याने होत नाही याची खंत त्यांना वाटत नव्हती. रोजची आपली कामे करून ते तालमीकडे बघत होते.

या व्यापात भूक, झोप याचा विचार न करता मी रखडरखड रखडलो. आठआठ दिवस दाढी नाही, वेळच्या वेळीं अंघोळ नाही, जेवण नाही, असे फार घडू लागले. सुटीचा दिवस असला तरी मला घरी जाणे जमेना. चुना, घाणी, दगड, लाकूड, पायरी, कोपऱ्या, तुळया, खांब—याशिवाय दुसरा विषय डोक्यात नाही असे झाले.

वाडीतल्या बैलगाड्या मोडल्या, दगड वाहून वाहून बैलगाड्या खचल्या. गवंड्यांनी केलेल्या ठोकाठोकींनी गावाचे कान किटले. रस्तोरस्ती कपऱ्या झाल्या. ढलप्यांचा ढीग पडला.

हेलपाटे मारून मारून, पायपीट करून करून आयबूच्या पायाला कुरपे झाली. पडेल ते काम उचलल्यामुळे त्याचे अंग झडले. मुलखाचा चुकार असलेला आनंदासुद्धा कामसू झाला. धावपळीची कामे करू लागला. तालमीच्या कामात गढल्यामुळे बापाचे घराकडे फार दुर्लक्ष होते, अशी तक्रार रामाचा पोरगा करू लागला. कारभाऱ्याच्या कुणबाऱ्याची आबाळ होऊ लागली. तालमीच्या कामाची झळ सर्वांना पोचली. वाडीत असे एकही घर राहिले नाही की ज्याचा संबंध या बांधकामाशी आला नाही.

यात दुसरी सुगी गेली. एक वर्ष हा हा म्हणता गेले. लोकांची नांगरटीची कामे संपली. मेंढक्यांनी मेंढरे कातरली, लोकर निघाली. धनगरणींनी ती पिंजली. चातीवर, चरख्यावर कातली. सुताचे चोबे बाजारात विकून त्याचे पैसे केले. वर्षाची लुगडी घेतली. मेंढक्यांना पटके, धोतरे, अंगरखी घेतली. कुणी लोकर सणगरांना दिली आणि जाडजाड घोंगड्या विणून घेतल्या. मेंढरांची दुसरी वेते झाली. पहिली पोरे आईला ओळखीनाशी झाली. उन्हाळा संपला. पावसाळा येऊ घातला. आणि तालमीचे बांधकाम मात्र पुरे झाले नाही. मी स्वतःवर चिडलो, दुसऱ्यांवर चिडलो. पण कामाची गती वाढली नाही.

बाहेरचे लोक म्हणू लागले की हे काम आता होणार नाही. मास्तराने फुकट धनगरांना तसदी दिली, पैशाचा नास केला. मुळात आधी तालमीची गरज काय? मूठभर लोक असलेल्या गावाला तालीम पाहिजे कशाला? खेळणारी पोरे रानात खेळतील, वाळूत खेळतील. पहिलवान निवडून यायचा असेल तो त्यांतून येईल. तालीम नाही म्हणून तो थोडाच थांबतो! तालमीचे हे सगळे सोंग मास्तराने आणले आहे ते पैसे खाण्यासाठी. पगारावर भागत नाही म्हणून असे काहीतरी काढून धनगरे हुलीवर घालायची आणि स्वतःच्या खिशात पैसा ओतायचा! शेवटी कावून मी वर लिहून कळविले की, "तालमीचे काम पुरे झाले आहे. हुजुरांनी कृपाळू होऊन वाडीस भेट द्यावी. आणि तालमीचें उद्घाटन करावे." हे टपाल मी पोस्टात टाकले आणि वाडीतल्या मंडळीला जाहीर केले की "सरकारस्वारी या महिन्यात येणार आहे. तालीम पुरी करा किंवा त्यांना समोर जाऊन सांगा की आमची चुकी झाली, हे बांधकाम पुरे होत नाही!"

दादू बालट्या अजून अंथरुणावरच होता. त्याची बायको आणि म्हातारी देवरुषी, गंडे, ताईत करीत होत्या आणि त्याचा काही उपयोग होत नव्हता. स्वतः बालट्या स्वस्थ पडून होता. तो दोन्ही वेळा चांगले खायला देण्याविषयी ओरड करी. मी खूप खाईन, दूधतूप, साखरचपाती खाईन, बकरे, कोंबड्या खाईन आणि एके दिवशी फिरून जवान होऊन उठेन, असे त्याचे म्हणणे होते. त्याच्या आग्रहाप्रमाणे घरातील माणसे त्याला खाऊ घालीत होती; पण ते बापड्या बालट्याच्या पोटात ठरत नसे. खाल्ले अन्न त्याच्या अंगी लागत नव्हते, आणि जवान होऊन तो जागचा उठत नव्हता.

बाळा बनगर अजून पांढरीपुढे नमते घेत नव्हता. गाव त्याची नाना परींनी अडवणूक करीत होता आणि चिकट बाळा अजून होता त्याच जागी स्थिर होता.

शेकू आणि त्याची मुंडाहात उंच बायको रानात राबत होती. कारभाऱ्याची अंजी भिरभिऱ्या डोळ्यांनी गावात हिंडत होती. आनंदा बारक्याबारक्या चोऱ्या करून गुजराण करीत होता. रामा बनगराचे रिकामपण तसेच कायम होते. वासाने लांडगा हेरणारा त्याचा म्हातारा अजून मेंढरांमागे जात होता.

वाडीतले तरणेबांड मेंढके सकाळी उठून मेंढरांमागे जात होते. दिवसभर रानात हिंडून संध्याकाळी घरी येत होते, मेंढरे जुळवत होते आणि रात्री सावध झोप घेत होते. धनगरणी भाकरी भाजीत होत्या, सूत कातीत होत्या आणि मुलांना पाजीत होत्या.

असे सर्व चालले होते आणि एके दिवशी मी सरकारात कळविले त्याचे उत्तर आले. एप्रिलच्या वीस तारखेस हुजुरांची स्वारी वाडीस भेट देईल, असे कळविण्यात आले. आणि मग झपाट्याने चक्रे फिरू लागली. एक दिवसआड एक अधिकारी तालुक्याहून येऊ लागला, आणि पाहणी करून जाऊ लागला. तालुक्याहून वाडीला

येणारा रस्ता चांगला तयार करण्यात आला. फूटवाटेपाशी पांढरे दगड ठेवून वाडीची वाट दाखविण्यात आली. म्युनिसिपालिटीचे लोक आले आणि एके दिवशी वाडीतील सगळी भटकी कुत्री त्यांनी मारून टाकली. उकिरडे हलविण्याचा हुकूम केला. घरागणीक तो अमलात आणला. शाळेच्या इमारतीची डागडुजी होऊन तिला चुना देण्यात आला. केरकचरा, घाण जिथेजिथे होती तिथेतिथे लोटून झाडून स्वच्छता झाली. अधिकारी म्हणाले की, गावात शिरताना महाराज एखाद्या वेळी सुरुवातीला लागणाऱ्या रामोसवाड्यात जातील, एखाद्या घरात शिरून चौकशी करतील. तेव्हा रामोसवाडा साफ करण्याचा आटापिटा सुरू झाला. प्रत्येक घर सारवूनसुरवून लख्ख करण्यात आले. रामोशांनी आपली घरे लख्ख केली, तेव्हा धनगरणींनाही इसाळ आला आणि त्यांनी पण उभेकडी सारवणे घातली. अनेक दिवसांत कधी बाहेरून न लिंपलेली, न सारवलेली घरे सारवली गेली, लिंपली गेली. काही घरे ढासळली होती, त्यांचे दगड रस्त्यांवर आले होते, ते उचलून नीट रचण्यात आले. थोडे धाकाने, काही खुशीनेही, असे हे कधी न होणारे काम होऊ लागले. स्वच्छ अंघोळ करून, केस नीट विंचरून अंगभर कपडे घातलेल्या धनगराच्या पोरीसारखी वाडी दिसू लागली.

आणि तालमीचे कामही जवळजवळ पुरे होत आले. भिंती चढल्या. खांडे चढली, दांडे पडले. गवंड्यांनी आपले काम पुष्कळ संपवले. राहता राहिले सुतारांचे. ते मात्र अजून फळ्या रंधत होते, खुंट्या कातत होते, चौकटी जोडीत होते.

प्रत्यक्ष पंतसरकार आपल्या गावात येणार या जाणिवेने खरोखरीच बनगरवाडीत बदल झाला. राजाच्या येण्याविषयी उदासीन असा एकही माणूस राहिला नाही. वाडीतल्या धनगरांपैकी कुणीही अजून राजा कधी बघितला नव्हता. आणि तो प्रत्यक्ष वाडीत येणार होता. ही घटना अघटित होती. त्यामुळे एक नवे चैतन्य वाडीत आले होते. आजूबाजूच्या खेड्यांना असूया वाटू लागली होती. कधी वाडीकडे ढुंकूनही न बघणारे अधिकारी, पाटील-कुलकर्णी-मामलेदार-फौजदार यांना वाडीला यावे लागत होते. पण जो जो दिवस जाऊ लागले, अधिकाऱ्यांचे जास्ती हेलपाटे होऊ लागले, तो तो आमची धांदल होऊ लागली. सभेसाठी टेबल आणा, खुर्च्या आणा, हारतुरे आणा—शाळेतल्या मुलांना नीट कपडे शिवा, गावातल्या लोकांना हजामती करून यायला सांगा. राजा येण्यापोटी अनेक भानगडी आल्या, आणि त्या धावतपळत आम्ही पुऱ्या करू लागलो.

ही धावाधाव शेवटच्या मिनिटापर्यंत चालली.

दुसरे दिवशी सकाळी साडेआठ वाजता उद्‌घाटन समारंभ होता, आणि अद्याप तालमीवर पेंड टाकला नव्हता. दुपारचे तीन वाजले होते आणि अजून इमारत

वरून उघडी होती. वेळ निश्चित झाली. मी गडबडून गेलो. ऐन वेळी जर ही वरून उघडी इमारत बघितली तर महाराज काय म्हणतील? माझी सगळी अब्रू जाईल, वाडीचे हसे होईल—असे वाटून मी अगदी गडबडून गेलो आणि कारभाऱ्यांना जाऊन म्हणालो,

"गावाची अब्रू जाणार, कारभारी. तालमीवर पेंड अजून पडला नाही आणि स्वारी तर उद्या सकाळी येणार."

कारभारी गडबडीने उठला,

"आं? म्हणतूस काय पोरा? अरं, मग बोलाव—गाव जमीव, चिखूल कर. पेंडाला काय वेळ लागतोय?"

धावाधाव झाली. कामधाम सोडून सारी वाडी एकत्र झाली. चिखल झाला. चिखलापासून तालमीच्या धाब्यापर्यंत शे-पाऊणशे माणूस उभे राहिले आणि पेंड टाकण्याचे काम सुरू झाले. उघडेबंब धनगर चिखलाचे गोळे भराभर एकमेकांच्या हातात फेकू लागले. तालमीवर पेंड पडू लागला. शेजारच्या गावाहून बोलावून आणलेले व्हरल डफडे वाजवू लागले आणि त्या तालावर 'हां—हूं, घे—घे, आला रे आला—' असे ओरडत आरोळ्या ठोकत लोक काम करू लागले. डफड्याने घाई घेतली होती, आणि दीडदोनशे हात काम करीत होते.

संध्याकाळ झाली, अंधार पडला. अगोदरच व्यवस्था असल्यामुळे गॅसच्या बत्त्या पेटल्या आणि त्यात काम चालू झाले. काम करून करून लोक आंबले. थोडी ढिलाई आली की कारभारी ओरडे, आयबू आरोळ्या मारी आणि पुन्हा नेट येई. गोंधळ चालला होता. सारे गाव जागत होते. तोरणे बांधली जात होती. सरकार वेशीत येताच त्यांना एकवीस बैलांच्या रथातून आणायचे होते, त्यासाठी बैल गोळा होत होते. रथ शृंगारला जात होता. बंदोबस्तासाठी पोलीस अधिकारी अगोदरच आले होते, ते उगीच दमदाटी देत होते. स्वारी उद्या येणार आणि अद्याप तुमची तयारी नाही, याबद्दल काळजी व्यक्त करीत होते. आणि पेंड टाकायचे काम बत्त्या लावून चाललेच होते.

मध्यान्हरात्र टळून गेली. काम आवाक्यात येऊ लागले. आणि एकाएकी वर, कडेला उभा राहून चिखलाचे गोळे झेलणारा आयबू खाली कोसळला. दगडाच्या राशीवर कोसळला. कोसळताना 'मेलो-मेलो!' असे भयंकर ओरडला. मी शाळेत उद्याच्या समारंभाचा जुळवाजुळव करीत बसलो होतो. कारभारी मिरवणुकीचा रथ सजविण्याच्या मागे होता. रामा तोरणे लावीत होता. आयबू पडला तेव्हा त्या जागी आमच्यापैकी कोणीच हजर नव्हते. तो पडला आणि तत्काळ बेशुद्ध झाला. पेंड टाकायचे काम थांबले. सर्वजण आपआपली जागा सोडून आयबूभोवती गोळा झाले. "मुलाणी मेला, मुलाणी मेला—" असा ओरडा झाला. अगोदरच गोंधळ, आरडाओरडा इतका चालला होता की, आम्ही जवळपास असूनही या

ओरड्याचा पत्ता कुणाला लागला नाही. आनंदा धावत कारभाऱ्यापाशी गेला आणि म्हणाला,

"आयब्या मुलानी पडला, त्येला झेंडू फुटलाय!"

तालमीपाशी कारभाऱ्याने काम थांबलेले बघितले, तेव्हा तो म्हणाला,

"अरं, तुमी गप का? मुलानी पडलाय, पडू द्या. तुमी कामाला लागा!"

आणि त्याने लोकांना हाकून पेंड टाकायला लावले. आयबूला उचलून माझ्या खोलीत नेऊन टाकले आणि काम सुरू झाले. पहाटेचा कोंबडा ओरडला होता, उजाडायला आले होते. आता फॉं करून मोटार येणार होती. कुणाला मरायला-सुद्धा सवड नव्हती, तिथे रडायला काय असणार? कांदा फोडून आयबूला हुंगायला दिला, माथ्यावर पाणी मारले. आयबू डोळे उघडांना, तेव्हा दार ओढून घेऊन कारभारी बाहेर आला आणि कामाला लागला. हे लग्नकार्यच होते. मेले मढे झाकून ते उरकणे आवश्यक होते!

पेंड टाकून पुरा झाला आणि टळटळीत उजाडले. अंघोळी करण्यासाठी, चिखलाने बरबटलेली अंगे धुण्यासाठी लोक विहिरी-ओढ्यावर गेले.

चारसहा रामोशांना वाटेने पुढे पिटाळले. शिंगवाला उंच झाडावर बसवला. लांब मैल दोन-मैलांवर मोटार दिसताच त्यांनी इशारा करावा असा संकेत ठरला.

आणि बरोबर आठ-सव्वाआठच्या सुमारास खुणेचे शिंग वाजले. "आले आले, सरकार आले" म्हणून धावाधाव झाली. पोरे काखेला मारून धनगरणी वेशीकडे धावू लागल्या. बंदोबस्तासाठी पुढे आलेल्या शिपायांनी त्यांना दटावून परत पाठविले. रथाला बैल जुंपून आम्ही तयार राहिलो. राजा गावात येताच गावच्या पाटलाने हातात एक नारळ आणि रुपया घेऊन त्यांना सामोरे जायचे, असा रिवाज होता. आमच्या वाडीला पाटील नव्हता आणि कुळकर्णी नव्हता. तेव्हा सरकारस्वारी येणार म्हणून आलेला शेजारच्या गावचा पाटील लुडबुडू लागला. मी त्याला गप्प केले आणि तांबडेभडक मुंडासे आणि खळीचा वास येत असलेला कोरा गोल अंगरखा घातलेल्या आमच्या कारभाऱ्याने नारळ द्यावा असे ठरवून टाकले. वेशीशी आरत्या घेऊन काही सुवासिनी उभ्या केल्या. वरचेवर टाचा वर करून टेकावर मोटार दिसते का हे लोक पाहात होते. आवाज स्पष्ट ऐकू येत होता. वाटेवर बसविलेली रामोशांची पोरे धावतपळत आली आणि धापा टाकीत त्यांनी सांगितले,

"आली मोटार, मावल्याआईच्या टेकापाशी आली!"

सर्वांनी टोप्या, पटके नीट केले. अधिकाऱ्यांनी कोटाची बटणे लावून शर्ट खाली ओढले. आणि रस्त्यावर उभ्या असलेल्या शिपायांनी शिट्या फुंकल्या. सरकारची तांबडी पाटी असलेली कोरी चकचकीत गाडी वेशीत येऊन उभी राहिली. मी लगबगीने पुढे झालो. शिक्षणाधिकारी सोबत होते. सरकारांना लवून नमस्कार करताच ते म्हणाले,

"हे इथले मास्तर."

अंगठ्यांनी भरलेले हात जोडून सरकार म्हणाले,

"जय देवा!"

सगळे भराभर वाकले. धनगरांनी जमिनीला हात लावून आपल्या राजाला नमस्कार केला.

मग मामलेदार पुढे झाले आणि आदबशीरपणे म्हणाले,

"इथून गावात रथातून यावं, असं म्हणणं आहे—"

सरकार म्हणाले,

"हो हो—जाऊ ना."

हुजऱ्यानं दार उघडलं. महाराज बाहेर आले. गोरापान, भव्य असा आपला राजा धनगरांनी पाहिला. त्याच्या डोक्यावर तांबडीभडक पगडी होती. अंगात खादीचा पांढराशुभ्र लांब कोट होता. खाली शुभ्र सुरवार होती. पायात तांबडाभडक जोडा होता. झगझगीत काठ असलेली उपरण्याची पट्टी त्याच्या रुंद छातीवर होती. मोठमोठे डोळे, तरतरीत नाक, शुभ्र होत चाललेल्या भरघोस मिशा असलेला राजा काठीचा आधार घेत रथाकडे चालला आणि धनगरांच्या बायका एकमेकींना म्हणाल्या,

"राजा ठकला! त्येला आता काठीवर चालावं लागतंय!"

मी कारभाऱ्याला खूण केली. त्यानें धीराने पुढे होऊन नारळ-रुपया असलेले ताट पुढे केले. राजाने त्याला हात लावला आणि कारभाऱ्याच्या खांद्यावर एक हात ठेवून म्हटले.

"काय पाटील, बरे आहे ना?"

कारभारी आदबशीरपणे हसला आणि मान हलवीत म्हणाला, "होय जी सरकार—होय जी सरकार!"

राजाने मग रथावर चढतानाही कारभाऱ्याच्या खांद्याचा आधार घेतला. रथात बसताच बैल धरून राहिलेल्या लोकांनी इशारा केला. बैल रथ ओढू लागले. शिंगे वाजली. सनई-ताशा वाजला. धनगरांनी राजाच्या नावाचा जयजयकार केला. शाळेतल्या मुलांनी 'राजा चिरायू होवो!' म्हटले. पुढे आलेल्या सुवासिनींनी आरत्या ओवाळल्या. राजा गावात आला. तीसपस्तीस धनगरांची खोपटे असलेल्या या गावात राजा आला!

तालमीचे बंद दार राजाने आपल्या हाताने उघडले. पुन्हा शिंगे वाजली. वाजंत्रीवाल्यांनी गजर केला. ती मोठी तालीम, हौदा, लाल माती बघून राजाला आनंद झाला. तो म्हणाला,

"कुठाय तो मास्तर?"


मी हात जोडून पुढे उभा राहिलो.

“छान, छान, केलंस रे मुला हे तू! काय नाव तुझं?”

मी म्हणालो,

“राजाराम विठ्ठल सौंदणीकर.”

मामलेदारांनी खुलासा केला,



“विठ्ठल धोंडोचा मुलगा. बारनिशी कारकून आहेत आपल्या इथं.”

सरकार म्हणाले,

“अस्सं! चांगलं आहे, उत्तम आहे! ज्ञानाबरोबर बलोपासना पाहिजेच!”

माझा ऊर आनंदानें भरून आला. अंगावर झरकन काटा उठून गेला. घशात आवंढा आला. मला वाटले की आपल्या डोळ्यांना पाणी येणार.

तालमीतल्या मारुतीला महाराजांनी स्वतः नारळ फोडला. आणि मग सभा सुरू झाली. मी माझे भाषण लिहून काढले होते, तें स्पष्ट शब्दात वाचून दाखवले. वाचताना माझी छाती धडधडत होती.

तालमीत खेळण्याच्या निमित्ताने मुले एकत्र यावीत, खेळण्याबरोबरच त्यांना शाळेची गोडी लागावी, या उद्देशानें आम्ही तालीम बांधण्याचा हा खटाटोप केल्याचे मी सांगितले. गावकऱ्यांनी तालमीसाठी जे परिश्रम केले, जो कौतुकास्पद उत्साह, एकी दाखविली, त्याची मी प्रशंसा केली आणि श्रीमंतांनी आशीर्वाद द्यावेत असे म्हणून भाषण संपविले.

मग राजेसाहेबांनी छोटेसे भाषण केले. तें म्हणाले, “माझ्या या मेंढपाळ मुलांनी या एवढ्याशा वस्तीत अशी सुंदर तालीम बांधली, हे बघून माझा ऊर आनंदानें, अभिमानाने भरून आला आहे. बलोपासना आणि ज्ञानसंवर्धन हे माझ्या संस्थानचे ध्येय आहे. संस्थानातील विद्यार्थी म्हटला की, त्याची छाती रुंद असावी, बाहू पिळदार असावेत, बुद्धी तल्लख असावी, असा माझा आग्रह आहे. तो आग्रह मी सतत बोलून दाखवीत असतो. माझे बोलणे इथल्या धनगरांपर्यंत पोचले असेल याची मला कल्पना नव्हती. तें पोचले आहे आणि प्रत्यक्षातही उतरते आहे हे बघून मी चकित झालो आहे. तुमच्या या राजाची छाती दोन इंच जास्त फुगली आहे. जगदंबा तुम्हांला सद्बुद्धी देवो. तुमचे कल्याण करो.”

मग मी आभार मानले. सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले. मुलांनी ‘वंदे मातरम्’ म्हटले आणि समारंभ संपला. महाराजांची मोटार धूळ उडवीत निघून गेली. सायकलींवरून, बैलगाड्यांतून इतर अधिकारी निघून गेले. राजा कसा दिसला, कसा

बोलला, याची चर्चा घरोघर सुरू झाली. राजा निघून गेला, समारंभ संपला, तरी धनगरांचा आनंद संपला नाही. ते जागोजागी टोळकी करून मोठमोठ्याने बोलत राहिले. हा आनंद त्यांना कित्येक दिवस पुरणार होता.

या सगळ्या समारंभात फक्त दोघे जण आले नाहीत. बाळा धनगर आणि दादू बालट्या. बाळाला राजा येणार हे समजले, बघायला चल म्हणून कोणी बोलले, तेव्हा तो म्हणाला,

"माझं काम सोडून मी येत न्हाई. राजा आला असंल. तो काई माझी चूल चालवीत न्हाई!"

बालट्याचा सारखा तडफडाट चालला होता, पण त्याला उठणे अशक्य होते. कारभाऱ्याला घरी बोलावून तो म्हणाला,

"मला राजाला बगायला यायचं हाय रे. पाठुकळी घेऊन तिथपतूर चला कुनी."

पण कारभाऱ्याला भीती वाटली. हा आचरट माणूस काहीतरी बोलेल, मारल्याचे सांगेल. म्हणून त्याला येऊ दिले नाही. बालट्याने सर्वांना शिव्या घातल्या, आरडाओरडा केला. पण त्याच्याकडे कुणी लक्ष दिले नाही.

समारंभ संपला आणि मग मला कुणीसे सांगितले की, आयबू तालमीवरून पडला. जबरदस्त मार लागला. त्याला ओढून खोलीत टाकला. माझ्या आनंदावर एकदम विरजण पडले. घाबऱ्याघुबऱ्या मी घरी आलो. कडी उघडून आत गेलो. पालथा होऊन आयबू घोंगड्यावर पडला होता. माझ्या काळजाचा थरकाप झाला. राजा गावात यावा यासाठीच आयबूने आपला बळी दिला का?

मी मोठ्याने ओरडलो,

"आयबू, आयबू—आहेस का?"

त्याला पालथ्याचा उताणा करून मी त्याच्या तोंडाकडे बघितले. त्याने मिटलेले डोळे उघडून थंड नजरेने पाहिले. सावकाश होणारा त्याचा उष्ण श्वास माझ्या गालांना जाणवत होता. क्षणभर उघडलेले डोळे त्याने पुन्हा मिटून घेतले, आणि तो विव्हळला. मी विचारले,

"आयबू, तुला काय झालं? फार लागलं का? आयबू, अरे तुला काय होतंय?"

आयबूने डोळे उघडले. खोल आवाजात तो म्हणाला,

"मास्तर, राजा आला का?"

"अरे आला. येऊन गेलासुद्धा. तुला काय झालं? कसा पडलास?"

आयबूचा चेहरा विलक्षण दुःखी झाला. तो म्हणाला, "राजा आला—आमाला बघायला न्हाई मिळाला—" आणि उताण्याचा पालथा होऊन तो पुन्हा पडून राहिला.

# १६

राजा येऊन गेला. तालीम चालू झाली. गेले कित्येक महिने चाललेले काम पुरे झाले. तालमीच्या नादाने झाडून सगळी पोरे जमा होऊ लागली. जोरबैठका काढू लागली झोंब्या खेळू लागली. गजीचा ढोल, लेझीमचा सरंजाम, लाठ्या, बोथाट्या, पट्टे—हे सगळे साहित्य तालमीत राहू लागले. जाणती जाणती माणसेसुद्धा गमतीनें तांबड्या मातीत अंगे घोळसू लागली. शाळेनें चांगले बाळसे धरले. सकाळ-दुपार अशी नियमितपणे वीसएक पोरे येऊ लागली.

शाळेवरून पडल्यामुळे आयबूचा एक हात मोडला होता आणि मुका मार लागला होता. हात बसविण्यासाठी आनंदानें त्यांच्यापैकी एका रामोशाला माझ्याकडे पाठवून दिले. त्याचे नाव जगन्या होते. रूपानें चांगला देखणा असलेला हा पोरगा ऐन उमेदीत आला होता. तो रोज घरी येऊन आयबूला चोळू लागला. आनंदानें मला सांगितले की, हाडे बसविण्याचे कसब जगन्या आपल्या बापाकडून शिकला. हा बाप म्हणजे वाडीतला थोर शिकारी होता. पोटावर सरपटत जाऊन तो तोड्याच्या बंदुकीनें हरणे मारी. त्यानें फार हरणे मारली. चार खणाला किल्चा पुराव्यात एवढी हरणांची शिंगे त्याच्यापाशी होती. शेवटी म्हातारा होऊन ती धरणीला पडला, तेव्हा हरणासारखा ओरडू लागला. शेकड्यांनी हरणे मारलेला तात्याबा रामोशी हरणावाणी ओरडून मेला!

या जगन्याच्या चोळण्यामुळे आयबूच्या हाताचे सटकलेले हाड नीट बसले. ठेचलेले अंग सैल झाले आणि महिनापंधरा दिवसात तो हिंडूफिरू लागला. मुलाण्याचे पोर मरता मरता वाचले. पण मध्येच जगन्यानेच एक भानगड उपस्थित केली. आणि ती निस्तरता निस्तरता गाव टेकीला आले.

बनगरवाडीपासून पाचसहा कोस लांब असे वांगी गाव होते. आमच्या साऱ्या तालुक्यात हे गाव अरगट म्हणून प्रसिद्ध होते. खून, मारामाऱ्या यांबद्दल गाजलेले होते. या गावात परका माणूस जीव मुठीत धरूनच राही. शाळामास्तर, कुलकर्णी, तलाठी—सगळे या गावाला बदली झाली की हादरून जायचे. वसुलासाठी गेलेला मामलेदारसुद्धा या गावात नमून बोले. जणू काय आपण भिक्षा मागतो आहोत अशा पद्धतीने शेतसारा मागे. कामधामाच्या निमित्ताने जगन्या नेहमी वांगीला जाई.

एके दिवशी दोनप्रहरी आठदहा जवान लोक वाडीत घुसले. त्यांच्या हातात कुऱ्हाडी होत्या, भाले होते. कोसले पटके आणि मलमली सदरे घातलेले हे जवान वाडीत घुसले आणि थेट रामोसवाड्यात गेले. भरभर त्यांनी सगळी रामोशांची



खोपटे तपासली. बायाबापड्यांना दमदाटी दिली. एकादोघा रामोशांना कुऱ्हाडीच्या तुंब्याने हाणले, रामोसवाड्यात आरडाओरड सुरू झाली. पोरे भिऊन ओरडू लागली. कुत्री भुंकू लागली. रामोशांच्या भ्यालेल्या बायका पोरे उचलून धनगरांच्या आश्रयाला आल्या. मेंढके रानामाळात गेलेले, गडीमाणसे फारशी नाहीत, अशा अवस्थेत हे दांडगेढुंडगे लोक खोपटे तपासू लागताच एकच गलका झाला.

मी शाळेत होतो. आनंदाही होता. रामोसवाड्यात लोक शिरले म्हणताच तो घाईने उठून तिकडे गेला. वर्ग सोडून मीही गेलो.

दरम्यान खोपटे धुंडून ते लोक रस्त्यावर येऊन उभे राहिले होते. आनंदा पुढे झाला आणि त्याने विचारले.

"काय गडबड हाय ?"

त्याने ताबडतोब ओळखले की हे लोक वांगीचे आहेत. आनंदाने असे विचारताच एक पोरगा अंगावर धावून आला आणि म्हणाला,

"तू रामुशीच का !"

आणि आनंदाने होय म्हणताच हातातल्या काठीच्या दोन धोपाट्या त्याने त्याच्या पाठीवर ओढल्या. शिवी हासडून विचारले,

"जगन्या रामुशी कुठाय ?"

दोन काठ्या सोसून आनंदा जागचा न हलता म्हणाला, "का बरं, त्येनं काय केलंय ?"

आणि त्यावर पुन्हा त्या पोराने एक काठी हाणली. मग मला राहावले नाही. पुढे होऊन मी त्या पोराला धरला. विचारले,

"कोण लोक आहात तुम्ही ? एकाएकी गावात शिरून अशी मारामारी करताय—कोण विचारणार नाही असं वाटलं काय तुम्हांला ?"

मी अंगाने फाटकाच होतो. पण विलक्षण धारदार असे बोलणे माझ्या तोंडून आपोआप निघाले. आणि क्षणभर त्या पोराला आपला हात सोडून घ्यायचेही भान राहिले नाही.

मग बुटका आणि थोराड असा एक माणूस पुढे आला. पोराला बाजूला ओढून त्याने माझ्या छातीला छाती भिडवीत म्हटले,

"तू रे कोन—इतक्या जोरावर आलायस ते ?"

"मी सरकारी नोकर आहे. इथल्या शाळेचा मास्तर आहे. तुम्हांला कोण माणूस पाहिजे ते नीट विचारा. मारामारी करायला ही काही मोगलाई नाही !"

दरम्यान, मोडक्या हातात कांठी घेऊन आयबू आला होता. शाळेतली चारसहा नेटक पोरंही तालमीतल्या काठ्या घेऊन आली होती.

माझ्या छातीला छाती लावून उभा राहिलेला गडी इकडेतिकडे बवून थोडा सैल झाला. नाक फुगवून म्हणाला,

"आमाला जगन्या रामुशी पायजे."

मी म्हणालो,

"तो चारदोन दिवस झाले, गावात नाही."

"कशावरनं खरं हे?"

"मी सांगतोय म्हणून."

"बरीच रग हाय की रं शाळामास्तरा तुज्या अंगात!"

एवढ्यात कुणी एक वाडीतली म्हातारी पुढे आली. आणि त्या पटकेवाल्याच्या हनुवटीला हात लावून म्हणाली,

"अरं माज्या लेकरा, गरीब रामोशावर काय कुऱ्हाड चालवतोस? छप्पन कुळींचा म्हराटा तू! रामोशी तुज्या पायांतलं चेंडू—आं? नीट बैस. उन्हाचा आलास, पानी पी. कामधाम असलं तर ह्या मास्तरास पूस."

आणि मग कलकला बोलत रामोशांच्या बायका जमल्या, धनगरणी जमल्या. शिव्याशापांचा गजर त्या वांगीच्या जवानांवर झाला.

मी वांगीच्या लोकांना म्हणालो,

"तुम्ही तालमीत चला. तिथं तुम्हांला काय पाहिजे, तुम्ही कशासाठी आलाय, हे आपण बोलू. उगीच मारामारी करणं ही चांगल्या माणसाला शोभणारी गोष्ट नाही."

त्यांना काय वाटले कोण जाणे, "चला" म्हणून ते चालू लागले. पोरांचा घोळका मागून येऊ लागला, बायका येऊ लागल्या, तेव्हा मला सगळ्यांना दटावावे लागले. दटावल्यावर मात्र कुणी आले नाही. मी, आनंदा, रामा आणि ते सर्वजण असे तालमीत गेलो. बसलो.

मी म्हणालो,

"आता बोला."

त्यांपैकी एकजण म्हणाला,

"आम्ही वांगीची माणसं हाय. तुमच्या गावच्या जगन्या रामुशानं वांगीची, आमच्या जातीतली एक रंडकी बाई काढून नेलीय, त्येला बगायला आम्ही आलोय."

ही माणसे एकाएकी अशी हातघाईवर का आली याची संगती मला लागली. त्यांची चीड अगदी स्वाभाविक होती. जगन्याने असला काही उद्योग केला असेल याची पुसट कल्पनाही आम्हांला नव्हती. रामा आणि आनंदासुद्धा या बातमीने चकित झाले.

जगन्याला शिवी हासडून आनंदा म्हणाला, "घरात अन्न न्हाई खायला आन् ह्या गुलामाला रंडीबाजी सुचतीय. तुमी बिनघोरी त्याचा जीव घ्या पाटील. वाडीतलं एक मानूस तुमाला आडवं येनार न्हाई!"

आनंदाने घेतलेल्या उलट्या पवित्र्याने ते लोक सरळ आले. नीट बोलू लागले. बाई रंडकी असली, तिचे कुणी नसले, तरी हा सगळ्या गावाच्या अब्रूचा प्रश्न होता. रामोशाने आमच्यातली एक बाई काढून नेली हे काळे आमच्या तोंडाला लागले आहे, असे त्यांचे म्हणणे होते. आणि ते रास्त होते. आनंदा म्हणाला, "त्यो हितं असता तर लाथा घालीत तुमापुढं आनला असता. आमच्या हातानं आमी त्याच्या डोस्क्यात धोंडा घातला असता. हां."

लोक म्हणाले, "जातोय कुटं! जितं असंल तितनं आमी हुडकून काढू आन् मारू."

"हां हां, अवं ते कुठं जातंय गरीब! त्याचा दम हाय का तुमच्या म्होरं?"

मला काय बोलावे हे सुचेना. हे आडदांड लोक पिसाळलेल्या कुत्र्याच्या मागे लागावे तसे जगन्याच्या मागे लागले होते. तडाख्यात सापडला तर त्याला ठार मारायला ते कमी करणार नव्हते. शेवटी आनंदा त्यांना म्हणाला,

"सरकार, हीं तुमाला जशी कमीपणाची गोष्ट हाये तशी आमा रामुशांना बी हाये. तवा तुमी माघारी जा. मी खंडुबाची आण घेऊन सांगतो की ती बाई आन् आमचा पोरगा मी आट दिवसांच्या आत उभा करतो तुमाम्होरं. मग झालं का?"

वांगीचे लोक विचार करू लागले.

आनंदा म्हणाला, "का वं मास्तर?"

"ठीक आहे. जगन्यानं जर गुन्हा केला असेल तर त्याला पकडून यांच्यापुढं उभं करायला काही हरकत नाही."

आयबूने गावात हिंडून शिपतरभर भुईमुगाच्या शेंगा आणि बचकभर गूळ गोळा केला, आणि तो आणून वांगीच्या लोकांपुढे ठेवला. जरा वेळाने चरवी भरून चहा आणला आणि शेंगा खाऊन झालेल्या पाव्हण्यांना पितळ्यांतून पाजला. आग्रह करकरून पाजला.

आनंदाचा शब्द मानून, मला जामीन ठेवून, वांगीचे लोक निघून गेले. पोचवायला म्हणून आम्ही गावाबाहेर गेलो.

ते लोक दृष्टीआड झाले आणि आम्ही परत फिरलो तेव्हा मी विचारले,

"जगन्या मिळाला नाही तर रे, आनंदा?"

आनंदा खाकरून थुंकला आणि म्हणाला,

"रामुशाचं बीज सांगनार न्हाई. मसनात जाऊ द्या त्येला मास्तर. मागावर जाऊन आनतो का न्हाई बगा!"

भल्या पहाटे उठून आनंदा रामोशी जगन्याच्या मागावर गेला. त्याच्याबरोबर आणखी दोनतीन जवान पोरे होती. हातांत कुऱ्हाडी-काठ्या घेऊन हे तिघेचौघे हरणाच्या शिकारीसाठी जावे तसे जगन्याच्या पाठीवर गेले. वाडीच्या रामोशांची वळणे कुणीकडे होती हे आनंदाला पक्के ठाऊक होते. जगन्या इथून निघून दोन दिवस झाले आहेत, एवढ्यात अंतर काटून तो मोटारीने स्टेशनपर्यंत गेला असेल आणि मुंबईला जाणारी गाडी त्याने धरली असेल असा संभव नव्हता. कारण आपण नाहीसे झालो की पाठलाग हा होणार आणि प्रथम मोटाररस्ता, स्टेशन तपासले जाणार याची खात्री त्याला असलीच पाहिजे. साहजिकच तो शक्य तो दूर पण कुठेतरी ओळखीच्या ठिकाणी येईल. ओळखीची ठिकाणे गावोगाव होती, पण विशेष असे की दहाबारा कोसांवर असलेल्या निमरज गावी जगन्याची बहीण दिलेली होती. त्या गावच्या रोखाने आनंदा चालला. आणि दुपारी जेवणवेळेला बरोबर पाहुण्याच्या दारात जाऊन हजर झाला.

पाहुणे मंडळी येताच जगन्याच्या वहिणीची धांदल झाली. उसनेपासने पीठ आणून तिने ऊनऊन भाकऱ्या ठोकल्या, कोरड्यास केले आणि त्यांना भरपेट जेवू घातले. ढेकर देऊन ही मंडळी उठली आणि आनंदाने पान खाता खाता पाव्हण्या-पाशी—जगन्याच्या मेव्हण्यापाशी—चौकशी केली,

"जगन्नाथ आला होता का?"

पाव्हणा थोडा कानपला. त्याने उत्तर केले,

"नाहीबा. आला नाही हिकडे!"

आनंदाला अंदाज होताच. पाव्हणा चसकला हे त्याच्या तीक्ष्ण नजरेतून सुटले नाही. त्याला कळून चुकले की जगन्या इथे येऊन गेला आहे. त्याने बाई पळवली आहे हे मेव्हण्यापाशी सांगितले आहे.

आनंदा म्हणाला,

"तुमच्यापाशी खोटं कशापायी बोलू? जगन्यानें गाढवपणा केलाय. वांगीची चांगल्या घरातली बाई पळवून आणलीय. त्या गावचं शंभर मानूस भालेकुऱ्हाडी उगारून वाडीवर आलं. मी हातापाया पडून सांगटलं, ती बाई आन् जगन्या मी तुमच्या हवाली करतो. तुमी गावाला पिडा करू नका. मानसं परत गेली. न्हाईतर वाडीत दोनचार मुडदं पडत होतं."

वारकावा पाव्हण्याला कळला नसावा. पाव्हण्याचा चेहरा थोडा विचारी झाला. आत जगन्याच्या बहिणीची उलघाल झाली. पण जगन्या आला होता याची कबुली न देता पाव्हणा म्हणाला,

"जगन्नातानी गोष्ट चुकीची केली. फार वरच्या पायरीला हात घातला. बाई न्याला हरकत नव्हती, पर निदान आपल्या जातीतली न्याची. असू. पर मी म्हनतो, तुमी त्याला धरून काय करनार? बाईची अब्रू गेल्याली परत येनार न्हाई.

तिला कुनी जातीत घेनार न्हाई. बरं, ते लोक जगन्नाताला काय करतील? मारहान करतील, जिवं मारतील! पर इतकं करून झाली गोष्ट भरून येईल का?"

आनंदा म्हणाला, "न्हाई, हे खरं."

"मग तुमी का रगत आटवता? राहू दे त्या दोगास्नी रंगलाल. मियाबिबी राजी तो क्या करे काजी!"

एका दृष्टीने पाव्हण्याचे म्हणणे बरोबर होते. पण तो ही गोष्ट अजिबात विसरला होता की, जगन्या बाईला घेऊन रंगलाल राहील, पण ती बांगीची माणसे त्याचे खोपट पेटवतील. त्याच्या बरातल्या माणसांना मारहाण करतील. एकासाठी सगळा रामोसवाडा आगीत पडेल. सगळ्या वाडीला त्रास भोगावा लागेल. त्या छोट्याशा गावाचे माणूसबळ ते किती?

ही गोष्ट आनंदाने त्या रामोशाला समजावून सांगितली, पण तो कबूल होईना. मेव्हण्याचा ठावठिकाणा सांगेना. पुष्कळ बोलूनही त्याच्याकडून तलास लागेना, तेव्हा आनंदा उठला आणि म्हणाला,

"बराय, मग आम्ही बगतो काय करायचं ते. रामराम."

पाव्हणाही रामराम करून उठला. पण तेवढ्यात जगन्याची वहीण आतून बाहेर आली आणि रडकुंडीला येऊन म्हणाली,

"आनंदा, जगू आला वता!"

नवरा लाल डोळे करून तिच्याकडे बघू लागला तरी तिने तोंड बंद केले नाही.

"ठेसनावर गेलाय. बाईला घेऊन सांगलीला जान्याचा बेत दिसला. पर त्येच्या जिवाला नकं अपाय होऊ दिऊस तू. माझ्या गळ्याची आन हाय बग!"

आनंदा म्हणाला,

"सुटली. अग, आमाला काय हायेच का न्हाई? आमी कसं त्याला मारू दिऊ? कवा गेला हितनं?"

"गेलाय पहाटंच. अजून गाडीत बसला नसल."

स्टेशनला मिरजेकडे जाणारी गाडी दुपारी तीन वाजता होती. घाईघाईने निरोप घेऊन, वरचेवर धीर देऊन आनंदा तिथून सुटला. खोचे खोवून वहाणा हातात घेऊन त्यांनी स्टेशनाची वाट धरली. रखरख उन्हातून, तापल्या फुफाट्यातून ते टणक रामोशी पळू लागले. हा हा म्हणता त्यांनी तीनचार कोस जमीन मागे टाकली. आणि दूरवर रस्त्याकडेला असलेल्या वडाखाली एक बाई आणि एक गडी त्यांच्या नजरेला पडला.

जगन्या टणक होता. मोटारीसारखा पळणारा होता. पण त्याच्याबरोबर असलेली गोरीपान बाई अंगाने सुटलेली होती. आधी बाईमाणूस आणि त्यात अंग जड. कितीही भीती मागे असली तरी झपाट्याने वाट कातरणे त्या दोघांना जमले नाही. जागोजाग उसवस करत, सावलीला विसावा घेत ती दोघेही अजून वाट आवरीत होती.

आनंदा थबकून उभा राहिला. कपाळाला हात लावून त्याने नीट हेरले आणि बरोबरच्या पोरांना म्हटले,

"जगन्या त्यो. लाल पटका त्येचाच. पर आता कसं र? त्यो पळणार."

पोरे म्हणाली,

"पळू द्या. सशावाणी तानून पाडतो त्याला."

"पाडता?"

"हो. आन् त्यो पळाला तर बाय हाय की!"

"तिला घेऊन काय कापायची? जगन्या पाहिजे."

"त्यो तरी कुठं जातोय! चल उगीच खाली बगून."

मग पोरे चोहीकडे पांगली. चारी दिशांनी त्यांनी त्या जोडप्याला मध्ये घेतले. आणि सावधपणाने रान दाबत ती जगन्याच्या दिशेने येऊ लागली.

जगन्या वरचेवर सूर्याकडे बघत होता,

"हं आवर, गाडी चुकंल."

चालून भेंडाळलेली ती बाई आपली कोरडी जीभ तडकल्या ओठावर फिरवून म्हणत होती,

"थांब थोडका. न्हाई तर मी मरंन."

असे चालले तोच बावरून एकाएकी जगन्या उठून उभा राहिला. त्याने आजूबाजूला बघितले. पाठीमागे कासराभर अंतरावर आलेला आनंदा त्याने बघितला आणि बाईच्या हाताला धरून तिला ओढीत तो म्हणाला,

"अग पळ, मानसं आली आपल्याला धरायला!"

जिवाच्या कराराने ती दोघेही एकमेकांच्या हातात हात घालून धावली. आनंदा मागून ओरडला,

"जगन्या थांब, पळू नकंस!"

पण जगन्या बेभान झाला होता, बाई बेभान झाली होती. नीट रस्ता सोडून काळ्या वावरातून ती दोघे मागे न बघता धावू लागली. बाईचा पदर वाऱ्यावर फडफडत राहिला. जगन्याचा शेमला वाऱ्यावर फडफडत राहिला. दगडधोंडे, नाली यांना न जुमानता ती दोघे रपाट पळत राहिली आणि आनंदा त्यांच्या मागे लागला.

पळता पळता दमछाट होऊन ती बाई कोसळली. काळ्या वावरात पडली. मागे वळून जगन्या तिला उठवू लागला आणि पोरे जवळ येऊन भिडल्याचे त्याने बघितले. मग कोसळलेल्या मादीला सोडून काळवीट जसा जीव घेऊन पळतो तसा जगन्या बाईला तशीच सोडून धावू लागला.

बाईपाशी येताच पोरे थबकली, पण आनंदा मात्र जगन्याच्या पाठोपाठ पळू लागला. बराच वेळ त्यांची ही शर्यत चालू राहिली. पण जवान जगन्या आनं[illegible]

आवरेना. शेवटी अंतर आटोक्यात आलेले बघून आनंदाने हातातली कुऱ्हाड फेकून मारली. पळते हरण व्हलपाडून पाडावे तसा जगन्याला कुऱ्हाडीच्या व्हलपाड्याने पाडला. पळून पळून दमछाट झालेला जगन्या गुरासारखा ओरडून खाली पडला.

आनंदाने गाडीत घालून त्या दोघांना वांगीला नेले. पायातून रक्त जाऊन जाऊन जगन्या पांढराफटक पडला होता. ती बाई आपल्या मरणानेच मेली होती. आनंदा म्हणाला,

"ही तुमची बाई आन् हा आमचा पोरगा. मी माज्या हातानं त्याला मारलाय. शिलक्की असलेला जीव तुमाला घ्याचा असेल तर घ्या!"

जगन्या भानावरसुद्धा नव्हता. त्याचे धोतर, अंगरखा रक्ताने भिजून गेली होती. लोकांनी बाईला दांडक्याने मारीत घरात नेले आणि आनंदाला म्हटले, "ने, जा तुझ्या गावी नेऊन जाळा त्याला!"

जगन्याला घेऊन आनंदा वाडीला आला. झाडपाला वापरून या अडाण्यांनी जगन्याच्या पायाची जखम बरी केली. वांगीच्या लोकांनी त्या बाईचे सुरेख नाक कापून टाकले, आणि तिला गावातून हाकलून दिले. नाकाला पट्टी बांधून ती जगन्याच्या घरात आली आणि रडरड रडली. तिला कुणी रामोसवाड्यात ठेवून घेईना. मग एके दिवशी उठून ती निघून गेली. त्यावर पुन्हा कुठे दिसली नाही

## १७

जून आला. मृग निघाला. हे नक्षत्र केव्हाच नीट न पडणारे ते याही वर्षी वाडीच्या भागात पडले नाही. दर वर्षी निदान भीजपाऊस पडतो, पण तोही पडला नाही. नक्षत्र कोरडेच गेले. लोक आडद्राची वाट पाहू लागले.

आता सर्वत्र उजाड दिसत होते. रानातून फिरून मेंढरे उपाशीपोटी माघारी येत होती. सुगीच्या वेळेला साठवून ठेवलेला वाळला पाला, भुस्कट, असले काहीबाही पुढे टाकून मेंढके मेंढरांची पोटे भरत होते. पाऊस पडून हिरवळ केव्हा होते याची वाट बघत होते.

याच सुमारास कारभाऱ्याला उजाडता उजाडता एक वाईट स्वप्न पडले. कमरेला कडूलिंबाचे डहाळे बांधलेली, केस सोडलेली, मळवट भरलेली एक बाई आली. म्हणाली,

"मी तुला नेण्यासाठी आले आहे. तयारी कर."

म्हाताऱ्याने भिऊन विचारले,

"कुनीकडं?"

बाई म्हणाली,

"देवाच्या घरी. तयारी कर. उद्या जायचं."

आणि कारभारी दचकून उठला. घामाघूम होऊन अंधारातच अंथरुणावर बराच वेळ बसून राहिला.

भल्या सकाळी, मी अजून जागा होतो आहे-नाही तोवर माझ्याकडे आला. अंथरुणाच्या कोपऱ्यावर बसून माझ्या पायाला हात लावून त्याने नमस्कार केला. मला काही कळेना.

कारभारी म्हणाला,

"शेवटचा रामराम, मी चाललो!"

मी आल्यापासून या म्हाताऱ्याने गाव सोडल्याचे मला माहीत नव्हते.

"कुणीकडं चालला? येणार कधी?"

म्हातारा म्हणाला,

"चाललो आता—माघारी येणं न्हाई!"

"म्हणजे?"

"उद्या सकाळपातूर मी मरणार!"

ही काही थट्टा नव्हती. म्हातारा खरोखरच गंभीरपणे बोलत होता. मी हसून चेष्टा केली तेव्हा त्याने पडलेले स्वप्न सांगितले.

मी म्हणालो, "वेडे की काय तुम्ही कारभारी! स्वप्नं कधी खरी होतात का?"

कारभारी म्हणाला, "होतात लेकरा. माजी झाल्यात."

"छे, उगाच काहीतरी डोक्यात घेतलंय तुम्ही पोराठोरासारखं. कळत्या माणसानं असं केल्यावर कसं व्हायचं?"

म्हातारा वरचेवर निरवानिरवीच्या गोष्टी करत होता; पण मी त्याचं काहीच मनावर घेतले नाही. शेवटी "मी माजं सगळं अंजीला देनार हाय. तिला शेकूबाच्या हवाली करतो. तो तिला सांभाळील. तिचं लगीन करील. तुमचं ध्यान असू द्या..." असे सांगून तो उठला आणि बाहेर पडला.

दिवसभर हिंडून कारभाऱ्याने ही गोष्ट सर्वांना सांगितली. सर्वांचा निरोप मागितला. या खुळेपणावर कोण विश्वास ठेवणार? पुष्कळांनी चेष्टा केली. म्हाताऱ्याचे बोलणे कुणीच मनावर घेतले नाही. असला भोळसट शेकू, पण तोसुद्धा म्हणाला,

"नाना, मरायला काय धाड झालिया तुला? अजून पाच वर्सं डग न्हाइ तुला—जा घरी."

कुणी काहीही म्हटले, टवाळी केली, चेष्टा केली, तरी जी जी लोभाची माणसे होती त्या सर्वांना भेटत कारभारी त्या दिवशी सर्व दिवस हिंडत होता. शेवटी संध्याकाळ झाली, मेंढरे रानातून परत आली आणि कुणी तरी मला सांगत आले.



"चला, कारभाऱ्याला ढाळवांत्या होऊ लागल्यात."

धावतपळत मी गेलो. म्हाताऱ्याची पार दशा दशा झाली होती. डोळे ओढले होते. तोंड वाळले होते. त्याला बोलणेसुद्धा सुधरत नव्हते. मी जाताच तोंडातल्या तोंडात तो म्हणाला,

"खोटं-न्हाई बाबा, मला बोलावणं आलंय."

मी दटावून म्हणालो,

"हॅ:! काही नाही बोलावणं आलं. उद्या सकाळपर्यंत खडखडीत बरे व्हाल."

घरगुती इलाज सुरू झाले. हे दे, ते पाज, ते चाटव—पण मध्यान्हरात्र झाली तरी काही उपयोग नाही. मग सर्वांचा धीर सुटला. अंजी, शेकू रडू लागली. म्हाताऱ्याच्या नातलगांच्या डोळ्यात पाणी आले. ते पाहून, ते रडणे ऐकून कारभारी म्हणाला,

"अरे रडता कशापायी? माजं काय ऱ्हायलंय? एवढा मोठा पंतसरकार, त्यानं मुदीक मला 'काय पाटील' म्हनलं. माज्या पाटीवर हात ठेवला. माजं काय ऱ्हायलं न्हाई आता."

सूर्योदयाला म्हातारा कारभारी मरून गेला!

एक म्हातारा माणूस गेला आणि वाडी सुनी दिसू लागली. माझ्यामागे आता कोणी राहिले नाही असे उगीच मला वाटू लागले. ती शाळा, ती तालीम—यांविषयी उदासीनता वाटू लागली. घरी गेलो म्हणजे आठआठ दिवस मी शाळेला येईनासा झालो.

## १८

एकदा, कधी नव्हे ती शेकूची मुंडाहात उंच बायको माझ्याकडे आली. दुपारची वेळ होती. जेवण करून मी वाचीत बसलो होतो. शेकूची बायको आली आणि दारापाशी अंग चोरून उभी राहिली. मी सावरून बसलो. ती म्हणाली,

"काय चालल्या मास्तर?"

मी म्हणालो,

"काही नाही. जेवण झालं आत्ताच. वाचीत बसलो होतो. बसा की."

माझ्या या बोलण्याने तिचा संकोच थोडाफार कमी झाला असावा. पदरात आणलेल्या शेरभर भुईमुगाच्या शेंगा तिने खाली ओतल्या आणि म्हटले,

"शेंगा खावा. दुसरं काय हाय देन्यासारं आमापाशी?"

"पण मास्तराला काहीतरी दिलंच पाहिजे, असं कुठं आहे! बसा की." तरीही शेकूची बायको बसली नाही. तिला काही बोलायचे आहे, हे मी ओळखले. म्हाताऱ्या कारभाऱ्याने मरताना अंजीला शेकूच्या हवाली केले होते. "हिचे सरळे लावून दे" असे सांगितले होते. म्हातारा मेल्यापासून अंजी शेकूच्या घरी राहात होती. त्याच्या घरी राहून अंजीने त्याला घेरात घेतले होते. वयाने पस्तिशी ओलांडलेला शेकू अंजीच्या नादी लागला होता. ही कुणकूण माझ्या कानी आली होती. पण माझा त्यावर विश्वास बसत नव्हता. ही कुणीतरी उगीच वावडी सोडली असावी, असे वाटत होते. हेच काही सांगण्यासाठी ही बाई आली नसेल ना, असा एक विचार माझ्या मनी येऊन गेला. पण असल्या गोष्टी कोण दुसऱ्यापाशी बोलेल?



शेकूची बायको बसतही नव्हती आणि काही बोलतही नव्हती. त्यामुळे मला मोठे अवघडल्यासारखे झाले. आपण होऊन काही विचारावे, तर तेही सुचत नव्हते. शेवटी उगीचच म्हटले,

"काय म्हणते शेतीवाडी?"

मग मात्र शेकूची बायको उंबऱ्यालगत दोन पायांवर बसली आणि हाताचा मुटका गालावर टेकून म्हणाली,

"आमच्या मालकांस्नी का करावं वं मास्तर?"

मी म्हणालो,

"का, काय झालं?"

वास्तविक मला सगळे कळले होते; पण तसे कसे म्हणू? निदान ही गोष्ट चारचौघात झाली नाही, एवढे तरी समाधान तिला लाभले असते.

यावर भुईकडे नजर लावून ती म्हणाली,

"मान सांगावा लोकाला, अपमान ठिवावा आपल्याशी. पर ह्येनी अगदी ताळच सोडला बघा. हे असलं वागणं काय खरं का ह्येचं?"

मी म्हणालो,

"काय कुरबूर झाली का?"

"कुरबूर होईल न्हाई तर काय? लगीन करायचं म्हनत्यात दुसरं!"

मी खोटेच आश्चर्य दाखवीत म्हणालो,

"कोण, शेकू? हे काय सुचलं एकदम त्याला?"

"एकदम कसं? कारभारी मेला. चांगला हुता बिचारा. पर मरता मरता माज्या संसारात इस्तू टाकून गेला."

शेकूच्या बायकोचा गळा दाटून आला. डोळे पाण्याने भरले. ते पदराने पुसून तिने आवंढा गिळला आणि मग खाजगी आवाज काढून ती बोलू लागली,

"सारकं त्या पोरीच्या मागं असत्यात. तीबी तरन्या पोराला दाखवाव्यात तशा हुलकावण्या देतीय. मी कसं हे बघून गप्प बशीन? तिला एक अक्कल न्हाई! —नसायला काय झालं? न्हातीधुती हाय आता!—पर अब्रू न्हाई म्हना. पर ह्येनी का तिच्या नादी लागावं? जनाची न्हाई, मनाची तरी लाज पायजे. तुमासारखी काय म्हनतील? पोरगी त्या म्हाताऱ्यानं संबाळायला दिली. चांगला पोरगा बघून तिचं लगीन करायचं, भलेपणा घ्याचा. ते सोडलं आन् चांगलं नादावून बसल्यात तिला. कामधाम काय न्हाई. लुगडी आना, चोळीं आना. तुमीच सांगा, आता हे बरं का?"

मग मी खोटेच आश्चर्य दाखवले. लटका राग आणला.

"हे तुम्हीच सांगताय म्हणून खरं म्हणायचं. एरवी शेकू हा माणूस वाळल्या पाचोळ्यावर पाय न देणारा. त्याच्या हातून अशी गोष्ट होणार नाहीं. पण आता तुम्हीच म्हणताय तेव्हा ते खरं असलं पाहिजे!"

"खोटं कशाला वं सांगीन मी. ह्यात अब्रू एकली त्येंचीच जातीय का? माजी न्हाई का जात! गळ्यापतूर येस्तोवर अशी गोष्ट कुनी कुनापाशी बोलंल का?"

"छे, हा गाढवपणा झाला शेकूचा. इतके दिवस मिळवलेला चांगुलपणा घालवायचा आणला त्यानं!"

माझ्या या बोलण्याने शेकूची बदनामी होत आहे असे वाटून त्या बाईने घाईने खुलासा केला,

"तसं काय त्या पोरीचं वाटुळं करायचं न्हाई त्येना. लगीन करायचं म्हनत्यात."

"पण ही काय रीत झाली का लग्न करायची? आणि आजच लग्नाची गरज का लागली?"

"पोर न्हाई माज्या पोटाला. पोरासाटनं करत्यात!"

यावर मी निरुत्तर झालो. ते माझ्या चेहऱ्यावर दिसले, आणि मी बोलावे ते शेकूची ती शहाणी बायकोच बोलली,

"पोर न्हाई ते खरं हाय. पर कुटं आता इस्टेट वाया चाललीय? आन् आपली पुण्याई असली तर देव दील की. का वं!"

मी म्हणालो,

"पण मग एखादी मुलगी बघून नीट लग्न करावं—"

"कशाला? दोघांची पोटं भरायची मारामार! बघताय नव्हं तुमी कसं चाल्लंय ते? आन् ती कोन ईल तिची तरी कूस पिकंल कशावरनं वं? देवाच्या मनातच असलं तर वठक्या झाडाला सुदीक फळ धरंल!"

मी आपला ऐकत होतो. मधूनमधून बोलत होतो. कपाळावर मोठे ठळक कुंकू लावलेली, राठ अशी बाई बोलत होती. नवऱ्याच्या बरोबरीने शेतकाम करणारी, ढोराबरोबर औत ओढणारी ही बाई नवऱ्याच्या या वागणुकीने किती पेचात पडली होती. त्या अंजीला झिंज्या धरून बाहेर काढणे हिला अशक्य होते का? पण हे काहीही न करता ही बाई एका मास्तरापुढे बसून दीनवाणे बोलत होती. तिचे डोळे पाण्याने भरत होते. नाकपुड्या थरथरत होत्या. ओठ थरथरत होते. माझ्या मनात जे आले ते तिच्याही आले असणे अगदी शक्य होते. अंजीचा दोष नाही, ती वयात आली आहे. सारासार विचार तिच्यापाशी असणार नाही. नाही म्हटले तरी शेकू तिच्याकडे ओढला जाणे स्वाभाविक होते. हे सगळेच इतके नाजूक होते की, मनगटाचा जोर इथे फुका होता. आणि हे या बाईने ओळखले असले पाहिजे. त्याशिवाय ती अशी तिऱ्हाइतापुढे येऊन बोलत बसली नसती.

मी पुन्हापुन्हा म्हणत होतो,

"शेकूचं हे वागणं खरं नाही. त्याला कळलं पाहिजे."

शेवटी शेकूची बायको म्हणाली,

"मास्तर, तुमाकडं आले ते तुमी गावाचं जानतं मानूस म्हणून. पंतसरकारापतूर तुमचा मान हाय. तुमी मालकांस्नी जरा दटावा. पडला तर तुमच्याच सांगण्याचा मान पडंल!"

"पण बाई, ही खाजगी बाब. मी बोललो आणि 'तू रे कोण मला पुसणारा?' असं त्यानं विचारलं, तर माझं काय राहील?"

यावर हातवारे करून शेकूची बायको म्हणाली,

"ऊं. ते काय इचारत्यात तसं? हातात बेड्या पडतील की फट्‌शिरी. तेवढं कळतंय बरं का नीट—"

असे बोलणे चालले आहे तोच शाळेची घंटा खणाणली. आयबू, सता ही पोरे आली आणि शेकूची बायको उठली. म्हणाली,

"बराय. जाते."

आणि निघून गेली. शेंगांचा ढीग अद्याप तसाच होता. त्याकडे बघून आयबूने विचारले,

"नानीनं आणल्या काय शेंगा, मास्तर?"

"हो, का रे?"

"न्हाई, कधी न्हाई आन् आजच का, म्हणलं?"

आयबू एवढेच बोलला, पण मला त्याला काय म्हणायचे होते समजले. त्याने शेंगा भरून ठेवल्या. दार ओढून घेतले. आणि मी शाळेकडे निघालो, तेव्हा असेही वाटले की, आयबूला याची काही माहितीही नसेल. तो आपला सहज बोलला असेल आणि माझ्या मनाने त्याचे अर्थ लावले असतील.

यानंतर रस्त्याने जातायेता शेकू मला दोनचार वेळा भेटला, पण नित्याप्रमाणे तो माझ्याकडे बघून हसला नाही. "काय गडबड, मास्तर" असे त्याने विचारलेही नाही. लांबून मला बघितले की, खाली मान घालून तो तरातरा माझ्या अंगावरून जाई. त्याच्या तुटक वागण्यामुळे निश्चय करूनही अंजीसंबंधी त्याला काही विचारण्याचा धीर मला झाला नाही. अंजी-शेकूच्या संबंधाविषयी गावातली कुणकूण अधिक वाढली होती. रोज ती दोघे मिळून शेरडांमागे जातात. वाटेने जातानासुद्धा अंजी शेकूच्या अंगचटी येते, असे लोक बोलत. आज त्या दोघांना दूरवरच्या ओढ्याकाठी असलेल्या निरगुडीच्या ताटव्यात बघितले, उद्या मावल्या आईच्या देवळात जाऊन त्या दोघांनी शपथा घेतल्या, अंजीने देवीच्या काचोळीची शपथ घेऊन शेकूला दगा न देण्याबद्दल शपथ घेतली, परवा शेकूने शेरडे विकून अंजीसाठी तोडे करायला टाकले,—अशा अनेक गोष्टी कळत. शेकूचे हे प्रेमप्रकरण म्हणजे तरण्या पोरांच्या चेष्टेचा विषय झाला होता. जाणत्या माणसांच्या तिरस्काराची गोष्ट झाली होती.

मग एके दिवशी शेकूचे आणि त्याच्या बायकोचे कडाक्याचे भांडण झाले. काय झाले हे कळले नाही, कारण ती दोघे मध्यानरात्रीची आपल्या घरातच भांडली. आणि सकाळी बायको गावातल्या गावातच वेगळी राहू लागली. धुळा धनगराच्या घराशेजारचा गोठा मोकळा होता, त्यात चूल करून ती राहू लागली. शेतीवाडीकडे काही ध्यान न देता, रोजगार करून, मोलमजुरी करून पोट भरू लागली. तिने शेकूचे नावच सोडले.

अंजी आणि शेकू एकत्र राहू लागली. लगीन करायचे म्हणून शेकू जुळवाजुळव करू लागला. शेरडे-करडे मोडून त्याने रोख पैसा जमा केला. धान्यधुन्य जमा केले.

शेकूचे रान गावापासून थोडे लांबच होते. याच्या रानापलिकडे असलेला मळा वाडी ज्या गावाखाली होती त्या येडशी गावचा होता. या मळ्यात खतासाठी मेंढरे बसू लागली. मळ्याच्या मालकाने कुणी परगावचे मेंढके बोलावले होते. रात्रभर ते दोघेतिघे जवान धनगर ओव्या गात, शेकटा घेत त्या रानात बसत. त्यांनी तालात गायलेल्या ओव्यांचे सूर आपल्या रानातून अंजी ऐके.

एकदा रखरखीत दुपारचा त्यांच्यापैकी एक मेंढका समाईक बांधावरच्या बाभळीवर चढला आणि बाभळ सवाळू लागला. त्याची मेंढरे खाली जमा झाली आणि काटे चुकवून बाभळीची पाने लबूलबू खाऊ लागली. हिरवटपांढऱ्या बाभळीच्या शेंगा वेचू लागली.

तेव्हा सपास्याने अंजी पुढे झाली आणि खाली उभी राहून बाभळीवर चढलेल्या त्या गड्याकडे बघून म्हणाली,

"ए, कोन बाभळ सवळतया ते?"

वर बसलेला मेंढका खाली बघून म्हणाला,

"का ग, तुजी हरकत हाय काय?"

एकदम त्याने 'का ग?' म्हणताच अंजी शहारली. तोच टपाटपा बाभळीची पिवळी फुले तिच्या अंगावर पडली आणि मागोमाग मेंढक्याने खाली उडी घेतली. रंगाने काळाभोर असा तो जवान, नाकेला मेंढका अंजीच्या पुढ्यात तोऱ्याने उभा राहिला. त्याच्या डोळ्यांकडे बघण्याचा धीर काही अंजीला झाला नाही. तिची छाती धडधडू लागली. आजूबाजूला कोणी नव्हते. बाभळीच्या सावलीत मेंढरे डहाळा खात होती आणि गालातल्या गालात हसत तो धटिंगण आपला अंजीपुढे उभा होता. मग तो म्हणाला,

"पान्हण्या माणसाला असं जरबेनं बोलू ने. हे रान तुझं काय?"

खाली बघतच अंजी ठसक्याने म्हणाली,

"माजं रान असल्याबगार बोलतीय का?"

मेंढका म्हणाला,

"भरात आलेली बाभळ बघून सवलावी वाटली." आणि त्याने धिटाईने चक्क अंजीचा हात धरला. अंजी ओरडली नाही, किंचाळली नाही. तिने जराशी धडपड केली, पण मेंढक्याच्या घट्ट पकडीतून तिचा हात सुटला नाही.

मग त्याच्या डोळ्यांकडे बघत काकुळती येऊन अंजी म्हणाली,

"बांगडी वाढली माजी. सोड की हात."

"नाही सोडत. काय करशील?"

"अं, बराच की दांडगावा हाय तुजा! सोड हात."

तरीही मेंढका आपला हासतच राहिला.

चारपाच दिवस मेंढरे रानात बसवून आणि त्याबदली मिळालेले जोंधळे घेऊन तो मेंढका मेंढरे हाकीत आपल्या गावी गेला, तेव्हा अंजीलाही त्याने बरोबर नेले. तीही गेली. शेकूला तिने सांगितले नाही, सवरले नाही. काचोळीची शपथ मोडून अंजीने शेकू सोडून दुसरा दादला बघितला.

त्यानंतर आठपंधरा दिवसांनी वटाभर गाजरे घेऊन शेकूची बायको माझ्याकडे आली. तिचा चेहरा फुललेला होता. गाजरे भुईवर ओतीत ती म्हणाली,

"मास्तर, आलं आमचं खुळं माघारी!"

# ११

मग मावल्या आईची जत्रा आली. दरसाल ही जत्रा बनगरवाडीला होत असे. गावापासून एक मैलावर छोटेसे टेकाड होते. त्यावर रानात घालतात तशी एक साधीसुधी खोप घातलेली होती आणि त्या खोपेत मावल्या आई बसून राहिली होती. आजूबाजूला सगळा खडक आहे. फूट-दोन-फूट उंचीची तरवडाची झुडपे, एखादे नेपतीचे वाळकुंजे झाड, याशिवाय काही नाही. धनगरांच्या नवसाला पावणारी ही देवी होती. इतके दिवस ती खोपीत राहिली. लहानसे देऊळ का गावकऱ्यांनी बांधले नाही? तसा प्रयत्न झाला होता; पण देवी पुजाऱ्याच्या स्वप्नात आली आणि म्हणाली, "देऊळ बांधू नका. मी आहे तीच आनंदात आहे."

चांगलेचुंगले कपडे घालून सगळी वाडी त्या निर्जन जागी गोळा झाली. आजूबाजूच्या गावचीही काही भाविक मंडळी आली. एकूण शे-दीडशे माणूस जमले. पुजाऱ्याने पूजा केली. लोकांना गुलाल लावला.

गावाबरोबर टक्करा देत राहिलेला बाळा बनगरही जत्रेला आला. बायकापोरे घेऊन चालत आला. त्याला बघताच वाडीतल्या लोकांमध्ये कुजबूज सुरू झाली. त्याला अडवा, त्याला देवीपाशी जाऊ देऊ नका, असा गोंधळ झाला. पण कुणाला न जुमानता बाळा देवीपाशी आला, पाया पडला आणि प्रसादाचा गुलाल लावण्यासाठी त्याने आपले कपाळ पुजाऱ्यापुढे केले. तेव्हा पुजारी म्हणाला,



"तू पांढरीला जुमानत नाहीस. मी तुला गुलाल लावणार नाही."

एवढा बलदंड माणूस बाळा, पण पुजाऱ्याने गुलाल लावत नाही म्हणताच तो थंड उभा राहिला. लोकांकडे तोंड फिरवून उभा राहिला. गेले अनेक महिने त्याने फार ताप सोसला होता. गावातले कोणी त्याच्याशी बोलत नव्हते. एखाद्या महारोग्याप्रमाणे बाळा बनगरला त्यांनी दूर ठेवले होते. आज त्याचा कळस झाला. देवीचा प्रसादसुद्धा त्याला मिळाला नाही. लोकांच्या अडवणुकीला बधला नाही तो बाळा या उपेक्षेने खचला. धोतराच्या निऱ्या फराफरा फेडून त्याने गावापुढे अंथरल्या आणि मोठ्याने ओरडून तो म्हणाला,

"माज्या पांडरीपुढं मी पदर पसरतो, माजी चुकी माफ करा. मला तुमच्यात घ्या. मला गुलाल लावा. तुमी माझं झाड घ्या, घर घ्या, माजा जीव सुदीक घ्या; पर मला असं लांब ढकलू नका!"

आणि त्याचा कणखर स्वर कापरा झाला. त्याच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागल्या. क्षणभर एवढा मोठा जमाव अगदी गप राहिला.

आणि मग तो रामाचा म्हातारा काकूबा गावाला म्हणाला, "अरे, पोर मांडीवर मुतलं, मांडी कापायची का? लावा त्याला गुलाल!"

लोकांची कुजबूज झाली. सगळेजण "लावा" म्हणाले, मग पुजारी उठून गावापुढे पदर पसरून उभ्या राहिलेल्या बाळाच्या कपाळाला गुलाल चोळून म्हणाला,

"मावल्याईचं चांगभलं!"

मग लोकांनी 'चांगभलं' गाजवलं, गुलाल उधळला, मुठी-मुठींनी उधळला. रताळी, गाजरे उधळली. तो प्रसाद शोधण्यासाठी झुंडीच्या झुंडी खाली वाकल्या. रेटारेटी, आरडाओरड झाली.

व्हरलाने डफडे वाजवले, पिपाण्या फुंकल्या आणि दर वर्षीप्रमाणे धुळा बनगराच्या अंगात आले. हा-हू करून तो घुमू लागला. शरीराला आळोखेपिळोखे देऊ लागला. व्हरलांनी डफड्याची घाई घेतली, तो तो धुळा जास्ती जास्ती नाचू लागला. त्याने अंगावरचे घोंगडे टाकून दिले. डोईचा पटका टाकून दिला. उघडाबंब असा धुळा धनगर उभा राहिला आणि घुमू लागला. पुजाऱ्याने त्याच्या कपाळाला गुलाल फासला. काळ्याभोर कपाळावर तांबडाभडक गुलाल फासला. तो ओघळत नाकावर उतरला आणि तसा तो धुळा धनगर नाचू लागला.

"आई आली, आई आली!" असे म्हणून धनगर त्याच्याभोवती गोळा झाले.

मग शेकूने विचारले,

"आई, अवंदा पाऊसपानी न्हाई. काय चुकी झाली?"

आई घुमत म्हणाली,

"पाप फार झालं, ल्वाडपना बोकाळला रे! त्येनं पाऊस गेला!"

"पर आई, पाऊस गेला, तर मेंढरांनी खावं काय? आमी जगावं कसं?"

डोळे मिटल्याच आई बोलली,

"माजी जत्रा नीट करा—मला निवदनारळ नीट करा...सगळं चांगलं हुईल."

"पाऊस पडंल?"

"हां, पडंल."

"पर आई, कवा? मिरग निघाला, सगळ्या जगात पानी पडलं, अन् वाडीवर काळा ढगसुद्धा उटला न्हाई!"

"अरं, तुमाला धडा मिळावा म्हणून असं झालं. पर आता पाऊस पडंल. म्होरची नकित्रं पडत्याल."

शेकूनं थोबाडीत मारून घेतल्या.

"आई, चुकीची माफी कर! तुझी जत्रा नीट करू—निवदनारळ करू. सगळं पतकरून घेतो आमी."

असे म्हणून धुळ्याच्या पायांवर त्याने डोके टेकले.

आणि मग अंगातले जाऊन धुळा गप पडला.

मग लोकांनी जत्रा केली. दरसालप्रमाणे देवीपुढे बकरे मारले: आयबूने सुरी फिरवली, शेकूने देवीला रक्त वाहिले, पुढे प्रसाद ठेवला. आणि मग चिराचीर चालू झाली. आवतीभोवती लोक जमले. पोरेठोरे गर्दी करून बघू लागली. तेव्हा आयबूने सर्वांना दटावून सांगितले,

"जावा आता घरी. भाकरी घेऊन जेवायला या."

आपल्या घरच्या भाकरी घेऊन जेवायला इथे या. हो, कालवण इथे मिळेल. धनगरवाडी मेंढरे देईल—जोंधळे कुठले आणावे?

हळूहळू लोक निघून गेले. काही शेलकी मंडळी राहिली. त्यांनी चर खांदून जाळ केला. त्यावर हंडा ठेवला. दोनतीन बकऱ्यांचे मास हंड्यांतून शिजू लागले. त्याचा घमघमाट सुटला.

चांदणे पडले. मशाली पेटल्या. पितळ्या-तांब्ये आणि भाकरी घेऊन धनगर आले. पंक्ती बसल्या. टेकण लावून ठेवलेल्या पितळ्यांतून ऊनऊन आणि तिखटतिखटजाळ कालवण वाढले गेले. "चांगभलं" असा जयघोष झाला. लोक कालवण-भाकरीवर तुटून पडले, फुर्रफुर्र भुरके मारू लागले. त्या तिखट कालवणाने त्यांची तोंडे भाजली आणि नाकांना पाणी आले!

## २०

मावल्या आईने अभय दिले, पण नक्षत्रांमागून नक्षत्रे गेली आणि बनगरवाडीवर पाण्याचा टिपूस पडला नाही. तापलेल्या जमिनी निवल्या नाहीत. झाडेझुडपे वाळून कोळ झाली. भुकेल्या मेंढरांनी चगळ न् चगळ वेचले. फुफाटा फार झाला. चक्रीवादळे होऊ लागली. विहिरींचे पाणी आटले. वाडीचा हेळ आटला. चिखलाने गढूळलेले पाणी नरोट्याने खरवडूनसुद्धा घागर भरेनाशी झाली. सकाळ-दुपार लोक पाण्यासाठी हेळावर गर्दी करू लागले. संध्याकाळच्या सुमाराला चिमणीला प्यायलासुद्धा पाणी उरेनासे झाले. रात्रभर झिरपून सकाळी थोडे पाणी होई. तें भरण्यासाठी भल्या पहाटे उठून बायका जाऊ लागल्या. कावळे जागे होण्याआधी माणसे जागी होऊन पाण्यापायी भांडू लागली.

जनावरे रोड झाली. त्यांच्या भकाळ्या दिसू लागल्या आणि अंगावर अस्वलासारखे केस वाढून ती मळकट दिसू लागली. लोकर कातरल्यामुळे अगोदरच भुंडी झालेली मेंढरे अगदीच बारीक झाली. त्यांची चरबी पार वाळून गेली. छपराचे जुनें, कुजके काड उपसून लोक जनावरांपुढे टाकू लागले. पाण्यापायी मेंढरे लांबलांब न्यावी लागू लागली. चिमण्या, कावळे, होले दिसेनासे झाले. भुकेने वखवखलेले रानातले उंदीर गावात आले आणि त्यांनी धुमाकूळ घातला. धनगरांच्या घोंगड्या त्यांनी कातरल्या, पिटाच्या वासाने सुपे कातरली. दुरड्या कातरल्या.

लोकांच्या तोंडावरची कळा नाहीशी झाली. त्यांच्या डोळ्यात भूक दिसू लागली. घरातले धान्याचे साठे रोडावत, तसे रुपया-दोन-रुपये घेऊन ते बाजार गाठू लागले. मोठ्या मिनतवारीने मिळविलेले महागडे धान्य घेऊन येऊ लागले. हातांवरची पोटे होती ते लोक उपासतापास काढू लागले. रामोशांची फार हलाखी झाली. दोनदोन दिवस त्यांच्या घरांत चूल पेटेनाशी झाली. तालमीत येणारी पोरे धान्याच्या शोधासाठी दूरदूर जाऊ लागली. शाळेत येणारी पोरे अन्न मिळविण्यासाठी जवळपासच्या खेड्याच्या वाऱ्या करू लागली. तालीम ओस पडली, शाळा ओस पडली. अन्न मिळविण्यासाठी सगळे धडपडू लागले. सगळा जिल्हाच दुष्काळाच्या तडाख्यात सापडला. माणदेशच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ आला.

लोक हवालदील झाले. रामा बनगराचा चेहरा काळवंडून गेला. रोज शाळेत होणारी त्याची खेप चुकू लागली. चारदोन रोज सुनके जाऊ लागले. आल्यावरही दुष्काळाशिवाय दुसरा विषय त्याच्या बोलण्यात येईनासा झाला.

"त्येची अशी कथा सांगत्यात मास्तर, रामलक्षिमन देव देव करत आपलं हिंडू

लागलं. हिंडता हिंडता आपल्या भागामधी आलं. रामघाटाच्या वर दुपार झाली म्हणून भाऊभाऊ सावली बगून जेवाय बसलं आन् पाऊस आला. जोरकस आला. अन्नात पानी पडू लागलं. राम रागावला अन् एक बाण मारून त्येनं पावसाला पार वालेघाटात पिटाळला. तवाधरनं जो ह्या मानदेशात पाऊस न्हाई त्यो आजपतूर न्हाई. बगा तुमी, रामघाटाला पाऊस पडतो आन् आपल्या टकुऱ्यावरनं काळं ढग नुसतं जात्यात. जात्यात, जात्यात आन् पुन्ना पडत्यात ते वालेघाटात."

ही गोष्ट खरी होती. मधली पट्टी पावसाच्या कृपादृष्टीतून नेमकी सुटत होती.

खाण्याची आबाळ झाल्यामुळे मेंढरे रोडावली आणि अशक्त झालेल्या त्यांच्या शरिरांना नाना रोग झडपू लागले. देवीची साथ आली आणि मेंढरांच्या तोंडावर देवी उठल्या. ताप भरून ती जागची उठेनाशी झाली. करुण डोळ्यांनी इकडेतिकडे बघत उगीचच बसून राहू लागली. काहींना आडा भरला आणि त्यांची डोकी फिरली. वेड लागलेली ती मेंढरे स्वतःच्या अंगाभोवती फिरू लागली. आणि अशी फिरून फिरून जमिनीवर आपटू लागली. मरू लागली. काहींचे पाय लुळे पडले आणि ते ओढत ती चालू लागली. लोक म्हणू लागले, मेंढराला व्हल्याने व्हल्गाडले, तांबडा व्हला त्याच्या पाठीवर बसला आणि उडताना त्याने पंखे मारली, त्यामुळे जखमी मेंढरू कमरेपासून लुळे पडले. काहींना नाकाड्या झाल्या. नाके वाहू लागली. त्यांवर कावळे टोचा मारू लागले. गलोलीने कावळे मारून धनगर ते वाडग्यावर टांगू लागले. काहींना लाळ पडली आणि त्यांचे पाय कुजू लागले. मेंढरे लंगडू लागली. कशाला तोंड लावीनाशी झाली.

ह्या सगळ्या रोगात मेंढरू म्हणावे इतके दगावले नाही, पण काही खांडांत डरंगळण्याचा रोग शिरला आणि मेंढरे पटापट मरू लागली.

हा रोग बिरा धनगराच्या खांडात शिरला. एकाएकी बसल्या जागी मेंढरांना पातळ जुलाब होऊ लागले. वाडग्यात राडेराड होऊ लागली. त्या राडेने मेंढरांची अंगे भरली. माश्या घोंगावू लागल्या आणि धडाधड मेंढरे मरू लागली. रोज सकाळी पाचदहा मुडदे पडू लागले. बिचारा तो पोरगा सता रोज ते मुडदे ओढून गावाबाहेर टाकू लागला. कातड्याची किंमत फार उतरली. आसपासच्या गावचे व्हरल येऊन बारसहा आण्याला एक अशी कातडी खरेदी करून नेऊ लागले. मेली मेंढरे सुरुवातीसुरुवातीला महारापोरांनी नेली, पण मग त्यांनासुद्धा कीक आला. कातडी सोललेले मेंढरांचे मुडदे तसेच रानात पडू लागले. गिधाडे नाही तिथून गोळा होऊ लागली. गावातली कुत्री सुरुवातीसुरुवातीला त्या पाखरांच्या अंगावर धावली, पण पुढे पाखरे आणि कुत्री एकाच जागी मास खाऊ लागली. वाडीशेजारच्या वडावर गिधाडांनी छावणी टाकली. अवजड अंगाची ती पाखरे दिवसभर मेंढरे खाऊन संध्याकाळी त्या वडाच्या फांद्या शीट टाकून पांढरीशुभ्र करू लागली.

सातआठ दिवसांच्या आत बिरा धनगराचे दोनशे मेंढरांचे खांड पार नाहीसे

झाले. बिराने नशिबाला दोष दिला. देवाला नवस केले. त्याच्या जिवाची उलघाल झाली. लाडकी मेंढरे मरताना बघून सता रडूओरडू लागला, पण व्हायचे ते घडलेच. बिरा धनगरांची काठी बसली. त्याचे सगळे खांड नाहीसे झाले.

माणसे उपासतापास काढू लागली. शक्य होते तोवर त्यांनी विकत आणून वैरणी गुरांपुढे टाकल्या. तोंडचा घास काढून कळणाकोंडा त्यांना चारला. पण मग निभेना. भुकेमुळे पेकाळून, दावणीशी गप बसलेल्या गुरांचे करुण डोळे त्यांना बघवेनात.

रामोशांनी पूर्वीपासून चालू असलेला दारू गाळण्याचा धंदा जोरात सुरू केला, पण दारूला गिऱ्हाईक मिळेना. वांगीची बाई पळविणारा तो बांड जगन्या रामोशी भुकेअभावी दारूची नशा करू लागला, आणि त्यांच्या अंगावरची चरबी पार झडली. अखेर कावूनकावून एकटाच तीसपस्तीस मैल जमीन तुडवून पार महूद गावी गेला. त्याच्यासारखे बरेच गुळंकरी तिथे जमले होते. गावातल्या शेतकऱ्यांनी भांगलणीचे काम त्यांना दिले होते. हे उपरे लोक केव्हा चालू लागतील त्याचा नेम नाही म्हणून तीन दिवसांनी काम संपताच रोजगार देण्याचा वायदा त्याने केला आणि लोक भांगलू लागले. धोतराने पोट आवळून जगन्या रामोशाने तीन दिवस भांगलले. भुकेची ग्लानी घेऊन खुरपे चालवले. आणि तिसरे दिवशी हरळीने भरलेल्या पाटातच तो कोलमडून पडला तो पुन्हा उठला नाही.

पोटाने म्हातारा झालेल्या बैलाला ओढत ओढत गावाबाहेर जाताना मला शेकू भेटला.

मी विचारले,

"कुणीकडे शेकूबा?"

शेकू उभा राहिला आणि म्हणाला,

"आता निभंना मास्तर. बाजाराला जाऊन बैल इकून टाकतो. जिथं जाईल तिथं पोटभर चारा तरी खाईल."

तो गेला आणि संध्याकाळीं दमूनभागून परत आला, तेव्हा बैल त्याच्या बरोबरच होता.

वाट बघणाऱ्या बायकोने विचारले,

"का व—न्हाइ का इकला?"

तेव्हा खिन्नपणाने मान हलवून शेकू म्हणाला,

"गिऱ्हाईकच न्हाई. खाटक्यानं सात रुपयाला मागितला. त्याची सुरी खाऊन मरण्यापरीस आपल्या दारात मेलेला काय वाईट?"

मेंढरे मोडून त्यांचे धान्य आणण्यासाठी लोक लांबलांबच्या बाजाराला जाऊ लागले. चारचार मेंढरे देऊन पायली चार पायली जोंधळे घेऊ लागले. त्या जोंधळ्यांच्या कण्या घशाखाली उतरेनात. जे सुरुवातीला गेले त्यांची मेंढरे विकली

गेली, पण पुन्हा मागून जे गेले ते हात हलवीत परत आले. कुठल्याही बाजारात जनावरांना गिऱ्हाईक राहिले नाही. घेणारा घेऊन त्याला घालणार काय?

वाळून कोळ झालेला आनंदा एके दिवशी आला आणि म्हणाला,

"जातो जगायला मास्तर!"

मास्तर काय सांगणार?

"कुणीकडे जातोस?"

"जातो वाट होईल तिकडं. कुटं जिथं पीकपाणी असेल तिथं काम करू. जगू. जगलोवाचलो तर माघारी येऊ."

थोडा वेळ आनंदा थांबला आणि मग हलकेच म्हणाला, "मास्तर, बाळ्याला मी आनि आयबूनं मिळून मारलं. तुमाला लई तरास देऊ लागला म्हणून मारलं."

"काय सांगतोस?"

"माझ्या गळ्याची आण!"

"पण आयबू माझ्याजवळच झोपला होता त्या रात्री."

"मारून येऊन झोपला हुता गप!"

"हं—"

ही कबुली दिली आणि आनंदा गेला.

कवाडे बंद करून रामोशांची सगळी माणसे गावाबाहेर पडली. ती पंधरावीस माणसे, पाठीशी बोचकी घेऊन, वरचेवर मागे बघत, जीव जगविण्यासाठी गावाबाहेर पडली. त्यांच्या शेळ्या त्यांच्या मागोमाग होत्या. पोरे खांद्यावर होती. बायाबापड्या, म्हातारेकोतारे—सगळे बरोबर होते. एखाद्या फासेपारध्यांच्या लटांबराप्रमाणे हे रामोशी पाय ओढत, फुफाट्याने भरलेला रस्ता तुडवीत अन्नाच्या शोधासाठी निघून गेले. वाडीचा रामोसवाडा रिकामा झाला.

मग हळूहळू मेंढरांची खांडे पुढे घालून मेंढके गेले. त्यांची केसाळ कुत्री गेली. ज्यांच्या जिवावर धनगरांचे जीवन होते ती मेंढरे उपासाने मरू लागली, तेव्हा मनें घट्ट करून तरुण मेंढक्यांनी गाव सोडले. त्यांच्या मागोमाग घरातली माणसेही गेली. दुष्काळी मुलूख ओलांडायचा आणि पलीकडे जायचे. मग तें ठिकाण कितीही दूर असो, कुठेही असो. धनगर तिथे पोचणार होते. घेता येईल तेवढे सामानसुमान पाठीवर घेऊन धनगर बाहेर पडले. बें-बें करून ओरडणाऱ्या मेंढरांना हाकलीत, त्यांच्या थकलेल्या पोरांना उराशी उचलून घेत त्यांची यात्रा सुरू झाली.

रामा धनगर जाण्यापूर्वी मला उराउरी भेटला. म्हणाला,

"धुळं-मोर्चापुरकडं जातो. तिकडे पाव्हने आहेत. म्हातारा याला तयार न्हाई. त्याला संबाळा!"

म्हातारा काकुबा धनगर गेला नाही. तो गावातच राहिला. पोराने खूप सांगून बघितले, पण तो म्हणाला,

"मी कशापायी येऊ? मेंढरं घेऊन तुमी जाताय. त्यांना जगवताय. माजं आता काय व्हायलंय? इतका आटापिटा करून जगावं असा मी आता व्हायलो न्हाई. तुमी जा. माजी माती हितंच पडंल!"

मग रामाने धान्याचा साठा ठेवला. म्हाताऱ्याला करून घालण्यासाठी आपली बायको ठेवली. आणि मेंढरं घेऊन तो जायला निघाला तेव्हा म्हातारा म्हणाला,

"सगळी मेंढरं नेतोस, मग मी हितं काय करू? दोन ठिऊन जा. माज्या भाकरीतली त्यांना घालून जतन करीन. निभंना झालं तर सगळीच मरून जाऊ!"

म्हाताऱ्यापाशी दोन मेंढरे ठेवून रामा आणि त्याचा तरुण पोरगा निघून गेले.

घरटी कुणी माणूस राहिले, कुणी राहिले नाही. भराभर सगळे बाहेर पडले. न रडता, न भेकता त्यांनी वाटा धरल्या.

जे मूठभर शेतकरी होते ते जवळ असलेल्या धान्यामुळे तग धरून आणखी महिनाभर राहिले. पण मग तेही गेले. बाळा धनगर गेला. बैलाला घेऊन शेकू, त्याची बायको गेली. धुळा गेला. वाडीतले शेतकरीही गेले. त्यांच्या वस्त्या बंद झाल्या. कवाडांना कुलपे लागली. बाळा बनगराच्या पाठकुळी बसून बाळ्यासुद्धा गेला. जाता जाता शाळेपाशी येताच तो ओरडून म्हणाला,



"मास्तर, मी चाललो. पर जगून माघारी ईन आन् तुजं बघीन. अरं, मला पक्कं माहीत हाय. तू माझं हातपाय मोडलंस!"

सकाळसंध्याकाळ हजारोंनी बाहेर पडणारी आणि पुन्हा वाडीत परत येणारी मेंढरे, तरुण मेंढके गेले, आणि वाडी भकास झाली. परत येणाऱ्या लेकुरवाळ्या मेंढ्यांचा आवाज ऐकू येईनासा झाला आणि वाडी मुकी झाली. झोपड्यांतून धूर निघेना, शाळेपुढे सभा भरेना, लेंड्यांचा, मुताचा उग्र वास येईना, आणि वाडी निर्जीव झाली. हलती-बोलती होती ती स्तब्ध, गप झाली. एक वेळ पाणी पडले नाही, एक पावसाळा दिसला नाही, आणि वाडी खलास झाली. तो रामा बनगर, तो शेकू, तो आनंदा, बाल्द्या आणि बाळ्या—सगळे नाहीसे झाले. बरेवाईट सगळे गेले. शाळा तिथेच राहिली; तालीम तिथेच राहिली; ही घरे, ही झाडे जिथल्या तिथे राहिली; आणि मंडळी निघून गेली.

जोरदार वारा घोंगावत राहिला. त्या वाऱ्यामुळे उडून आलेली धूळ घरांच्या दारांवर, भिंतींवर बसली. धनगरांनी स्वच्छ सारवलेली अंगणे धुळीने, केरकचऱ्याने भरून गेली. छपरांवरील काड वाऱ्याने विस्कटले, सुटले. ते काड सर्वत्र झाले. भोकसे

पडलेल्या जागी घुसून वारा चमत्कारिक आवाज करू लागला. छपरांवर टाकलेली, मोडकी अवजारे खाली अंगणांत कोसळल्याचे आवाज होऊ लागले. घरांच्या बंद कवाडांवर वारा धडका मारू लागला. कवाडे धडधड, खडखड वाजू लागली. तालमीत धूळ साचली. हौद्यातल्या लाल मातीवर धुळींचा थर बसला. कोळ्यांनी जाळीं केली, गजीचा ढोल उंदरांनी कुरतडला. अनेक दिवस न सारवल्यामुळे शाळा उखणली, पोपड्यांनी भरून गेली. फळ्यावर, टेबलावर, पेटीवर धूळ साचली. मारुतीच्या देवळात धूळ साचली. तांबडा मारुती धुळीनें माखून निघाला.

गावात कुणी दिसेनासे झाले. अनेक दिवस, रोज संध्याकाळीं येऊन लिंबाच्या टोकावर बसणारे बगळे येईनासे झाले. शाळेत गोंधळ घालणाऱ्या चिमण्या कुठे दिसेनाशा झाल्या. मांजरे इकडेतिकडे हिंडू लागली. रात्री एकमेकांवर गुरगुरून भांडू लागली. बंद घरांतून उंदरांची शिकार करू लागली.

रात्री काकुबा धनगराची मेंढरे एकुटेपणामुळे 'बें-बें' ओरडू लागली, आणि धीट झालेला लांडगा वास हुंगीत गावातून फिरू लागला. तालमीतल्या धुळींवर, देवळातल्या धुळीवर, धनगरांच्या अंगणातल्या धुळींवर त्याची पावले उमटू लागली.

सकाळच्या प्रहरी ती दोनच मेंढरे घेऊन म्हातारा काकुबा धनगर रानात जाई. भुकेलेली मेंढरे माळावरून सैरावैरा धावत, नाके वर करून उष्ण हवा हुंगत. त्यांना खाण्यासारखे रानात आता काही राहिले नव्हते. कळपातून वेगळीं झाल्यामुळे ती ओरडत. काकुबा मग त्यांच्याशी बोले. नांगरलेल्या रानातून हरळींच्या मुळ्या वर येऊन पडल्या होत्या. त्या वाळल्या काशा काकुबा खोच्यात वेचून आणी आणि त्या दोन मेंढरांना घाली. दिवसभर काशा वेचीत असा तो वणवण हिंडे. मेंढरे ओरडत त्याच्यामागे फिरत. संध्याकाळ झाली की 'हा-हा' करून ती दोन मेंढरे हाकारत म्हातारा गावात येई.

रामाची मागे राहिलेली बायकोही सकाळच्या प्रहरी डोक्यावर मोकळी पाटी आणि कासोट्यापाशी खुरपे खोवून बाहेर जाई. परगावचे मळे पालथे घाली. सहासहा, सातसात मैलांची पायपिटी करून ती माघारी येई, तेव्हा तिच्या मोकळ्या पाटीत दोन-पाच गाजरे असत. जळणासाठी वेचलेल्या काटक्या असत. मेंढरांना खाण्यासारखे भुस्कट असे. मागामागी करून केलेली ही कमाई घेऊन ती संध्याकाळीं माघारी येई आणि मग घटकाभर त्यांच्या झोपडीत लाल जाळ पेटे, काळाकरटा धूर छपरावर दिसे; क्वचित बोलणे ऐकू येई.

मी अधूनमधून गावी जात होतो. झाल्या गोष्टी सरकारात कळवीत होतो. आठवड्यातून दोनचार दिवसच वाडींत काढीत होतो. दिवसभर आम्ही दोघेच गावात असू. गुडघे उभे करून त्याभोवती हाताचा वेढा देऊन आयबू कुठेतरी बसून राही. कधी मनात आले म्हणजे शाळा, तालीम झाडून काढी. मी दिवसदिवस झोपून

राही. काही वाचीत, लिहीत बसे. मधूनच मला न सांगतासवरता आयबू कुठेतरी निघून जाई. धुळीने भरलेल्या पायांनी दमूनभागून संध्याकाळी परत येई. खाली मान घालून बसून राही. कुठे गेला होतास म्हणून विचारले, तर पाय मोकळे करायला गेलो होतो एवढेच सांगून गप्प राही.

दिवस कसाबसा रेटला जाई, पण रात्र खायला उठे. अशा वेळी कधीकधी काकुबा येई आणि भिंतीला पाठ टेकून बसून राही. खोलीत चिमणीचा मंद प्रकाश पडलेला असे. मी माझ्या विचारात, आयबू आपल्या विवंचनेत आणि काकुबा उगीच इकडेतिकडे बघत असे. तिघे तिन्हीकडे बसून राहात असू.

मी विचारी, "काकुबा, रामाचा काही सांगावा ?"

"न्हाईबा."

"गेलेली माणसं आता परत कधी यायची ?"

"याची पाऊसपानी पडलं म्हंजे !"

कधी झाली तर अशीच प्रश्नोत्तरे होत. नाही म्हणजे म्हातारा बसबस बसे आणि उठून निघून जाई.

मी घरून आणलेल्या भाकरीतून दोनतीन दिवसांच्या शिळ्या भाकरी आयबूला देऊ केल्या तर तो कधी घेई, कधी नको म्हणे. फार आग्रह केला तर तो बाहेर निघून जाई. मी एकटाच बसून त्या वाळल्या भाकरी खाई आणि पाणी पिऊन झोपी जाई.

असे काही दिवस गेले आणि मग एके दिवशी मला वरिष्ठांकडून लिहून आले की वाडीची शाळा बंद करून तालुक्याच्या प्रायमरी स्कूलमध्ये दाखल व्हावे.

आयबूने माझे सामानसुमान आवरले. राहात होतो ती जागा मोकळी केली. शाळेला कुलूप लावले. तालमीला कुलूप लावले. मी उभ्या-उभ्या काकुबाच्या घरी गेलो.

"बाबा, मी जातो. सरकारनं मला माघारी बोलावलं आहे."

काकुबाने टक लावून माझ्याकडे बघितले. होकारार्थी मान हलवली—दोनतीन वेळा हलवली आणि तो म्हणाला,

"बराय !"

म्हातारा जास्ती बोलला नाही. त्याची सून काहीच बोलली नाही. नवे माणूस बघून मेंढरे दोनतीन वेळा ओरडली आणि काकुबाचा निरोप घेऊन मी बाहेर पडलो.

माणूसकाणूस, गुरढोर कोणी दिसत नव्हते आणि वाडीकडे पाठ फिरवून आम्ही गाडीवाटेने परत चाललो होतो. सामानसुमान भरलेले एक ठिके आयबूने

डोक्यावर आडवे घेतले होते आणि माझ्यामागून तो येत होता. काही सामान माझ्या हातात होते.

मध्येच आयबू थांबला आणि डोक्यावरचे पोते सारखे करून माझ्याकडे न बघता म्हणाला, "हे गबाळं तुमच्या घरी टाकून मग मी माघारा जाईन."

कुठे जाणार, काय करणार, हे मी काहीच बोललो नाही. या बापड्याला आता कुठे आधार मिळेल, असा विचार मनी आला नाही. माझी सावली पुढेपुढे सरकत होती. धूळ उडत होती. आणि समोर दूरपर्यंत पसरलेल्या माळावर कुणीही दिसत नव्हते. उजाड बनगरवाडी मागे राहिली होती आणि मी परत चाललो होतो.

55415
11·11·76



व्यंकटेश माडगूळकर

यांची

आणखी काही पुस्तके

---

*कादंबरी*

**वावटळ** रु० ४·००

*कथासंग्रह*

**काळी आई** आवृत्ती संप

**हस्ताचा पाऊस** रु० ५

**सीताराम एकनाथ** रु० ४·५०

**गावाकडच्या गोष्टी** आवृत्ती संपली

**उंबरठा** आवृत्ती संपली

Library IIAS, Shimla
MR 891.463 M 264 B
00055415

मौज प्रकाशन